म. ग्रं सं. वाचनालय, ठाणे.
विषय ......... नाटक
दा. क्र. १८३२५

IRBK 0118325
IRBK-0118325

2003

JUN 1983

3 MAR 1983

17 JAN 1982

3 - JUN 1998

4 JUN 1987

22 JUL 1999

28 AUG 1984

5 SEP 1983

8 JUL 1981

25 DEC 1982

वाचनालय
नाटक
30151
9C324

जयवन्त दळवी यांच्या
'अथांग' या कादंबरीवर आधारलेले
दोन अंकी,
स्वतंत्र, सामाजिक नाटक

# महासागर

जयवन्त दळवी

IRBK-0118325
IRBK-0118325

मॅजेस्टिक
मॅजेस्टिक बुक स्टॉल

'महासागर' या नाटकाच्या तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी परवानगीसाठी पुढील पत्त्यावर लिहावे :
जयवन्त दळवी । १३, विकास । भवानीशंकर रोड । मुंबई २८.

© सौ. उमा दळवी

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव, मुंबई ४.

पहिली आवृत्ती :
एप्रिल १९८०

मुखपृष्ठ :
जयंत ताडफळे

मुद्रक
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ३०.

किंमत : दहा रुपये

महासागर

# महासागर

या नाटकाचा प्रथम प्रयोग **कलावैभव**, मुंबई
या संस्थेतर्फे सोमवार, ता. १३ ऑगस्ट १९७९ रोजी
सकाळी १० वाजता शिवाजी मंदिर, मुंबई
येथे सादर करण्यात आला.

दिग्दर्शिका । विजया मेहता
पार्श्वसंगीत–संकल्पना । राजा देसाई

रंगमंच–व्यवस्था । हाजीमिया, सुभाष,
पीरखान
निर्मिती–व्यवस्था । सखाराम म्हात्रे,
सतीश गवंडे,
राजन् वैद्य
निर्माती । माधवी तोंडवळकर

नेपथ्य–प्रकाश योजना । सखाराम भावे
प्रकाश–योजना सहायक । शरद वाडगे,
चंद्रकांत बने
रंगभूषा । रामकृष्ण केळकर
वेषभूषा । नॅशनल टेलर्स
सहायक । वसंत साने

सूत्रधार । मोहन तोंडवळकर

गंगूकाकी । उषा नाडकर्णी
आई । सुहासिनी आडारकर
दिगंबर । नाना पाटेकर
नरहरी । राजन् वैद्य
घनश्याम । विक्रम गोखले

वसंत । मंगेश कुलकर्णी
चंपू । नीना जोशी
सुराणा । मच्छिंद्र कांबळी
सुमी । भारती आचरेकर
रेहमान । मोहन भंडारी

# अंक पहिला

[ हे नाटक दोन अंकांत आणि दोन्ही अंकभर दोन दृश्यांत विभागलेले आहे. दोन दृश्ये म्हणजे दिगंबरचे घर आणि घनश्यामचे घर. दोन्ही अंकांत अधून मधून काळोख आणि प्रकाश यांच्या साहाय्याने हे नाटक या दोन घरांत घडत असते. ही दोन दृश्ये फिरत्या किंवा सरकत्या सेटच्या आधाराने दाखवता येतील किंवा रंगमंच विभागून दोन्ही दृश्ये एकाच वेळी स्थिर ठेवून व एकेका दृश्यावर आलटून पालटून प्रकाश टाकून हे नाटक करता येणे शक्य आहे; परंतु हा नेपथ्यकाराचा प्रश्न आहे.

दिगंबर हा तिशीपस्तिशीतला मध्यमवर्गीय तरुण. तो बी.ए.पर्यंत शिकलेला आहे. व्यवसायाने विमा एजंट आहे. अंगाबांध्याने व व्यक्तिमत्त्वाने आकर्षक आहे. त्याचे चंपूशी लग्न झालेले आहे. तीही बी.ए. आहे. ती मूळची दिसायला सुंदर व आकर्षक आहे. पण लागोपाठ तीन मुली झाल्यामुळे आणि घरी तीन माणसांचे लटांबर सांभाळावे लागत असल्यामुळे चंपू अगतिकपणे अजागळ दिसू लागली आहे. तिची राहणी कशीतरी आहे.

घरी दिगंबराची आई आहे. पंचावन्न वर्षांची. तिला दिगंबरच्या वडिलांनी—आबांनी—टाकलेली आहे. आबा देशभर कोठे कोठे लफडी करीत फिरत असतात. नाटकात त्यांचे फक्त उल्लेखच येतात.

दिगंबरच्या घरात त्याची एक काकी—गंगूकाकी आहे. ती साठी—पासष्टीची आहे. विधवा आहे. ज्या दिवशी तिचे दिगंबरच्या थोरल्या काकांशी लग्न झाले, त्याच रात्री बस—अपघात होऊन काका ठार झाले आणि गंगूकाकी विधवा झाली.

घरी आणखी आहे दिगंबरचा धाकटा भाऊ वसंत. पंचवीस–सव्वीस वर्षे वयाचा. बुद्धीने हुशार. फर्स्ट क्लास करीअर असलेला. पण प्रेमभंगाच्या धक्क्यामुळे एकदा वेडाचा झटका येऊन गेलेला.

या तिघांची कामे करता करता चंपू कातावलेली असते आणि दिसतेही ! दिगंबरही सदैव घरगुती कटकटींनी आणि आर्थिक ओढघस्तीने करवादलेला असतो. पण तो खूप सोशीक आणि विचारी आहे. सगळा विचार करीत तो तडजोडीने संसार करीत असतो. जास्तींत जास्त आनंदी राहण्याचा प्रयत्न करीत असतो. चंपूलाही आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतो.

या नाटकात बऱ्याच वेळा तो आपल्या मनातल्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी विशिष्ट आवाजात ‘ स्वतःशी ’ बोलतो. मुख्य संवाद बोलता बोलता तोंड किंचित बाजूला करून जरा वेगळ्या आवाजात हे ‘ स्वगत ’ संवाद म्हणतो.

दिगंबरचे घर म्हणजे एक खोली, खोलीपुढील गॅलरी एवढा भाग दिसतो. स्वयंपाकघरात जाण्याचा दरवाजा बाजूला आहे. खोलीच्या एका कोपऱ्यात, समोर दिसणाऱ्या गॅलरीच्या दिशेने, दोन ट्रंका जोडून त्यांवर आई पाय आखडून सदान्‌कदा पडलेली असते. तिचे नेहमी डोके दुखत असते आणि हातापायांची आगआग होत असते.

पलीकडे गॅलरीचा जो भाग दिसतो, तिथे उजवीकडे गजांचा एक दरवाजा दिसतो. वसंताला पूर्वी वेडाचा झटका येऊन तो व्हायोलंट झाला होता. तेव्हा त्याला अडकवून ठेवण्यासाठी अर्ध्या गॅलरीत गजांचा पिंजरा केला होता. त्या दरवाज्यापाशी एक खुर्ची किंवा स्टूल टाकून त्यावर वसंत बसलेला असतो–हाताचे कोपर गॅलरीच्या कठड्यावर टेकून. अंगावर पायजमा आणि खमीस. वेगवेगळ्या वेळी तो वेगवेगळ्या पोझिस्‌मध्ये बसलेला असतो–कधी कठड्यावर हनुवटी टेकून, कधी हातावर गाल टेकून ! त्याची दाढी कधी खुरटी वाढलेली दिसते, तर कधी नीट केलेली दिसते. कधी कंटाळा आला, तर शीळ वाजीत तो गॅलरीत किंवा खोलीत निरर्थक फेऱ्या मारीत राहतो. अशा फेऱ्या मारताना शीळ घालण्याची त्याला सवय आहे.

गंगूकाकी त्याच्या सेवेत नेहमी मग्न असते. ती अधून मधून पितळेच्या मोठ्या वाडग्यातून त्याला चहा आणून देते. तिचा जुना, ठिकठिकाणी चेपलेला वाडगा. मग त्यातलाच अर्धा आपण पिते. मधूनच कधी तरी स्वयपाकघरातून कणेरी आणते. कणेरीचा वाडगा वसंताच्या तोंडाला लावते. अधून मधून वसंताशी ती काही ना काही बोलत असते. खोलीत

इतरांचे बोलणे चालू असते, तेव्हा तिचा बोलत असल्याचा मूकाभिनय दिसतो. ती घरकामात वरची मदत करीत असते. कधी सुपातून तांदूळ आणून निवडते, कधी भाजी मोडते. कामाच्या निमित्ताने गॅलरी ते स्वयंपाकघर अशा तिच्या फेऱ्याही चालू असतात. इतरांचे संवाद चालू असताना पार्श्वभूमीला ही हालचाल चालू असते. त्यावेळी तोंडाने ती काही तरी पुटपुटते—बहुधा स्तोत्रे!

घनश्यामचे घर हे अधिक श्रीमंत आहे. अत्याधुनिक पद्धतीच्या, पण सुटसुटीत बैठका आहेत. शोभेच्या वस्तू आहेत. तो स्वतः व्यायामपटू आहे. त्याचा स्वतःचा वेट–लिफ्टींग करतानाचा एक मोठा फोटो टांगलेला आहे. एका कोपऱ्यात मल्लांचे बॉडी दाखवणारे एक दोन छोटे पुतळे आहेत. स्पर्धेत मिळालेली एखादी ढाल, कप वगैरे दिसतात. त्याचा बंगला असून त्यातला दिवाणखाना आणि पलिकडचे पोर्च व लॉन दिसते.

पडदा वर जातो, तेव्हा दिगंबरचे घर प्रकाशमान होते. आई डोके धरून ट्रंकांवर निजली आहे, गॅलरीत एका स्टुलावर बसून वसंत बशीतला शिरा खातो आहे आणि गंगूकाकी समोर बसली आहे. दिगंबरच्या तिन्ही मुली–दिसत नाहीत. त्या स्वयंपाकघरात रडून रडून गोंधळ घालीत आहेत. थोरली चार–पाच वर्षांची. दुसरी–तिसरी जुळ्या आहेत–तीन तीन वर्षांच्या. थोरली स्वयंपाकघरात हातपाय आपटत " आई, मला शिला पायजे... शिला पायजे...आधी शिला दे– " असे रडत रडत ओरडते आहे. " आता शिरा संपला! आजीकडे जाऊन माग–" असे चंपू करवादून ओरडते आहे. मग धाकट्या दोन रडू लागतात. चंपू त्यांच्या पाठीत धपाटे घालते आणि स्वयंपाकघरात मोठा कल्लोळ उडाल्याचे ऐकू येते. " आधी तोंड मीट. मीट तोंड आधी! .. जरा तोंडातनं आवाज आला, तर छडीनं फोडीन! ..." असा मोठ्याने दबकावल्याचा आवाज ऐकू येतो. त्यापाठोपाठ चंपू स्वयंपाकघरातून बाहेर येते. नेसणं दिसणं–सगळा अवतारच! तिच्या हातात पकडीने धरलेले चहाचे भांडे आहे आणि चहाचा कप! तरतर चालीने ती येते आणि गॅलरीच्या दिशेने जाता जाता ..]

चंपू : ( करवादलेली–आतल्या मुलींना दबकावीत ) पुन्हा तोंडातनं आवाज आला, तर याद राखा!... रडताहेत गळा काढून... मेली नाही अजून आई तुमची...!

[ तरतर जाते आणि वसंताच्या पुढ्यात चहाचा कप आपटते. तेवढ्यात कपात तिच्या पदराचे टोक बुडेल, म्हणून वसंत तिचा पदर धरतो. त्याने मुद्दाम पदर धरला, असा समज होऊन ती संतापून वसंताकडे बघते. अधिक चिडते. तेवढ्यात गंगूकाकी आपला वाडगा पुढं करते. त्यात ती चहा ओतते. तिथून ती दिगंबराच्या आईकडे येते. आई आपला शेजारी ठेवलेला पितळेचा कप किंवा ग्लास सुलटा करते. त्या कपात चंपू चहा ओतत असताना ... ]

**आई :** कशाला रडताहेत त्या ?

**चंपू :** ( करवादून, फटकन् तोडत ) त्यांची आई मेली, म्हणून !

**आई :** काय बोलते आहेस, चंपू, तू हे ? काय हे सकाळी, सकाळी ?

**चंपू :** मग काय करू ? बाजारातनं मासळी घेऊन आले . तर ती तशी पडून आहे ... नीट करायला नाही वेळ ! ... आंबोळी घातल्या, कपडे धुतले ... नळ जायच्या आधी करायला नको सगळं ? आता अकरा वाजायला आले !

**आई :** दिगंबराचा काय पत्ता ? अजून आला नाही तो ?

**चंपू :** आज रविवार ! ते कुठले यायला एक वाजेपर्यंत ? पोरींना खाली जरा फिरवून आणायला कुणी नाही इतका वेळ त्या रडरड रडताहेत ...

**आई :** मग जरा सांगावं, ग, चंपू, तोंड उघडून ! मी आहे ना घरात—त्यांची आजी ( गॅलरीतल्या गंगूकाकीकडे हात करीत ) ती आहे दुसरी आजी ... गंगूकाकी—( उठते आणि स्वयंपाकघरात जायला लागते. जाता जाता ... ) दोघी दोघी घरात असताना ... सांगावं जरा ! चला, ग ! खाली देवळात घेऊन जाते त्यांना ...

**चंपू :** बसा तुम्ही ! तुम्ही कुठं जाणार ? डोकं ठणकतंय ना ?

**आई :** असू दे मेलं माझं डोकं ! असतं कधी बरं ? तिला ( म्हणजे गंगूकाकीला ) सांग, मासळी नीट कर, म्हणावं ! सांगावं जरा तोंड उघडून ...

**चंपू :** हो ! सांगावं ! काही कालच लग्न होऊन आले नाही मी या घरात !

[ ती फणकाऱ्याने आत जाणार, तोच— ]

**वसंत :** ( गॅलरीतून चहाचा घोट घेत ) वहिनी, साखर नाहीए चहात ..

**चंपू :** ( त्रागा असह्य होत ) मग उठा आणि घ्या ! ( वसंत कपाळाला हात लावतो व गप्प बसतो ) नाही तर तुमच्या काकींना सांगा .. ( आत जाते. )

**गंगूकाकी :** ( फणकारून ) सांगेल, हो, सांगेल काकीला ! या गंगूकाकीचे हातपाय काही मोडलेले नाहीत अजून ! दीर धाकटा झाला, म्हणून काय झालं ? जरा मानपान

ठेवावा त्याचा ! ( चंपू साखरेचा डबा घेऊन येते–तिला बघून हातवारे करीत ) बरी आहे, हो, काकी खणखणीत ' शेराशेराचा शिरा खाते ना ! ( उठते आणि चंपूच्या हातातला साखरेचा डबा हिसकावून घेते. ) आण तो इकडे ! काही नको तू साखर त्याच्या चहात घालायला ! जास्त पडेल साखर तुझ्या हातनं…! शिऱ्याला खप- लीय् ना साखर…( टोमणा देत ) शेराशेराचा शिरा खाते मी चोरून चोरून…!

चंपू : ( रागाने दटावीत ) तुम्ही शेराशेराचा शिरा खाता, असं मी म्हटलेलं नाही !.. पुनः पुन्हा तेच तेच बोलू नका !

गंगूकाकी : आणि म्हणेनास का ? खाते, हो, मी ! चोरून खाते…शेराशेराचा शिरा !.. ( वसंताला–) तुझ्यासाठी काही केलं, की तेवढंच तिच्या नजरेत येतं…

चंपू : काऽऽही ओरडत नाही मी ! मांडीवर बसवा आणि बऽऽरा भरवा लाडक्या… धाकट्या पुतण्याला !

गंगूकाकी : लाडका म्हणजे ? तुझाच धाकटा दीर ना, ग, तो ? का कोणी परका आहे ? का माझ्या माहेरचा कोणी आहे ? जळलं माहेर मेलं ते…

आई : ( स्वयंपाकघराच्या दारातून ) चंपू, तू आत ये, बाई ! नको तिच्या ( गंगूकाकीच्या) तोंडाला लागूस ! ( चंपूला हाताला धरून आत नेत ) त्या तिघींना कपडे कुठले घालायचे, ते दे.

गंगूकाकी : (वसंताच्या कपात साखर घालीत) तोंडाळ मेली ! मोठी बीए–एसे शिकलीय. अक्कल नाही काडीची ! मला हुशारी दाखवतेय. तीन तीन पोरी झाल्यात, त्या बघ. अजून मुलगा नाही पोटी. तीन तीन जावई शोधता शोधता पेकाट मोडेल, तेव्हा कळेल ! माझा शेराशेराचा शिरा वर काढतेय…भांडकुदळ मेली !

चंपू : (फणकाऱ्याने बाहेर येते. ती आलीय आईचा चहाचा कप बाहेर राहिलाय, तो आत न्यायला…पण शिऱ्याचे कानी पडताच ) पुनः पुन्हा त्या शिऱ्याचं वर काढू नका.

गंगूकाकी : म्हणे, शेराचा शिरा ! मूठभर तरी रवा होता का आणलेला ? मुद्दाम आणीत नाहीस तू रवा…वसंता शिरा खातो आणि कणेरी पितो, म्हणून—

चंपू : ( आईचा चहाचा कप उचलून ) भलतेसलते आरोप करू नका ! ऐकून घेणार नाही मी ..!

गंगूकाकी : ऐकून घेणार नाही, म्हणजे काय ? करणारेस काय ? मूठभर तरी रवा होता का ?

चंपू : मग सांगायचं आणायला.. थोरल्या पुतण्याला !

गंगूकाकी : तो तुझाच नवरा. काही कमी नाही. बरा मुठीत ठेवलायस ! हुबळीला सिद्धा- रूढ स्वामींच्या पायाशी ने, म्हटलं, तर ऐकून न ऐकल्यासारखं करतो . तो रवा आणणार बराऽ ऽ ( हात पसरून ) शेरभर !

**चंपू :** ( वैतागून, वैतागून ) आता मी खाली जाऊन आणू का मणभर रवा ? खा हव्वा तेवढा शिरा करून आणि प्या कणेरी करून !
**गंगूकाकी :** जा–जा घेऊन ये. बघते तुझी हिम्मत काय ती !
**चंपू :** आणि इथं स्वयंपाकघरात कोण बघणार ?–माझी काकी !
**गंगूकाकी :** तुझी काकी कशाला ? ही आहे ना ( स्वतःला दाखवीत ) तुझ्या नवऱ्याची काकी ... आपली हाडं चुलीत घालायला !
**चंपू :** घातली ! वेड्या पुतण्याची कौतुकं करण्यात दिवस संपतो ...
**गंगूकाकी :** ( एकदम तडकते ) वसंताला वेडा म्हणायची गरज नाहीए ! सांगून ठेवते.
**आई :** ( आतून वैतागून बाहेर येत ) अग, चंपू तू काय चालवलं आहेस हे ? मी जाते त्यांना घेऊन–आतलं दार लावून घे–! ती गंगूकाकी आहे मुलखाची तोंडाळ... तू तिच्या तोंडी लागू नकोस.

[ आई चंपूला ओढत आत नेते. ]

**गंगूकाकी :** असू दे, हो, तोंडाळ ! पोटच्या पोराला काहीही बोललेलं चालतं हिला... म्हणे, मी तोंडाळ ... तुम्ही मोठ्या मिटल्या तोंडाच्या ! तरी बरं, नवऱ्यानं टाकलीय ...मला तोंडाळ म्हणतेय. तुझी थोरली जाऊ मी ! सख्खी ! तेवढा तरी मान ठेव. म्हणे, तोंडाळ ! आपल्या तोंडानं नवरा घालवला, घराबाहेर ... तो वणवण हिंडतोय, देशोदेशी !
**वसंत :** ( थंडपणे चहा घेत हसतो आणि ) फौज पळाली, गंगूकाकी, तुझ्या तोफेपुढं ! ( एकदम वेगळ्या आवाजात ) तू चहा घे वाडग्यातला...
**गंगूकाकी :** ( स्वयंपाकघराकडे पाहात मोठ्यानं ओरडते ) काही नकोय, हो, मला चहा ! शेर शेर शिरा खाते मी, तेवढा पुरे आहे ! चहा आणखीन नको आहे मला !
**वसंत :** गंगूकाकी, तू एक कर...
**गंगूकाकी :** ( कमरेवर हात घेत ) एक शिरा केला ! आता आणखी काय करू ?
**वसंत :** उद्यापासनं शिरा करू नकोस, शिरा नको ... ती कणेरी नको–
**गंगूकाकी :** का म्हणून ?
**वसंत :** नको ! वाटीभर शिरा खायचा आणि हंडाभर ऐकायचं.
**गंगूकाकी :** ( दमून श्वास टाकत ) ऐकायचं ! कशाला ऐकायचं ? ती कोण ? मी काय तिच्या माहेरी राहात नाही. माझ्याच पुतण्याकडे राहते...असेना मेला तिच्या मुठीत. माझं तो काय करणार आहे ?
**चंपू :** ( आतून सुपातून तांदूळ आणीत ) तुमचं कोऽणी काही करीत नाही. एवढे तांदूळ निवडा. ( सूप पुढ्यात आपटते. )

गंगूकाकी : ( सूप फणकाऱ्याने बाजूला करीत ) मी मुळी निवडणार नाहीए तांदूळ ! आणि जेवणार पण नाहीए—

चंपू : नका निवडू. नका जेवू ! तो चहा प्या वाडग्यातला. थंड होतोय...

गंगूकाकी : ( वाडगा बाजूला ढकलीत ) मुळ्ळी मी चहा पिणार नाहीए...नकोच तो मला चहा !...शेराशेराचा शिरा मी खाते, तेवढा पुरे.

चंपू : मग ओतून टाका तो चहा.

गंगूकाकी : हो... हो ! टाकीन ओतून... तुला काय वाटलं, मी टाकणार नाही का ओतून ?

चंपू : टाका टाका ! टाका ओतून...बघते मी तुमची हिंमत !

गंगूकाकी : माझी ? माझी हिंमत तू बघणार ? ( वाडगा घेऊन उठते ) बघ, रे, वसंता ! ही माझी हिंमत बघतेय...

वसंत : गंगूकाकी, काय हा पोरकटपणा ?

गंगूकाकी : ( वसंताला ) तू गप, रे, मेल्या ! ( गॅलरीच्या कठड्यापर्यंत जाते आणि चंपूकडे बघत ) ओतू ? ( गॅलरीबाहेर वाडगा धरीत ) ओतू ?

चंपू : ओता... ओता...

गंगूकाकी : ( वेडावीत ) ओता, ओता ! मी बरी ओतीन ! तू म्हणालीस, म्हणून मी ओतीन ? ( एकदम वाडगा तोंडाला लावून गटागटा चहा पिते ) ओतला ना ? जा आता कामाला !

[ वेड्यासारखी हीः हीः करीत कृत्रिम हसते. ]

चंपू : अशानं वेड लागेल...आणि आम्हांलाही वेड लावाल. धाकटा पुतण्या एक घरात वेडा आहे, तेवढा पुरे !

गंगूकाकी : ( एकदम तडकलेल्या आवाजात ) चंपे ! तुझी चंपी करीन !—माझ्या वसंताला वेडा म्हणशील, तर—

वसंत : असू दे, ग, गंगूकाकी, आहेच मी वेडा—

गंगूकाकी : कोणाची हिंमत आहे तुला वेडा म्हणायची ?... झिंज्या उपटून हातात देईन !

चंपू : आठवतं ना...आमच्या लग्नाची पहिली रात्र ...मध्यरात्री व्हायोलंट झाले ते –

गंगूकाकी : ( हातवारे करीत ) जेव्हा तेव्हा ते तुझं व्हायोलंट व्हायोलंट करीत बसू नकोस ! मोठी आलीय इंग्रजी बोलणारी...! ( हातवारे करीत ) व्हायोलंट. .व्हायोलंट !

चंपू : हनीमूनसुद्धा रद्द झाला आमचा—विसरलेले नाही मी...

गंगूकाकी : झाला हनीमून रद्द, म्हणून बिघडलं कुठं ? उद्या कर साजरा. म्हणे, हनीमून

रद्द झाला ! थेरं नुसती—आम्ही कुठं काय केलं होतं ?

चंपू : तुम्ही लग्नाच्या रात्रीच नवऱ्याला खाल्लात, त्याला कोण काय करणार ?... आता बोलत होते—

गंगूकाकी : (एकदम बैठक मारीत) बोल, हो, बोल ! तेवढंच ऐकायला जगलेय मी... अरे, कर्मा, रे कर्मा ! (असे म्हणत कपाळावर हात मारीत राहाते आणि गळा काढून रडू लागते. रडता रडता—) मी माझ्या नवऱ्याला खाल्ला...लग्नाच्या रात्री मोटारगाडी कोसळली घाटात...ते गेले...आणि मी जगले...मी जगले, म्हणून मी खाल्ला माझ्या नवऱ्याला... अरे, देवा, रे, ... !

[ बाहेरून लॅच–की लावून दार उघडले जाते. दिगंबर येतो. तो नेहमी पांढरी पँट आणि पांढरा बुशशर्ट घालतो. त्याच्या काखेत ब्रीफकेस आहे. तो भटकून भटकून थकला आहे. अजून गंगूकाकी तेच ओरडते आहे. ]

दिगंबर : (एकदम चमकून, स्वतःशीच) घरातलं वातावरण तंग दिसतंय् ! चंपूचं आणि गंगूकाकीचं वाजलेलं दिसतंय् ! नेहमीचंच !

चंपू : (पदराने हात पुसत बाहेर येत... चेहरा त्रासिक) तुम्ही चहा घेणार ?

दिगंबर : नको ! आत्ताच घेऊन आलोय ! (ती आत जाते.) (स्वतःशीच) खरं म्हणजे मी चहा घेऊन आलेलो नाही. पण मी नको म्हणतो... कारण तेवढ्यासाठी चंपूनं स्टोव्ह पेटवावा, असं वाटत नाही. (वळून गॅलरीत गंगूकाकीकडे बघतो—) गंगूकाकी, काय झालं ?

गंगूकाकी : दिगंबरा, मला काही मुद्दा विचारू नकोस ! तुझ्या चंपाराणीलाच काय ते विचार. तुझी पट्टराणी ना—

दिगंबर : (वळून) चंपू—

गंगूकाकी : (नेटाने पुढे येत, वेडावून दाखवीत) चंऽऽपूऽऽ ! बावळट मेला ! (काखेतील बॅग निसटते—) चंपूला काय विचारतोस ? मला विचार. मी या घरातलं वडील माणूस आहे. मेलेली नाही अजून !

दिगंबर : (थकून) गंगूकाकी, झालं काय आज सकाळी सकाळी ?

गंगूकाकी : (वेडावण्याच्या सुरात) गंगूकाकी, झालं काय आज सकाळी सकाळी ? .. गंगूकाकीनं आज सकाळी सकाळी आपला नवरा खाल्ला ! (रडू लागते.)

दिगंबर : हे चाललंय काय, गंगूकाकी ? चंपू—

गंगूकाकी : खबरदार चंपूशी बोलशील, तर !

दिगंबर : हे काय चाललंय आज ?

गंगूकाकी : तिला काही विचारू नकोस. तू माझा काय तो फैसल्ला कर, नाही तर मी

ही चालले घराबाहेर!

**दिगंबर** : कुठं?

**गंगूकाकी** : कुठंही! जगाच्या पाठीवर! तुझा बाप बायकोला टाकून वणवण हिंडतोय देशोदेशी ... तशी मीही आणखी फिरेन... मेला शापच आहे– आमच्या घराण्याला वणवण करायचा ...!

**दिगंबर** : (एकदम तडकतो.) चूप! तू आत जा बघू तात्बडतोब– कटकट नकोय माझ्या डोक्याला—

**गंगूकाकी** : (दात ओठ खात) दिग्या, दिग्या, मेल्या! माझी कटकट? तुझा रुबाब नाय पाहिजे मला! तू आत्ताच्या आत्ता काय तो फैसल्ला कर! नाहीतर आत्ता मी जागच्या जागी प्राण सोडणार आणि सुटका करून घेणार!...

[एवढे बोलता बोलता ती तरतर चालीने स्वयंपाकघरात जाते. वसंत दिगंबरच्या जवळ येतो. काही न बोलता घुटमळतो.]

**दिगंबर** : (थकलेल्या आवाजात) चंपू, आज काय हे?

[चंपू बाहेर येते. हातात निवडण्यासाठी तांदूळ. ती वळून वसंताकडे पाहते. वसंता पुढे येतो, शेल्फवरचे एक पुस्तक उचलतो आणि गॅलरी-तल्या पिंजऱ्यात जातो. गजांतून हात काढून बाहेरून कडी लावतो.]

**दिगंबर** : चंपू, तू काकीला बोललीस...?

**चंपू** : (थंडपणे) हे नेहमीचंच आहे. त्यात तुम्ही लक्ष घालू नका. तुमच्या डोक्याला दगदग आहे, तेवढी पुरे ... धाकट्या पुतण्यासाठी (दोन्ही हात पसरून) हा एवढा शिरा केला .. दोघांनी बसून खाल्ला... तुम्हांला बरा नाही ठेवला वाटीभर—

**दिगंबर** : पण, चंपू, मला नाही आवडत शिरा ...

**चंपू** : तुम्ही गप्प राहा! तुम्हांला नको तिथं मोठेपणा दाखवायची सवय आहे.

[तेवढ्यात गंगूकाकी एक जुने सुंभ घेऊन येते. सुंभाच्या एका टोकाला गाठ मारून त्याचा गळफास करीत तरतर चालीने गॅलरीत जाते आणि स्टुलावर चढून वरच्या हुकावर सुंभ टाकते आणि फासात मान अडकवण्याआधी वळून दिगंबरा-कडे बघते. दरम्यान तिचे हे सगळे चाळे चालू असताना दिगंबर, चंपू काकीकडेच वळून बघत आहेत. ती गळफास लावणार नाही, तिचा हा एक वेडाचार आहे, हे सर्वजण जाणून आहेत.]

दिगंबर : ( शांतपणे ) काय करते आहेस, गंगूकाकी ?
गंगूकाकी : गळफास लावून घेते, म्हणजे मग सुटलात ! बसा राजाराणीचा संसार करीत—

[ स्टुलावरून उतरते, पुन्हा चढते व मान अडकवते— ]

दिगंबर : तुटेल ते, गंगूकाकी—तुटेल बघ ..!
गंगूकाकी : तुटू दे ! तुटायलाच हवं मुंडकं...
दिगंबर : मुंडकं नाही म्हणत मी ! सुंभ तुटेल म्हणतोय...( हसतो. )
गंगूकाकी : ( चिडून ) हसतोय बघ मेला दात दाखवीत—मी मरणार, म्हणून ! मग जा तर...नाहीच मरणार मी !. ( खसकन् सुंभ ओढते...आणि ते गुंडाळत स्वयंपाकघरात जाता जाता फणकाऱ्याने ) हसतोय मेला, मी मरणार, म्हणून !...अरे मेल्या, लहानपणी तुझी हगणी—मुतणी काढली मी. फसाफसा मुतायचास...आणि आता बायको हवी झालीय मेल्याला ! ( एवढे बोलत ती आत जाते. )
दिगंबर : ( खाली बसतो, श्वास घेतो आणि ) चंपू, हे सगळं काय आहे ? एवढ्याशा शिऱ्यावरनं एवढं रामायण ?
चंपू : शिऱ्यावरनं नाही, मनात राग असला, की चिडायला निमित्त पुरतं...शिरा हे निमित्त.
दिगंबर : काय झालं ? ( चंपू रागाने आत जाऊ लागते— ) चंपू, आत जाऊ नकोस !

[ ती थांबते. तांदळाचे ताट खाटेवर ठेवते. मुलींचे कपडे घेऊन घड्या करीत बसते. ]

चंपू : तुम्ही विम्याच्या पॉलिसीसाठी दिवसभर वणवण फिरता.
दिगंबर : आता आहेच मी विमाएजंट, तर फिरायलाच हवं वणवण. आणि आताच नाही का गंगूकाकीनं सांगितलं—वणवण फिरायचा शापच आहे आमच्या घराण्याला, म्हणून ?
चंपू : ते मला माहीत नाही.
दिगंबर : ( शांतपणे ) तू काय सांगणारेस ?
चंपू : आठ वाजले नाहीत, तो एवढा शिरा केला. तुमच्या लाडक्या भावासाठी. आता थोड्या वेळानं पातेलभर कणेरी करतील, त्याच्या पोटात घालतील...मग एक वाजला नाही तो...जेवण नाही झालं, जेवण नाही झालं... कलकलाट करणार. पानात मासळीचा तुकडा नाही...मासळीचा तुकडा नाही... उच्छाद मांडणार. पोट बिघडेपर्यंत खा खा करायची.. डॉक्टराकडे फेऱ्या मारायला मी.. आणि खर्च करायला

भाऊ...

दिगंबर : ( हे सगळं ऐकताना तो त्रासून जातो. ) तू खर्चाचंच म्हणतेस ना ? असू दे. तेवढ्यासाठी मी माझे खर्च कमी केलेत ... आहे गळ्यात एवढं लटांबर, तर काय करणार ? त्यांना कुठं टाकता येतं का ? सांगू बघू.

चंपू : मी खर्चाचं म्हणत नाही ! ढीगभर खर्च करणारा आहे भलामोठा भाऊ. वणवण फिरेल आणि आणखी चार पॉलिसी मिळवील. ( वेगळ्याच आवाजात ) तीन कार्ट्या पदरात आहेत, त्याची आठवण ठेवा, त्यांच्यासाठी तिप्पट हुंडे जमा करा आणि तीन जावई शोधण्यापुरतं बळ पायांत ठेवा, म्हणजे झालं !

दिगंबर : एवढंच सांगायचं होतं का तुला ?

चंपू : ( कमरेवर हात वेऊन उभी राहते ) तुम्ही माझं जरा ऐकणार आहात का ?

दिगंबर : काय ?

चंपू : की पुन्हा मी तेच तेच सांगते, म्हणून डोक्यात राख घालून घेणार ?

दिगंबर : वसंताबद्दलच सांगणार आहेस ना ? मी म्हणतो, त्याचा तुला कसला त्रास आहे ? ( चंपू रागाने बघत राहते. ) त्याचं सगळं तो करतो. तो काही वेडा नाही. बाकी त्याची सगळी सेवा गंगूकाकी करते.

चंपू : ( वेडावीत ) त्याचं जेवण तो करतो. चारदा चहा तो करतो. त्याचं ताट तो वाढतो. गॅलरीत तोच नेतो.

दिगंबर : आता एकत्र कुटुंबात एवढं तुला करायला नको ?

चंपू : कामाबद्दल नाही तक्रार करीत मी.

दिगंबर : मग ?

चंपू : ( थांबून ) भावजींच्या नजरेपासून मला काय त्रास होतो, काय भीती वाटते, ते तुम्हांला कधीही कळायचं नाही.

दिगंबर : काय त्रास होतो तुला ? उगाच काही तरी तुझं, चंपू.

चंपू : त्यांची नजर वाईट आहे.

दिगंबर : मला तसं वाटत नाही.

चंपू : तुम्हांला त्यातलं काही कळायचं नाही. तुम्ही असता कुठं घरी ? दोन वेळा गिळायला आणि रात्री निजायला घरी येता, तेच खूप आहे.

दिगंबर : ( एकदम आवाज चढवून ) पण त्याची नजर वाईट, म्हणजे काय ?

चंपू : ( रागाने दटावून ) उगाच आवाज चढवू नका. सांगून ठेवते.

दिगंबर : ( एकदम खालच्या आज्ञाधारक आवाजात ) अग, पण नजर वाईट, म्हणजे काय ?

चंपू : ( खालच्या खाजगी आवाजात ) गॅलरीत त्यांचं जेवणाचं ताट ठेवायला मी ओणवते, तेव्हा ते माझ्या गळ्यातनं आत बघतात .. मी पाठमोरी वळले, तेव्हा ते

माझ्या कमरेकडे टक लावून बघतात. आज सकाळी त्यांनी पदर ओढला माझा. एखादे दिवशी माझा हात धरून ते माझी वाट लावतील, तेव्हाच तुमचे डोळे उघडतील. कदाचित उघडणारही नाहीत. घरात वेडा आहे, म्हणून उद्या पोरींना जावई सुद्धा मिळायचे नाहीत, लक्षात ठेवा!

**दिगंबर :** (कपाळावर हाताच्या मुठी आपटत) मग आता मी काय करू म्हणतेस?

**चंपू :** (निग्रहाने) तुम्हांला सगळं माहीत आहे! पुन्हा पुन्हा विचारायची गरज नाही. पाहीन पाहीन आणि एकदा तिन्ही पोरींना पाठंगुळीला मारून चालायला लागेन—माहेरी—

**दिगंबर :** माहेरी?

**चंपू :** हो! मी माहेरी गेलेली तुम्हांला हवीच आहे! म्हणजे रोजच्या रोज सकाळ–संध्याकाळ बरं–सुमीच्या घरी जाऊन बसायला!

**दिगंबर :** (स्वतःशीच) झालं! हिचं सुमीवर आलं. (प्रकट) पण मी म्हणतो, चंपू, इथं सुमीचा काय आहे संबंध? गेले पंधरा दिवस मी सुमीच्या घरी गेलेलो नाही!

**चंपू :** आणि रोज का जाईत? जा... जा! बरी आहे ना अंगानं गुबगुबीत! फॉर्म टिकवलाय तिनं! (स्वयंपाकघरात जाता जाता हातपाय झाडत, रडत) मला माहीत आहे मी तुम्हांला आवडत नाही. तीन मुली झाल्या ना? सुमी बरी. एकच तिला मुलगा. बसा तिला वेढून! मी जाते माहेरी. (रडत आत जाते.)

**दिगंबर :** (स्वतःशीच) माहेरी जातेय. भाऊ करायला नाही बसलाय माहेरपण! पाच हजारांची पॉलिसी घे म्हटलं, तर दोन वर्षं सारखा टोलवतोय. तो हिचं माहेरपण करतोय! कसला बोडक्याचा मेव्हणा! (उठून फेऱ्या मारीत) शेवटी काय? सगळा राग त्या सुमीवर! त्या सुमीच्या घरी जायचं नाही. (वैतागून) नुसत्या एकेक कटकटी आहेत! हिचा राग दोघांवर. एक सुमी ..दुसरा वसंता. हिला काय सांगायचंय, ते मला माहीत आहे... सांगणार, वसंताला वेड्यांच्या इस्पितळात ठेवा. (निक्षून) ठेवणार नाही! तो वेडा नाही. तो चारचौघांसारखा शहाणा आहे. चारचौघांपेक्षा शतपटीनं हुशार आहे. एसेस्सीमध्ये सबंध बोर्डात आठवा आलाय तो. इंजीनियरींगमध्ये फायनलला तो बसला नाही, ते सोडा. पण तोपर्यंत तो सतत पहिला आलाय. शेवटल्या वर्षी त्या बोरकरांच्या माणिकनं त्याला फसवलं तिनं एकदम न सांगता न सवरता डॉक्टर पाटकराशी लग्न केलं...त्यामुळं त्याच्या मनावर परिणाम झाला. वेडाचा झटका आला. फायनलची परीक्षा हुकली (जरा थांबून) पण आता तो बरा आहे! आमच्या लग्नाची पहिली रात्र चंपू ती विसरणार नाही जन्मात.. नवी नवरी या घरात आलेली...अणि अपरात्री आरोळी ठोकत तो व्हायोलंट झाला. आमची रात्र त्यानं नासवली .दुसरे दिवशी आम्ही हनीमूनला जाणार होतो महाबळेश्वरला! त्यावर पाणी. महाबळेश्वरला जायचं, त्याऐवजी घरी सुतार आणा...

गॅलरीत पिंजरा करा ... पण त्याला झाली आता सहा वर्षे... त्यानंतर तो कधी व्हायोलंट झालेला नाही. आता त्याला कधी आपला तोल सुटणार, असा संशय आला, तरी तो आपणहून पिंजऱ्यात जातो आणि गजांतनं हात घालून बाहेरनं कडी लावतो... एवढा शहाणपणा आलाय त्याच्यात ... आता तो प्रमाणाच्या बाहेर खातो, त्याला आपण काय करणार ? खाऊ दे. त्याला भूक लागते–बसून असतो, तरी ! असू दे ! माझा धाकटा भाऊ आहे तो ! आज बरा असता, तर नोकरीला लागता .. मग गंगूकाकीला त्याच्या गळ्यात टाकता आली असती ... पण नाही नशिबी आपल्या ... बघू ! ... कदाचित सुधारला, तर ! ( थांबून ) आता पुन्हा कधी जर चंपू म्हणाली, की वसंताला इस्पितळात ठेवायचा .. मी तिला ठणकावून सांगणार, नो ... नो... नो ! बस् ! पुढं बोलायचं नाही , आपणही कुठं तरी निर्धारानं बोललं पाहिजे ! ( कुणाशी तरी बोलल्यासारखा ) तो हिच्या छातीकडे पाहतो, म्हणून त्याला मेंटल हॉस्पिटल-मध्ये पाठवायचा ? नॉन्सेन्स ! मग सगळ्यांनाच पाठवायला हवं मेंटल हॉस्पिटलमध्ये ! कोण नाही बघत बायकांच्या छातीकडे ?

[ स्वतःशीच हसतो. तेवढ्यात तो एकदम वळून गॅलरीत बघतो. गजांच्या दरवाज्यातून हात बाहेर काढून वसंत पिंजऱ्याच्या दाराची कडी काढतो. दार उघडतो. बाहेर येतो. त्याच्या हातात पुस्तक आहे. पुस्तकात बोट घातलेले आहे. रेंगाळणाऱ्या चालीने दिगंबरच्या पुढ्यात येऊन उभा राहतो. ]

**दिगंबर** : ये, रे, वसन्ता

**वसंत** : मी काय म्हणत होतो, भाई—

**दिगंबर** : काय ?

**वसंत** : मी काय म्हणत होतो ... तू मला कुठं तरी वेड्यांच्या इस्पितळात ठेव...

**दिगंबर** : ( निग्रहाने ) पण तू वेडा नाही आहेस !

**वसंत** : त्याचं काय आहे, भाई ! वेडे नसलेले सुद्धा वेड्यांच्या इस्पितळात असतात ... मी इथं गॅलरीत बसून असतो त्याऐवजी इस्पितळात बसेन.

**दिगंबर** : खूप बोललास ! त्यापेक्षा एखादी नोकरी वगैरे करण्याचा विचार कर.

**वसंत** : केली असती नोकरी; पण एक प्रकारचा कॉन्फिडन्स गेलाय—

**दिगंबर** : कॉन्फिडन्स जसा जातो, तसा तो निग्रहानं मिळवताही येतो. किती आमचे विमाएजण्ट्स् कॉन्फिडन्सच्या जोरावर कामं मिळवतात.

**वसंत** : ते आता कठीण दिसतंय. पण मी तिथं जाईन. हवं तर आईला विचार. ( थांबून ) वहिनी कुठं आहे ?

**दिगंबर :** स्वयंपाकघरात. आणखी कुठं असणार ?

**वसंत :** काय करतेय ?

**दिगंबर :** स्वयंपाक.

**वसंत :** ती बहुतेक रडतेय. असं तिच्या अंगावर एकदम कचकच करू नकोस. ( थांबून ...अडखळत...ओशाळत... ) भाई... ( त्याला काही तरी सांगायचं आहे. )

**दिगंबर :** काय ?

**वसंत :** सकाळी चहात तिचा पदर पडला... म्हणून मी...

**दिगंबर :** ठीक आहे... असू दे... ( उठतो. )

**वसंत :** तू असं कर...

**दिगंबर :** काय करू ?

**वसंत :** कुठं तरी मोठी जागा बघ, तीन खोल्यांची. एका खोलीत आम्हांला कोंब. मी... गंगूकाकी आणि आई ! बाकीच्या खोल्यांत तुम्ही संसार करा. तुमचेही उमेदीचे दिवस फुकट जाताहेत आमच्यामुळे—

**दिगंबर :** ( तडकतो. हात उडवीत ) तीन खोल्यांचा ब्लॉक घ्यायचा, म्हणजे पन्नाससाठ हजार रुपये हवेत, वसन्तराव ! तेवढ्यात माझ्या दोन मुलींची लग्नं होतील ! काय स्वतःला विकू ? विकलंही असतं; पण घेतो कोण ?... उमेदीचे दिवस फुकट जाताहेत... लायब्ररीत जाऊन पुस्तक आणा आणि वाचत बसा.

**वसंत :** ( हात चोळत ) खरं म्हणजे हा एक प्रॉब्लेमच आहे.

**दिगंबर :** कुठला ?

**वसंत :** अशा प्रकारची जॉइंट फॅमिली मेण्टेन करणं...

**दिगंबर :** ( कंटाळून ) असू दे... वसंता. मी मोठा भाऊ आहे. भलतेसलते विचार तू करायची गरज नाही.

**वसंत :** ( थांबून ) मी काय म्हणत होतो ?

**दिगंबर :** काय ?

**वसंत :** तू माझी एक पन्नास हजारांची पॉलिसी उतर. प्रिमियम काय पडेल ?

**दिगंबर :** दोन हजारांच्या आसपास—

**वसंत :** एक वर्ष भरायचं...

**दिगंबर :** मग ?

**वसंत :** मग मी आत्महत्या करीन. ॲक्सिडेंट आहे, असं भासवीन. पन्नास हजार रुपये तुला मिळतील. त्यातनं तू एक ब्लॉक घे. माझा तरी आता जगून काय उपयोग आहे ?

**दिगंबर :** ( एकदम उठतो आणि वसंताला पोटाशी धरतो. स्वतः गहिवरतो. ) असं काही तरी बोलू नकोस वेड्यासारखं ! अरे वेड्या, सुख ही शेवटी मानण्यावर

98324



आहेत. राजवाड्यातले सगळे राजे काही सुखी होते, असं नाही. (वेगळ्याच आवाजात स्वतःशीच) आज काय झालंय सगळ्यांना?

**गंगूकाकी :** (स्वयंपाकघराच्या दारातून) दिगंबरा, तू चहा घेणारेस का? जेवणाला थोडा वेळ आहे.

**दिगंबर :** नकोय मला. वसंताला कर. घेशील ना, रे? घे...घे...जरा बरं वाटेल!

**वसंत :** घेईन! कर थोडा.

**गंगूकाकी :** (दिगंबराच्या जवळ येत–) मुली गेल्यात आजीबरोबर–खाली देवळात! आल्या नाहीत अजून!... तू घे, रे, थोडा चहा, दिगंबरा!

**दिगंबर :** नको.

[ काकी आत जाते. दिगंबर टेबलापाशी बसून कामात मग्न होतो. तोच बेल वाजते. वसंत दार उघडतो. दारात सुराणा उभा. तिशीतला बावळट पोरगा. जरा पोट सुटलेला. पँटीत शर्ट खोवलेला. बोलताना पोट खाजवण्याची, बरगड्या खाजवण्याची सवय. हसणे–बोलणे बुरसटलेले आणि लाचार. ]

**वसंत :** काय, सुराणा?

**सुराणा :** नमस्कार, नमस्कार. (दिगंबरला बघत) कामात आहेत काय? नमस्कार, साहेब.

**दिगंबर :** काय, सुराणा? तुमची लायब्ररी काय म्हणते?

**सुराणा :** बरी आहे, साहेब. तुमच्या कृपेनं...

**दिगंबर :** आमची कसली कृपा?

**सुराणा :** असं कसं, साहेब? तुमच्या मेहनतीनं मला (जवळच या अर्थी दाखवीत) या वाडीच्या नाक्यावर जागा मिळाली–माझ्या लेब्रीला–हल्लीच्या दिवसांत कुठं जागा मिळते?...आणि नाक्यावर?–

**दिगंबर :** एकूण बरं चाललंय ना?

**सुराणा :** उत्तम.

**दिगंबर :** मग ठीक आहे. (ब्रीफकेस उघडतो.)

**सुराणा :** कामात आहात वाटतं?

**दिगंबर :** हो. का?

**सुराणा :** साहेब, एक काम होतं. एक कटकट झालीय.

**दिगंबर :** (कपाळावर हात मारीत) सुराणा, आता कटकटीची कामं पुरेत. निदान आज तरी नकोत. मग भेटा कधी तरी–

**सुराणा :** नाय म्हंजे... काय आहे, सैब, की...

**वसंत :** सुराणा, इकडे या. बसा. भाई कामात आहे...त्याला त्रास देऊ नका! तुमच्या लायब्ररीत आधी थोडी नवीन नवीन पुस्तकं आणा, बुवा! आहेत, ती सगळी माझी वाचून झालीत.

**सुराणा :** आणू...आणू! त्याचं काय आहे, वसंतराव! एकस्थानं काही होत नाही, हो. कुणाची तरी मदत हवी. त्याचं काय आहे, लेब्रीचा काय मोठा बिजनेस नाय. आणि आहे, तो एकस्थानं होत नाय. ( थांबून ) पण आता सोय झालीय. मी लग्न केलंय, सैब!

**वसंत :** ( चकित होऊन ) कधी? ( दिगंबर वळून मागे बघतो. )

**सुराणा :** झाले चार दिवस—

**वसंत :** तरीच! लायब्ररी बंद होती! वाः! शाब्बास...आणि आम्हांला बोलावलं सुद्धा नाही ते—

**सुराणा :** ( ओशाळत ) काय बोलवायचं? एकदा विच्यार होता. म्हणजे काय, थोडा आहेर मिळतो. पण म्हटलं . काय बोलवायचं?...माझंही दुसरं आणि तिचंही दुसरं...

**वसंत :** तुमचं दुसरं? हे मला माहीत नाही.

**सुराणा :** तर हो! आठ वर्षं झाली, मुलगी झाली होती. पण घेऊन पळाली साली-दोन वर्षांपूर्वी. म्हटलं, तू जा. माझी मुलगी दे. मुलीवर जीव, हो, माझा. तर म्हणते, मुलगी तुझी नाय. म्हणजे हाय, की नाय? ही इज्जत...!

**वसंत :** ही दुसरी बायको कुठली?

**सुराणा :** इथलीच. ब्राह्मण आहे. आपल्या लेब्रीची मेंबर! तिचं लवमॅरेज झालं होतं.

**वसंत :** पहिलीचं?

**सुराणा :** पहिलीचं नाय, दुसरीचं! पण पुढं नवरा मारझोड करायला लागला.

**वसंत :** पहिलीला?

**सुराणा :** पहिलीला नाय.. पहिला दुसरीला.. मग तिनं सोडलं त्याला.

[ खिशातले पैशाचे पाकीट काढून तिचा फोटो दाखवतो. ]

**वसंत :** छान आहे की—

**सुराणा :** काही खास नाही. पण मी तिला सांगितलं...मी तिला सांगितलं.. हिरेमोती नाय, पण प्रेम देईन. तिनं पटकन् खांद्यावर मान टाकली.

[ तिने खांद्यावर मान टाकलीय, असे समजून मान तिरकी करतो. तेवढ्यात चहाचा कप आणि पकडीनं भांडं घेऊन गंगूकाकी येते. ]

**गंगूकाकी :** हा मेला आलाय ? चहा प्यायला आलाय ..

**सुराणा :** नमस्कार, हो, गंगूकाकी.

**गंगूकाकी :** मला काही नमस्कार करायला नको–तू, सुराण्या, चहा प्यायला आलाहेस का ?

**सुराणा :** चा प्यायला नाय, हो—

**गंगूकाकी :** ते काही तू मला सांगू नकोस. प्यायचाय, तर पी. वसंतासाठी केलाय त्यातला थोडा.

[ सुराणा भुर्रर्र करीत चहा पिऊ लागतो. ]

**वसंत :** घाल थोडा. ( कप पुढे करतो, ती कपात चहा ओतत असताना ) गंगूकाकी, सुराणानं काल दुसरं लग्न केलं ! ( हसतो. )

**गंगूकाकी :** न करायला काय झालं ? दुसरा उद्योग काय मेल्याला ? ( दोघे हसतात. ) हिला तरी बरी नांदव मात्र ! ( थांबून, आत जाता जाता ) आणि, सुराण्या, ती तुझी सगळी पुस्तकं ढीग करून ठेवतोस...ती तू एकदा विकत का नाहीस रद्दीत ? चार पैसे तरी मिळतील.

[ आत जाते. सुराणा कपाळाला हात लावीत हसतो. वसंताही हसतो. ]

**सुराणा :** ( हसत ) माझ्या लेब्रीला पुस्तकांचा ढीग म्हणताहेत...रद्दीत विकायला सांगताहेत. ( खूप हसत कपाळाला हात लावतो. दिगंबर काम आटोपतो आणि मागे वळून बघतो. तेवढ्यात ) एक बारकंसं काम होतं, सैब–

**दिगंबर :** सांगा...पण अगदी थोडक्यात–

**सुराणा :** ( लोचटपणे ) म्हणजे काय आहे, सैब .. ती साली त्रास द्यायला लागलीय–

**दिगंबर :** ( चकित होऊन ) अहो, पण काल–परवाच लग्न केलंत ना–दुसरं ?

**सुराणा :** दुसरीचं नव्हे–पहिलीचं सांगतोय !

**दिगंबर :** तिचं काय झालं ?

**सुराणा :** ती मला सतावतेय–

**दिगंबर :** पहिली बायको ? काय करते ?

**सुराणा :** हल्ली रोज माझ्या लेब्रीवरनं मुद्दाम जाते–आपल्या फ्रेंडला बरोबर घेऊन... त्याचा हात धरून...

दिगंबर : ( वैतागून ) जाईना ! नाही तरी तिचा तुमचा संबंध आता नाहीए ना ?

सुराणा : नाय, सैब ! तुमच्या लक्षात नाय आलेलं ! ती माझी इज्जत काढण्यासाठी त्याला लब्रीवरनं नेते–नाकावर टिच्चून ! अहो, वसंतराव ! भडवा, तगडी छाती काढून दाखवतो ...छातीचे केस उघडे ठेवतो ...

दिगंबर : तुम्ही तिकडे दुर्लक्ष करा !

सुराणा : ते झेपायचं नाय, सैब ! मुलगी माझी माझ्या हवाली कर म्हटलं, तर म्हणते, 'ती तुझी नाय .. दुसऱ्यापासूनची आहे !' म्हणजे ज्याम इन्सल्ट, का नाय ? सैब, मी ऐकणार नाय. चार मवाली त्याच्या अंगावर सोडून त्याला पिटणार !

दिगंबर : मग मी काय करू ? मी पिटायला येऊ ?

सुराणा : तुम्ही फक्त इथल्या पोलीस–ठाण्याला सांगा काणाडोळा करायला...काय द्यायचं, ते देऊ आपण.

दिगंबर : हे बघा ... माझ्या मागं नसती झेंगटं लावू नका, सुराणा ! (कामात मग्न होतो.)

सुराणा : तुमच्याखेरीज आम्हांला कोणाची मदत आहे, सैब ?

वसंत : ( सुराणाला बाहेर निघण्याची खूण करीत ) भाईला काम करू दे, सुराणा ! तुम्ही चला...मी सांगतो तुम्हांला काय करायचं, ते.

[ दोघेही बाहेर जातात. ]

दिगंबर : ( स्वतःशीच ) आता हा सुराणा ! गलिच्छ इसम ! नेहमी बघावं, तर दाढी वाढलेली, तेलकट, कळकट तोंड, घाणेरडे कपडे ! सदान्‌कदा नको तिथं खाजवीत असतो. आणि याला दोन दोन बायका मिळतात. त्या याच्यावर प्रेम करतात. याचं सेक्सलाइफ कसं असेल, असा विचार मनात आला, तरी मी अस्वस्थ होतो. खरं तर मला अस्वस्थ होण्याची काय गरज ? पण होतो ..

[ तेवढ्यात चंपू येते. तिने घरातले सगळे काम आटोपले आहे. थोडा वेळ विश्रांतीसाठी ती बाहेर आलेली आहे. ]

दिगंबर : ( आपले काम आवरून ठेवीत ) संपली कामं ?

चंपू : ( बसत ) जरा बसते निवांतशी—

दिगंबर : गंगूकाकी कुठं गेली ?

चंपू : खाली गेल्यात ... मुलींना आणि आईंना बोलवायला !

दिगंबर : म्हणजे आता घरात आपण दोघंच ?

चंपू : भावजी कुठं गेले ?

**दिगंबर** : खाली गेलाय सुराणाबरोबर–सुराणाच्या पहिल्या बायकोच्या दुसऱ्या नवऱ्याला कधी आणि कशी मारपीट करायची, ते ठरवायला..

**चंपू** : ( थांबून ) होतात कुठं इतका वेळ ? एक दिवस तुम्हांला कधी लवकर येता येत नाही..

**दिगंबर** : सुमीकडे गेलो नव्हतो.. ( ती बघत राहते. ) तूच म्हणतेस ना, ' तिघीतिघींचे हुंडे जमवायचेत ... पैसा आणा, पैसा आणा, ' म्हणून ! म्हणून आक्षीकरांकडे गेलो होतो. पाच हजारांची पॉलिसी–पाच खेटा– ( थांबून )... बोरकरांची माणिक सध्या इथं आहे—

**चंपू** : माहेरी आलीय ? का ?

**दिगंबर** : का म्हणजे ? तिनं माहेरी यायचं नाही, की काय ?

**चंपू** : म्हणजे आता आपल्याला भावजींवर सारखं लक्ष ठेवायला हवं !

**दिगंबर** : आत्ता वाडीत शिरता शिरता दिसली...मुलीला घेऊन फिरतेय... मी नसता मूर्खपणा केला—

**चंपू** : तुम्ही बोलला असाल...तुम्हांला बाई म्हटली, की—

**दिगंबर** : बोललो नाही, ग ! नुसता हसलो. पण साली हसली नाही.

**चंपू** : तिनं केलं, ते योग्यच केलं. आपल्याला अक्कल हवी... एवढं रामायण घडल्यावर आपण हसायचंच कशाला तिच्याशी ?

**दिगंबर** : चुकलो ! त्यावर आता आणखी गहजब नको ! (एकदम विचार करीत) जेवणाच्या आधी आणखी एकदा आंघोळ केली असती. ( कपडे काढतो. )

**चंपू** : आंघोळ नको हं ! पिंपात अजिबात पाणी नाहीए–रात्री नळ येईल, तेव्हा पाणी ! तोपर्यंत म्हाताऱ्यांना थोडं पाणी असू दे हातपाय धुवायला !

**दिगंबर** : आंघोळीला पाणी असतं कधी ? ( हसतो—काही तरी आठवून )

**चंपू** : हसायला काय झालं ? ( टाकलेला शर्ट, गंजी उचलून आत जाते. )

**दिगंबर** : ( स्वतःशीच ) एकदा फिरायला गेलो होतो आम्ही...लग्नाआधीची गोष्ट... जुहूच्या समुद्रकिनाऱ्यावर . तिथं चंपू युरोपियन जोडपी पाहात होती पोहताना... त्यांना पाहून चंपूला रोमँटिक कल्पना सुचली होती ( चंपू येते. ) जुहूच्या समुद्र किनाऱ्यावर तू काय म्हणाली होतीस ? ती रोमँटिक कल्पना...

**चंपू** : ( रिकाम्या चेहऱ्याने ) कसली ?

**दिगंबर** : तू म्हणाली होतीस ( तिला कानात सांगतो. )

**चंपू** : ( लाजून, हसत, अंग शिरशिरल्यासारखं करीत ) शी, हो !

**दिगंबर** : तुला आठवतंय हं, चंपू—

**चंपू** : मला नाही काही आठवत !

**दिगंबर** : तुला सगळं आठवतंय, चंपू ! पण तू नखरा करते आहेस ! (चंपू स्वतःशी लाजन

त्याच्या मांडीवर डोकं टेकते व पदर तोंडावर घेऊन झोपते. दिगंबर आता स्वतःशीच ) एक नंबरची डामरट आहे. तिला सगळं आटवतंय. एकदा फिरायला गेलो होतो आम्ही. लग्नाआधीची गोष्ट. जुहूच्या समुद्रकिनाऱ्यावर. तिथं चंपू युरोपियन जोडपी पाहात होती. पोहताना... त्यांना पाहून चंपूला रोमँटिक कल्पना सुचली होती. नवीनच ओळख. म्हणून लाजत लाजत म्हणाली होती, 'यांच्यासारखं निदान शॉवरखाली तरी आपण' . मी आपला खुळा ! त्या एकाकल्पनेनं मोहरून गेलो. दुसऱ्याच दिवशी बाजारात गेलो. शंभर रुपये खर्चून आधी शॉवर बसवून घेतला. त्यानंतर वरच्या टाकीचं पाणी गेलं, ते आजवर कधी आलेलंच नाही. शॉवर तसाच आहे. पण चंपू त्यासंबंधी पुन्हा कधी बोलली नाही. माझ्या मनाचा हिरमोड होईल, म्हणून ! मला पदोपदी जाणवत होतं. लग्नानंतर चंपूचा सगळा रसिकपणा खलास होत होता. ती आपली एकेक इच्छा मारून जुळवून घेत होती. ( तिला हालवून जागी करीत, प्रकट ) तुला आणखी आठवतं, चंपू !

**चंपू :** ( लाजत हसत ) मला आता काही सुद्धा आठवत नाही. तुम्ही गप्प बसा बघू... मला पडू दे जरा निवान्त...

**दिगंबर :** आपण लग्नाआधी हॉटेलात जायचो.. फॅमिली—रूममध्ये... आठवतं ? ( ती बघत राहते...स्वप्नाळूपणे...मंद हसते.) पहिल्यांदा गेलो, तेव्हा मी म्हटलं, 'मला आज गोड, गोड काय देणार ?' ..तू म्हणालीस, 'ते लग्नानंतर ! तोपर्यंत श्रीखंड खा.' ( ती खुदकन् मोठ्याने हसते. ) आठवतं ? ( ती मानेने नाही म्हणते. ) मग तू तुझ्या हाताचं चुंबन घ्यायचीस. आणि हात पुढे करायचीस. मग त्या जागी तुझ्या हाताचं मी चुंबन घ्यायचो...आठवतं ? ( तिच्या जवळ जातो. तिला जवळ घेतो. तिला जवळ घेतो, तिच्या दोन्ही हातांवरून हळुवारपणे हात फिरवतो. हात फिरवीत ) पाहा...त्या आठवणीनं सुद्धा तुझ्या अंगावर रोमांच फुलले आहेत. हे सगळं गेलं आता ! आता कुठलं तरी वेगळंच आयुष्य जगतोय आपण, नाही ?

**चंपू :** ( स्वप्नातून जागी होत ) पुरे ! ऐन वेळी कुणी तरी टपकायचं ! ( आत जाते. )

**दिगंबर :** ( थकलेल्या आवाजात स्वतःशीच) खरं म्हणजे ..आमची सुखं सगळी हरवली. सगळ्यांच्या सुखाचं बघता बघता स्वतःची सुखं बाजूला पडतात.. हिला उसंत आहे कुठं ? तीन मुली. कुठली हगतेय कुठली मुततेय...एकाच वेळी दोघी रडतात. एकीला सर्दी, दुसरीला ताप तिसरीचं तिसरंच काही तरी. मधनंच गंगूकाकींचा चहा ..वसंताचा शिरा... कणेरी आईच्या डोक्याला बाम...मी हिच्या जागी असतो, तर झक् मारतो नवरा, असं म्हणून चक्क पळ काढला असता. लग्न करायचं, ते सुखासाठी. आम्ही केलं लग्न, पण सुख कुठं तरी हरवलं ! आमच्या-सारख्यांनी फक्त दुसऱ्याचे सुखी संसार पाहायचे. भरपूर पैसा, मोठंथोरलं घर ! घरी नोकरमाणसं...पाठीमागं लटांबर नाही ! म्हणून सुमीच्या घरी जातो. तिथं

जावंसं वाटतं...तिथं सगळी सुखं बघायला मिळतात. पण सुमीच्या घरी गेलेलं चंपूला अजिबात आवडत नाही. 'तिकडच्या घरी गेला होतात ?' असं ती मधनं मधनं विचारतेच. मी नाही म्हणतो–खोटंच. पण मला फार बरं वाटतं, तिथं गेलो की ! मोकळं वाटतं...फ्रेश वाटतं ! सुमीचं घर...तिचा नवरा घनश्याम ..

[ काळोख ]

[ प्रकाश ]

[ घनश्यामचे घर. सुमी फोन करते आहे. फोनवर ती आपल्या मैत्रिणीशी नेलपॉलिश, साड्या वगैरेसंबंधी बोलते आहे... ती रूपाने सुंदर, गोरी, अंगाबांध्याने किंचित स्थूल व मादक आहे. तिच्या सगळ्या हालचालीं-तही लाडिकपणा आहे. बोलण्यातसुद्धा.

घराचा मुख्य दरवाजा उघडा आहे. त्यातून दिगंबर येतो. तो मनाने उत्साहित आहे. खरे म्हणजे तो ज्या ज्या वेळी सुमीच्या घरी येतो, त्या त्या वेळी त्याचा आवाज वरचा असतो. मनाने तो उत्साहपूर्ण आणि उत्तेजित असतो. स्वतःच्या घरापेक्षा तो या घरी अधिक मोकळा आणि आनंदी असतो. दरवाज्यातून येता येताच तो ओरडत येतो. ]

**दिगंबर :** सुमी सुमी ए, सुमे...काय म्हणतेस ? बंड्या कुठं गेला ?

**सुमी :** ( फोन खाली ठेवीत हसत ) बंड्या गेलाय नरहरीबरोबर. बस ना.

**दिगंबर :** आज अगदी सकाळी सकाळीच तयार ?

**सुमी :** क्लबवर जायचं, रे ! तुझ्या लेकी काय म्हणताहेत ? थोरली पहिलीत ना ?

**दिगंबर :** थोरली शाळेत जाते, म्हणून चंपूला थोडी मोकळीक आहे. धाकट्या दोघी म्हणजे चंपूची नुसती वाट लावताहेत.

**सुमी :** अरे, बाबा; जुळ्या मुली म्हणजे आईची वाटच ! चंपू म्हणूनच टिकलीय. (एकदम वेगळ्या आवाजात ) पण काय, रे, दिगप्पा ! मी म्हणते, तिला जुळ्या मुली झाल्याच कशा ?

**दिगंबर :** कर्म आपलं. आई म्हणते, चंपूनं जुळं केळं खाल्लं !

**सुमी :** ( हसत ) मग केळी तरी घेऊन यायचं. दोन पोरगे झाले असते.

**दिगंबर :** ( लाजून ) तू म्हणजे, सुमे, तोंडानं नुसती फटकळ आहेस !

**सुमी :** ( गमतीने ) मग ? मुलगा व्हावा, म्हणून तुझी चाललीय, की नाही धडपड ?

**दिगंबर :** ( ओशाळून ) बाई, ग ! ( हात जोडतो. ) आता तो विषय नको. तुझा पैलवान कुठं गेला ?

**दिगंबर :** मी तुला टॅक्सीत लेक्चर दिलं, की हे असलं बरं नव्हे! आपण नीट विचार करून मनातल्या मनात ब्रेक्स् लावले पाहिजेत, वगैरे...

**सुमी :** (त्याच्या अगदी जवळ येत) खरं म्हणजे, दिगप्पा, तू विमा-एजंट कसा झालास, कुणास ठाऊक!

**दिगंबर :** का ?

**सुमी :** तू स्पेअरपार्टस्‌चं दुकान वगैरे घालायला हवं होतंस...ब्रेक्स् वगैरे विकायला.

[ दोघेही मोकळेपणाने हसतात. ]

**दिगंबर :** (जुना धागा पकडून) मी तुला त्यावेळी सांगितलं. 'सुमी, हे बरं नव्हे! अशानं तुला सवय होईल. पुढं तुला जो कोणी नवरा मिळेल, त्याच्याशी प्रतारणा होईल. माणसाला संयम हवा. रिस्ट्रेण्ट हवा...दुसऱ्याला काय वाटेल, याचा विचार करायला हवा...'

**सुमी :** तू 'त्या' वेळी काय बोललास, ते सांगतोहेस ना?

**दिगंबर :** हो–

**सुमी :** मग आत्ता दरडावल्यासारखं का बोलतो आहेस?

**दिगंबर :** (हसतो. थोडा थांबून) त्यावेळी मला वाटतं, मी खूप चांगलं बोललो होतो. तुझ्यावरही तात्काळ परिणाम झाला होता.

**सुमी :** कशावरून?

**दिगंबर :** त्यावेळी तू तसं म्हणाली होतीस... 'दिगप्पा, तू आज मला सावरलंस, आज मी खूप अस्वस्थ होते... रादर एक्सायटेड्... असं होतं कधी कधी ..' (ती मान वाकडी करून गालांतल्या गालात हसत दिगंबरला बघत उभी राहते.) अजूनही होतेस का, ग, तशी एक्सायटेड्?...अस्वस्थ...मधूनमधून?

**सुमी :** (एकदम लाडात येऊन मोठ्याने ओरडते) घनश्याम, तू खाली ये बघू. हा बघ फाजील फाजील बोलतोय– चावट कुठला! (हसते व जीभ बाहेर काढते.)

**दिगंबर :** (गडबडतो, तिला गप्प करीत) सुमे, मॅड आहेस...अक्कल कमी तुला एक कानफटात देईन.. आधीच तो येडपट संशयी!

**घनश्याम :** (माडीवरूनच) सुमी, कोण आलंय, ग, खाली?

**सुमी :** दिगप्पा आलाय– दिगप्पा...पुरे झाला तुझा व्यायाम– तू खाली ये–

**घनश्याम :** (वरून) बैस, रे, दिगप्पा, आलो मी खाली!

**सुमी :** बैस तू, दिगप्पा! मी चहा करून आणते! (जाते).

**दिगंबर :** (हसत हसत किंचित तल्लीन होतो आणि स्वतःशीच बोलू लागतो.) इथं आलो ना, की मन अगदी सुखावून जातं...खूप बरं वाटतं. सुमीच्या हातचा

चहा, म्हणजे सालं ते अमृतच ! आणि चहा पिता पिता पुन्हा ती नेहमीसारखी शेजारी बसली आणि पाय हलवीत तिरक्या मानेनं पाहू लागली, (छातीवर दोन्ही हातांची घडी घेतो आणि मान तिरकी करतो... ) बोलू लागली, की मग झालंच ! 'सुमे, मला आणखी चहा हवा तुझ्या हातचा—तुझ्या हातानं...' म्हटलं, म्हणजे आपण काय तिला हात लावीत नाही. पण त्याला तसं काही तरी वाटत असावं... असावंच, असंही नाही. त्या एका बाबतीत कुणाच्या मनातलं काही कळणार नाही. तसं तो भासवतो, असं नाही...पण कधी कधी एकदम आक्रसल्यासारखा होतो .. त्या साल्याला एकदा सॅन्फोराइज करायला पाहिजे. माणसानं इतकं संशयी राहू नये. निदान माझ्यासारख्याच्या बाबतीत तरी ! साल्या, तुझं लग्न ठरवलं कुणी ? मी नुसतं म्हणायची खोटी– सुमीनं मला 'हो' म्हटलं असतं. तू नुसताच जन्मभर बोंबलत बसला असतास...पण आपल्याला सुमी झेपणारी नव्हती.. सगळ्याच दृष्टींनी ! सुमीला घर कसं हवं–राजाराणीचं ! ती आणि नवरा ! आणि त्यातन पुढं काही होईल, ते ! आमच्या कपाळी परमेश्वरानं लटांबर ठेवलंय. गंगूकाकी, आई, वसंता, आबा...सगळी तिरपागडी माणसं...

[ तेवढ्यात घनश्याम येतो. तो सफेद फुलपॅंट, गंजीफ्रॉक घालून, व अंगाभोवती टॉवेल गुंडाळून येतो. ]

**घनश्याम** : ( दिगंबरच्या पाठीवर भलीमोठी थाप मारीत ) कसं काय, दिगप्पा ? हल्ली आहेस कुठं ? आज खूप दिवसांनी आलास ?

**दिगंबर** : अरे, वेळ कुठं आहे ? घरच्या एकेक कटकटी केवढ्या आहेत ?

**घनश्याम** : बाकी तुझ्या घरी कटकटीच खूप !

[ दिगंबर घनश्यामच्या पाठीवर थाप मारतो. तो एकदम अंग काढतो. कारण त्याची पाट दुखत असते. ]

**दिगंबर** : काय झालं ?

**घनश्याम** : अरे, पाठ दुखतेय–

**दिगंबर** : कशानं ?

**घनश्याम** : तुझा तो व्यायाम ! पोट कमी व्हायच्या ऐवजी पाठ दुखायला लागली.

**दिगंबर** : इथं आडवा पड–

**घनश्याम** : आता काय करतोस ?

**दिगंबर** : बघतो तुझ्या पाठीला काय झालंय, ते– ( मसाज करीत ) बाहेर नवीन गाडी उभी आहे. ती तुझीच ?

**घनश्याम** : हो !

**दिगंबर** : आणि जुनी काय केलीस ?

**घनश्याम** : ती बाईसाहेबांना दिली ! हल्ली तिच्या सोशल ॲक्टिव्हिटीज् वाढल्यात... कुठला विमेन्स क्लब...त्यांच्या सहली...

**दिगंबर** : (स्वतःशीच) सुमीनं माझ्याशी लग्न केलं असतं, तर तीन मुलींच्या अंगावर हात टाकून जमिनीवर झोपली असती—

**घनश्याम** : अहाहा ! काय बरं वाटतंय, रे...दिगप्पा—

**दिगंबर** : न वाटायला काय झालं ? च्यायला, श्रीमंती दुखणी तुमची ! पाठ धरतेय ! मी बब मैल मैल चालतो ! व्यवस्थित व्यायाम करतो...ढिम्म काही होत नाही.

**घनश्याम** : सुखी, रे, बाबा, तुम्ही !

**दिगंबर** : आणि तुम्ही दुःखी ! पैसा आहे ना ढीगभर !

**घनश्याम** : पैशावरच्च सुख असतं, असं नाही काही !

**दिगंबर** : नाही कसं ? अशी मोटार मी का घेऊ शकत नाही ?

**घनश्याम** : मोटारीत सुख असतं, असं कोणी सांगितलं ?

**दिगंबर** : तू आता एखाद्या स्वामीसारखं बोलू नकोस. (स्वतःशीच) आज माझ्याकडे पैसा असता, तर मी मोठी जागा घेतली असती. गंगूकाकी ..वसंता...आई यांना वेगळी खोली दिली असती. आया ठेवली असती, आईच्या हातापायांना तूप चोळायला

**घनश्याम** : वसंता काय म्हणतोय ?

**दिगंबर** : काय म्हणणार ? जन्माची जोखीम झालीय माझ्या कपाळावर . उद्या गंगूकाकी मेली, म्हणजे त्याचं कोण बघेल... ?

**घनश्याम** ' गंगूकाकीला वसंताचं फार, नाही ?

**दिगंबर** : फार म्हणजे काय ? कमालीचंच ! तिला वाटतं, वसंताच्या रूपानं काकाच जन्माला आलेत. तो थोडासा दिसतो मात्र काकांसारखा. म्हणजे फोटोवरून. आम्ही कुठं पाहिलंय आमच्या काकांना ?... त्यांचं लग्नं झालं, त्याच रात्री काका वारले मोटार–अपघातात. सगळी माणसं बसमधली वाचली...एकटे काका गेले. म्हणजे नशीब किती गांडू असलं पाहिजे, बघ. तीही मेली असती, तर सुटली नसती ?

**घनश्याम** : मला आश्चर्य वाटतं एका गोष्टीचं ..

**दिगंबर** : कुठल्या ?

**घनश्याम** : खरं म्हणजे गंगूकाकीचा आणि तुमच्या घराचा तसा संबंध काय ? काकांचा तिला कधी स्पर्श सुद्धा झालेला नाही. पण इतकी वर्षं लोटली.. ती कुठल्या श्रद्धेनं तुमच्या घरात मिसळून गेलीय ? नाही ? एवढी म्हातारी झालीय, तरी वसंतासाठी केवढा जीव टाकते !

**दिगंबर** : म्हणून गंगूकाकी असेपर्यंत काळजी नाही. पहिल्या रात्री तो व्हायोलंट झाला, तर ही सरळ त्याच्यापुढे गेली...आणि त्याचं डोकं मांडीवर घेऊन त्याला झोपवायला लागली, ' म्हणते ना...पूर्वजन्मीची कौतुकं करून घ्यायची कामं. ' तिला मनापासून वाटतं, की वसंता हा काकांचा पुनर्जन्म आहे...काकांना शिरा आवडायचा...कणेरी आवडायची...

**घनश्याम** : कणेरी म्हणजे ?

**दिगंबर** : रव्याची खीर. त्याला शिरा खायला घालते...आणि कणेरी . तोही आवडीने पितो. ( कपाळावर हात मारीत ) तिला एकदा हुबळीला नेऊन आणायचीय ..

**घनश्याम** : हुबळीला ? का ?

**दिगंबर** : सिद्धारूढ स्वामींच्या पायांशी, ते सुद्धा का ? तर काका आमचे सिद्धारूढ स्वामींचे भक्त होते, म्हणून ! आहे, की नाही ?

[ तेवढ्यात सुमी चहाचा ट्रे घेऊन येते. दिगंबराच्या शेजारी बसते. कपामध्ये चहा ओतून प्रत्येकाला चहा देते. हे करीत असताना...]

**सुमी** : काय, रे, दिगप्पा ? हल्ली ती तुझ्या वसंताची प्रेयसी...कोण ती ?

**दिगंबर** : बोरकरांची माणिक...

**सुमी** : हां...हां...ती हल्ली कुठं असते ?...

**दिगंबर** : मसणात ! आलीय सध्या माहेरी. मला तिचीच भीती !

**सुमी** : का ?

**दिगंबर** : समोरच माहेर तिचं...तिला बघून हा पुन्हा डोकं फिरवून घ्यायचा...

**घनश्याम** : बाकी ती बाई नीच असली पाहिजे. सगळं ठरवून सवरून..

**दिगंबर** : ठरवून म्हणजे ?.. वसंताला मेडिकलला जायचं होतं. तर म्हणाली, ' मेडिकलला जाऊ नकोस. मला डॉक्टर नवरा आवडत नाही. ' म्हणून तो इंजीनियरिंगला गेला..

**सुमी** : आणि बघ ना...मेलीनं शेवटी त्याला फसवून आपण लग्न केलं, ते एका डॉक्टरशीच. कोण तो ?

**दिगंबर** : डॉक्टर पाटकर.

**सुमी** : दिसायला बरा आहे ?

**दिगंबर** : बरा आहे !

**सुमी** : मग हरकत नाही !

**दिगंबर** : पण मग प्रेमाला अर्थ काय ? तो वसंतापेक्षा दिसायला बरा, पैशानं श्रीमंत... म्हणून त्याच्याबरोबर लग्न ?

[ सुमी दोघांना चहाचे कप देते. स्वतःच्या कपातला एक घोट घेऊन कप खाली ठेवते. आणि दोन्ही हातांची घडी छातीवर येते. पायावर पाय टाकते आणि पाय हलवीत तिरक्या मानेने दिगंबरकडे पाहते. दिगंबर एकदम थांबून तिच्याकडे बघतो, तोच... ]

**घनश्याम :** काय कुणाच्या मनात असतं, काही कळणार नाही. आबांचं बघ ना?

**सुमी :** आबा कोण?

**घनश्याम :** दिगप्पाचे वडील, ग! हल्ली असतात कुठं?

**दिगंबर :** कोण जाणे! कुठं कुठं भटकत असतात. पायावर चक्र आहे! कधी चुकून येतात.. दोन दिवस राहतात! म्हणतात, 'केरळात होतो... मिरीचा व्यापार केला...' कधी म्हणतात, 'वऱ्हाडात होतो...कापसाचा व्यापार केला..' खरं काय, कोण जाणे.

**सुमी :** येतात, तेव्हा काही आणतात तरी?

**दिगंबर :** आईला एक लुगडं आणि काकीला एक लुगडं! बस्स!

**घनश्याम :** पण त्यांचं झालं काय?

**दिगंबर :** कोण जाणे! आई कधी बोलत नाही. काकी काही सांगत नाही. एकदा आईला आबांनी पीटपीट पिटलं आणि निघून गेले, ते गेले... किती वर्षे झाली. ( करकरा केस खाजवीत वैतागाने ) जाऊ दे! त्या घरच्या कटकटी नकोत—

**सुमी :** घनश्याम, अरे, आपल्या लक्षात सुद्धा नाही ..

**घनश्याम :** काय ते?

**सुमी :** आल्या आल्या दिगप्पानं आठवण केली

**घनश्याम :** कशाची?

**सुमी :** आज आठ डिसेंबर, आज तू मला मागणी घातली होतीस!

**दिगंबर :** मग दिवस साजरा करायचा?

**घनश्याम :** आण जा बिअर... बिअर पिण्यासाठी हा दिगप्पा कशाकशाची आठवण करून देईल! ( सगळे हसतात. ) आण जा बिअर.. नरहरी कुठं गेलाय?

**सुमी :** ( आत जात ) तो बंड्याला घेऊन गेलाय.. ( जाते. )

**दिगंबर :** तुला ती मोठी एजन्सी मिळणार होती, त्याचं काय झालं?

**घनश्याम :** फारमासिटिकल इंडियाची एजन्सी ना? मिळाली. संबंध महाराष्ट्र आणि गुजरात.

**दिगंबर :** कॉंग्रॅच्युलेशन्स्! ( हस्तांदोलन करतो. ) ही एजन्सी मिळाल्यावर तू पन्नास हजारांची पॉलिसी घेईन, म्हणाला होतास—

**घनश्याम :** डन्! घेतली! तुझे विम्याचे फॉर्म्स् वगैरे आण मेडिकल घे ( मेजावरची पत्रे बघत ) ही सुमी म्हणजे गधडी आहे!

[ तेवढ्यात सुमी बिअर घेऊन येते. ]

**सुमी** : काय झालं ?

**घनश्याम** : सुमी, हे आमंत्रण अजून इथंच...

**सुमी** : ( एकदम जीभ बाहेर काढीत ) गेल्या रविवारी दिगप्पा आला नाही ना, म्हणून तसंच राहून गेलं.

**घनश्याम** : हे तुझं इन्व्हिटेशन... आठ दिवसांपूर्वी लिहिलेलं !... ( ते देत ) हे बघ, दिगप्पा, येत्या शनिवारी संध्याकाळी इथं यायचंस तू...मोठी पार्टी आहे !

**सुमी** : पण एकट्यानं नाही हं ! चंपाला घेऊन यायचं...कित्येक महिने आलेली नाही ती—

**दिगंबर** : काही विशेष ?

**घनश्याम** : फारमासिटीकल इंडियाचा बिझनेस मॅनेजर फझलूर रेहमान... त्याला बोलावलंय... आला होता इथं दोनदा. ए व्हेरी गुड मॅन ! आय विल गेट ए रिअल गुड व्हॉल्यूम ऑफ बिझनेस...! तू ये...चंपाला आण मात्र...

**दिगंबर** : ओ, येस्. जरूर येईन. (वेगळ्या सुरात) रेहमान विमा उतरतो का बघ.. ना...

**घनश्याम** : बघू... बघू...तू ये तर खरा—

**सुमी** : तो आहे अनमॅरिड ! त्याला विमा कशाला ?

**दिगंबर** : उलट, त्यालाच विम्याची अधिक गरज ... मी त्याला पटवून देईन—

**घनश्याम** : आयुर्विम्याला पर्याय नाही. ( सगळे हसतात. ) तू असं कर, तू अर्धा तास लवकर ये. सात वाजता ये रेहमानलाही मी सगळे लोक यायच्या आधी बोलावलाय...त्यावेळी बोलण्याच्या ओघाओघात तुझ्या पॉलिसीचे बोलू, हं ?

**दिगंबर** : येईन मी लवकर ! ( बिअरचा ग्लास घेत ) हिअर इज टु ए व्हेरी व्हेरी हॅपी मॅरिड लाईफ—

[ सर्वजण ग्लासेस् वर करतात आणि काळोख. ]

[ प्रकाश ]

[घनश्यामचे घर. सायंकाळची वेळ. लॉनकडची बाजू बारीक दिव्यांनी सजवलेली आहे. त्या बाजूला काचांची एक मोठी भिंत आहे. त्या काचांवर रंगीरंबेगी मंद प्रकाश दिसतो. नरहरीची धावपळ चालली आहे. तो मद्याच्या बाटल्या, ग्लासे, सोड्याच्या बाटल्या वगैरे लॉनच्या दिशेला

**दिगंबर** : तू ?
**सुमी** : मग ?
**दिगंबर** : जेवण तर बाहेरनंच ऑर्डर करतेस—
**सुमी** : तुम्हां पुरुषांना काय कळणार ? होय, की नाही, ग, चंपू ?...क्रोकरी, ग्लासेस्, सर्व्हिएट्स्...साठ लोकांची व्यवस्था म्हणजे काय चेष्टा आहे ?
**चंपू** : साठ लोक बोलावलेत ?
**सुमी** : अग, महिन्यातनं अशी एक पार्टी केली ना, की सगळी ऑब्लिगेशन्स् संपतात—

[ लॉनकडून घनश्याम रेहमानला घेऊन येतो. रेहमान दिसायला ओबडधोबड आहे. काळा ओबडधोबड दगड छिनल्यासारखा. पक्की मूर्ती करण्याआधी दगडाला नाक, कान, डोळे, ओठ यांचा अर्धवट आकार यावा, तसा. जरासे रुंद, पण उभट नाक, रुंद चेहरा. जाड ओठ. घारे डोळे. तो वर्णाने काळा असल्यामुळे त्याचे घारे डोळे जरा विचित्र भेदक दिसतात. उभे केस, भांग पडणार नाही, असे. गवतासारखे. तब्येत सॉलिड. हाडांची, खांद्यांची रुंद चौकट. एकूण ढाणकस अंगाचा. ]

**घनश्याम** : ( आत येत ) कम इन्, रेहमानजी ! सुमी, रेहमानजी इज् हिअर—
**रेहमान** : हॅलो, सुमी, हाऊ आर् यू ?
**सुमी** : हॅलो, रेहमानजी ! वेलकम् वेलकम् होम ! हाऊ आर् यू ?
**घनश्याम** : अँड मीट माय फ्रेंड...मिस्टर दिगंबर सबनीस अँड मिसेस् सबनीस ..

[ दिगप्पा आणि रेहमान हात मिळवतात. चंपू नमस्कारासाठी उठताना पडते. ]

**रेहमान** : बैठिये .बैठिये !
**सुमी** : रेहमानजी, वॉट डु यू लाइक् टु हॅव ?
**रेहमान** : अरे भाई, सब लोगोंको आने दो—
**सुमी** : ( लाडिकपणे ) नाही ..नाही ! आमचे घसे कोरडे पडलेत—
**रेहमान** : तो मग चालेल... चालेल... ( त्याच्या मराटीला सगळे हसतात. ) अरे, हसते काय ? मुंबई महाराष्ट्राची आहे...मुंबईत ऱ्हायाचा, तो मराठी तो आलाच पायजे...( सुमी मद्य आणायला गेलेली असते .रेहमान घनश्यामला विचारतो. ) वॉट डज् मिस्टर सबनीस डु ?
**घनश्याम** : ही सेल्स इन्शुरन्स—

**रेहमान :** ( थोडा नाटकी आहे... डोक्यावर हात मारून घेत–) ओऽऽ, माय् गॉड ! ही सेल्स इन्शुरन्स .. भागो... भागो... ( जागच्या जागी पळ काढल्याचा अभिनय करतो. ) आपण तो लई वाबरते...

**सुमी :** ( ड्रिंक्स् आणीत ) वाबरू नका ! ड्रिंक्स् घ्या—

**रेहमान :** ( ग्लास घेत ) चीअर्स... चीअर्स... सुमी, वाह ! घर तो बहोत अच्छा सजाया है !

**सुमी :** ( थोड्या लाडीक आवाजात ) मग ? तुम्ही येणार ! करायला नको ?

**रेहमान :** एक्सक्यूज् मी, सुमी ! ( घनश्यामला बाजूला नेत ) आर् यू ब्रिंगिंग द पेपर्स ऑन् मंडे ?

**घनश्याम :** ( बाजूला जात ) सी... देअर इज् वन थिंग...

[ दोघेही कोपऱ्यात जातात आणि आपल्या व्यवसायासंबंधी बोलतात. ते ऐकू येत नाही. काही कागदपत्र दाखवतात वगैरे. ]

**सुमी :** ( ड्रिंक्स् देत ) घे, रे, दिगप्पा... घे, ग, चंपू !

**चंपू :** हे काय आहे ? ( ग्लास घेते. )

**सुमी :** नारळाचं पाणी ! ( ती आणि दिगप्पा हसतात. ) हं, घ्या ! ( चंपू पीत नाही. ) चंपू, तू काय सत्यनारायणाच्या पूजेला आली आहेस, की काय ?...चल पी—

**चंपू :** मी पीत नाही, ग !

**सुमी :** म्हणूनच तुला मुलगा होत नाहीए– ( चंपू पीत नाही. ) मुळीच चालायचं नाही...पी बघू तू काही हळदीकुंकवाला आलेली नाहीस.

**चंपू :** अग, पण मी कधीच घेतलेली नाही—

**सुमी :** मग आता सुरुवात कर. मी बंघ–(एक घोट घेते.) एऽ, दिगप्पा, सांग ना हिला—

**चंपू :** खरंच नको, ग, सुमी—

**सुमी :** तुला मांडीवर घेऊन पाजू का ? ( चेष्टेने हसत ) की तू पाजतोस, दिगप्पा ?

**दिगंबर :** घे ग, चंपू ! एक गंमत. नेहमी कोण देतोय ? घे घे !

**सुमी :** ( जबरदस्ती करीत पाजते. ) आस्सं ! हा घोट काऊचा. हा घोट चिऊचा. हा घोट दिगूचा...

**दिगंबर :** ( चंपूला ) आता कसं वाटतं ? काही झालं ? उगाच घाबरतेस ! जरा मिक्स व्हावं !

**चंपू :** ( काल्पनिक तारेत ) विमान विमान... ( हाताचे बोट हवेत वाटोळे फिरवीत )

विमान सुटतंय !

**घनश्याम** : कम् ऑन, लेट् अस् जॉइन मिस्टर अॅड मिसेस् सबनीस–( वळतात. )

**रेहमान** : ( दिगंबर–चंपू बसलीत, तेथे येत ) अभी जो मैंने कहा, वो सब ठीक हो जायेगा–( चंपूच्या जवळ येत ) मे आय् जॉइन यू , मिसेस् सबनीस ?

[ चंपू त्याच्या तोंडाकडे बावळटपणे बघते... किंचित हसते. दिगंबर 'येस्...येस्... सिट...सिट...' म्हणतो.
चंपू एकदम तोंडात जिन ओतते. तिला ठसका लागतो. ते बघून रेहमानला हसू येते. ]

**दिगंबर** ( जरा ओशाळून ) असं एकदम प्यायचं नसतं. लिंबू–सरबत नव्हे ते. ( रेहमान मंद हसतो. त्याला उद्देशून ) पहिलेही दफे पी रही है..

**रेहमान** : अच्छा ? जरा हलू हलू पीना, देवीजी ! यू आर् नॉट दी ओन्ली टीटोटलर, मिसेस् गोखले भी पीती नहीं ! मिस्टर गोखले भी कहाँ पीता है ?

**दिगंबर** : हे गोखले कोण ?

**रेहमान** : फार्मासिटिकल इंडिया के चीफ अकौंटंट..

**घनश्याम** : ही इज् व्हेरी गुड अकौंटंट. दोघेही आज येणार आहेत.

**रेहमान** : मिस्टर इराणीका ट्रस्टेड आदमी है !

**दिगंबर** : इराणी कोण ?

**घनश्याम** : फार्मासिटिकल इंडियाचे मॅनेजिंग डायरेक्टर.

**रेहमान** : ( डोळे मिचकावीत ) ...और मिसेस् इराणीका हसबंड ! ( रेहमान व घनश्याम हसतात. )

**दिगंबर** : ( आशेने हसत ) तेही आज येणार आहेत ? ते इन्शुरन्स... ( सगळे एकदम हसतात. )

**रेहमान** ओऽऽ ! यू आर् ए हार्डसेलींग इन्शुरन्स एजंट...आय् मस्ट से दॅट ! (हसतो.) सबनीससाब, आप कितने बरसों से इन्शुरन्स का बिझनेस कर रहे हैं ?

**दिगंबर** · दस साल हुए !

**रेहमान** : कितना बिझनेस हुआ ?

**दिगंबर** : कुछ खास नहीं, लेकिन अभी अभी हो रहा है !

**रेहमान** : गुड्...व्हेरी गुड् !

**घनश्याम** : ( दिगंबरचे खांदे थोपटीत ) पकडो...पकडो रेहमानजी को !

[ असे म्हणत हसतो आणि उठतो. आता लॉनच्या दिशेने माणसे जमल्याचा, त्यांच्या गप्पागोष्टींचा आवाज ऐकू येतो आहे. ]

रेहमान : सच ! मैं लूँगा आपके पाससे... आय् विल बाय् सम इन्शुरन्स फ्रॉम यू...
दिगंबर : थॅक्यू...थँक्यू व्हेरी मच, रेहमानजी !

[ नरहरी येतो आणि बाहेर माणसे आली आहेत, गोखले आलेत, असं सांगतो. ]

सुमी : ( रेहमानला ) हाऊ डु यू लाइक द म्युझिक ?
रेहमान : आप जो भी करेंगी–हमें पसंद आयेगा... ..
सुमी : देन हाऊ डु यू लाइक माय ड्रेस ?
रेहमान : चार्मिंग... चार्मिंग !
सुमी : ( घनश्यामला ) माझा ड्रेस यांना आवडला—
घनश्याम : छान छान...! रेहमानजी, नॉऊ लेट् अस गो ऑन दी लॉन्स. लोकं जमायला लागलीयत. मिस्टर ॲण्ड मिसेस् गोखले हॅव कम्.
रेहमान : ओ... मिस्टर ॲण्ड मिसेस् गोखले हॅव कम्...कम ऑन, मिस्टर सबर्नीस !

[ घनश्याम, रेहमान आणि दिगंबर जाऊ लागतात. चंपू तोल सावरीत मागे राहते. ते बघून दिगंबर मागे वळतो. घनश्याम, रेहमान लॉनवर जातात. ते अदृश्य होताच सर्वांचा हलकल्लोळ उठल्याचा आवाज ऐकू येतो. तो आवाज संपता संपता—]

चंपू : ( तोल सावरीत ) आपण जाऊ या का घरी ? ( तिचे बोलणेही जड झाले आहे. )
दिगंबर : ( आश्चर्य करीत ) घरी ? अग, आत्ता कुठं आपण आलोय. अजून घड प्यालो नाही. जेवलो नाही.
चंपू : ( जड आवाजात अडखळत ) पण आपण जाऊ या.
दिगंबर : का ?
चंपू : घरी त्या तिघी रडत असतील. पोरी, हो—
दिगंबर : काही रडत नाहीत. दोन दोन आज्या घरी आहेत.
चंपू : त्या झोपतील.
दिगंबर : कोण ?
चंपू : आज्या.
दिगंबर : तू भलत्या काळज्या करीत बसू नकोस. तू चल... त्या गोखलेबाईंबरोबर बोलत बस....

[ दोघेही जातात.

मंचावरचा प्रकाश जरा मंद होतो. लॉनकडील काचांवर पार्टीत जमलेल्या लोकांच्या सावल्या दिसू लागतात. हालचालींसह. पार्टीचे पाश्चिमात्य संगीत अर्धवट काळोखातच ऐकू येते. पार्टी ऐन रंगात आल्याचे आवाज. हसणे, खिदळणे, चीत्कार, किंचाळणे, वगैरे.

मग पार्टी संपवून लोक परत जात असल्याचे आवाज. 'थँक्यू व्हेरी मच...' 'बाय् बाय्'... 'गुड नाईट...' वगैरे.

प्रकाश येता येता चंपू तोल सांभाळीत येताना दिसते. दिगंबर तिला धरून आणीत आहे. त्याचाही तोल लटपटतो आहे. ]

**चंपू :** ( येता येता थांबत थांबत ) तुमचं हे मला मुळ्ळी आवडत नाही.
**दिगंबर :** काय ?
**चंपू :** काय फाजीलपणा चालवला होता तुम्ही ! प्रत्येक बाईचा हात हातात धरून कशाला हलवायला पाहिजे ? आणि किती वेळ त्यांचे... बायकांचे हात हातात दाबून धरीत होता ? बरं दिसतं का ?
**दिगंबर :** अग, ही पार्टी होती. कीर्तन नव्हे !
**चंपू :** हो, पार्टी ! अशानं मी उठेन आणि चालायला लागेन.

[ चालायचा प्रयत्न करते, तोच तोल जातो. ]

**दिगंबर :** अग, आता संपलीय पार्टी... सगळी माणसं गेली.
**चंपू :** रेहमान गेला ?
**दिगंबर :** शू .. हळू. तो आहे तिथं. त्याचं काय ? ( मागे वळून बघतो. ) तू फार घेतलीस, चंपू.
**चंपू :** त्या सुमीनं आणि मिसेस् इराणीनं आग्रह करकरून पाजली, हो, मला. मला चढलीय, नाही ? . फार नाही. ती सुमी फार पिते, हो.. अट्टल दारूडी आहे.
**दिगंबर :** ती नेहमी पीत असली पाहिजे. तिला सवय आहे. पण ती दारूडी नाही काही.
**चंपू :** प्याल्यावर बरं वाटतं, नाही ? ( रेंगाळत, तोल जातो. ) आपण रोज पिऊ या !
**दिगंबर :** हो हो... आज फुकटचं मिळालंय, तेवढं पुरे.

चंपू : तुम्ही सबनीस म्हणजे काय... फुकटचं मिळतं, ते बघणार.
दिगंबर : हो... हो. जरा स्वस्थपणे बस बघू—
चंपू : त्या रेहमानचे डोळे पाहिलेत ?
दिगंबर : का ?
चंपू : वेगळेच आहेत, नाही ?
दिगंबर : वेगळे, म्हणजे कसे ?...... वेगळे, म्हणजे कसे ?
चंपू : कोण जाणे. पण वेगळेच आहेत. (मान खाली करून त्याचे डोळे कसे आहेत, ते दाखवण्याचा प्रयत्न करते.)

[ रेहमान, घनश्याम आणि सुमी येतात. ]

दिगंबर : (चंपूला कोचावर बसवीत) तू गप्प बस इथं—
रेहमान : मिस्टर सबनीस, आय् ॲम् डॅम सीरियस. मी तीन लाखांची पॉलिशी घेईल !
दिगंबर : तुमच्या मागे किती मोठमोठे एजंट असतील ..
रेहमान : सो व्हॉट ? आय् गो बाय इंटयुइशन... मेरी मर्जी का सवाल है। आप मुझे मिलिये।
दिगंबर : थॅक्यू व्हेरी मच... (हे बोलणे चालू असताना चंपू मान वाकडी करून रेहमानला एकाग्रतेने पाहते आहे, हे दिगंबरच्या लक्षात येते.) चंपू, तू बसून घे बघू. कुठं बघते आहेस ?
चंपू : मी कुठं बघतेय ?

[ पाठीमागे एका खुर्चीत लवंडून झोपी गेल्यासारखी बसते. ]

रेहमान : हाऊ आर् यू, मिसेस् सबनीस ? (किंचित हसत) मिसेस् सबनीस सीम्स् व्हेरी हॅपी ! हां, तो सबनीसराव, आप पेपर्स लेके आना मैं इन्शुरन्स लूँगा.. तीन लाख का !
सुमी : (त्याच्या जवळ जात) व्हाय डु यू वॉण्ट टु इन्शुअर ? (दिगंबर कपाळावर हात मारतो.) आपको इन्शुरन्स की जरुरतहि क्या है ?
रेहमान : व्हाय ? मुझे बुढापे में कौन सम्हालेगा ? मैं अकेला हि हूँ, सुमी !
सुमी : मैं हूँ ना !
रेहमान : ॲंड युवर हजबंड ?
घनश्याम : सुमी... (तिला थोपटत) सुमी...

**सुमी :** ( एकदम घनश्यामला बिलगत ) यू आर् माय स्वीटहार्ट, माय डार्लिंग हस्बंड !
**घनश्याम :** सुमी, इकडे ये–( तिला जरा बाजूला नेत ) फार होतंय, सुमी. म्हणून एवढं पिऊ नये.

[ हे चालू असताना रेहमान झोपलेल्या चंपूकडे बघत हसतो. ]

**सुमी :** असं, रे, काय ? तुझा बिझनेस कॉण्टॅक्ट म्हणून मी त्याला चार्म करतेय !
**रेहमान :** ( चंपूकडे पाहात ) मिसेस् सबनीस तो सो गयी...शी इज...चार्मिंग !
**सुमी :** ही तर काहीच नाही. पार्टीतलं सगळ्यांत चार्मिंग कपल कुठलं होतं, माहीत आहे ?
**रेहमान :** मिस्टर ॲंड मिसेस् इराणी ?
**सुमी :** नहीं ! मिस्टर ॲन्ड मिसेस् गोखले ! ( सगळे टाळ्या वाजवतात. सुमी गोखले दांपत्याची नक्कल करून सर्वांना हसवते. )–टू नॉन–ड्रिंकर्स. गोखले आले, तेच मुळी छत्री घेऊन. घनश्यामनं विचारलं, ' छत्री कशाला ? ' गोखले म्हणाले, ' काल याच वेळी पाऊस पडला होता. असलेली बरी. ' मिसेस् गोखलेनी त्यांना छत्री कुठं ठेवायची, ते सांगितलं. आणि म्हणाल्या, ' जाताना आठवणीनं घ्या. नाहीतर विसराल. ' मग माझ्याकडे बघून हसल्या. ( हसून दाखवते. ) आणि म्हणाल्या, ' अहो, जरा उशीर झाला, म्हणजे काय ? आधी पाणी भरून ठेवलं. मग चिंता नाही, पार्टीला उशीर झाला, तरी. आमच्याकडे नळ रात्री येतो. आणि हे बघा तुम्हांला, सुमित्राबाई, सांगायचं, म्हणजे आम्ही पीत नाही...फक्त लिंबू-सरबत. मला आणि यांना पण इराणीसाहेबांना पत्ता लागू देऊ नका हं ! नाहीतर ते यांना घ्या.. घ्या...घ्या घ्या म्हणून आग्रह करतील. आणि यांना सरबतात साखर नको. डायबेटीस आहे. ' मग मिस्टर गोखल्यांचा डायबेटिक तपशील...' म्हणजे काय ? गेल्या आठवड्यात शूट अप झाली. एकदम ट्वेंटी. शुगर, हो–शुगर !'

[ सगळे मोठ्याने हसतात. फक्त चंपू बसल्या बसल्या डुलक्या घेते. ]

**रेहमान :** सुमी, आपकी बातें सुनते सुनते सुबह हो जायेगी ! नाऊ आय मस्ट गो. घनश्यामजी, फर्स्ट थिंग इन द मॉर्निंग, सब पेपर्स भेज देना ! सुमी, थँक्स् फॉर ए डिलाइटफुल इव्हनिंग !

[ सर्वांशी हस्तांदोलन करतो. सुमीशी हस्तांदोलन करताना सुमी त्याच्या कोटाच्या कॉलरीवर चिकटलेले पीस टिचकीने उडवते आणि कॉलर हलक्या

हाताने झाडते. सगळे त्याला दाराशी पोचवतात. तो बाय् बाय् करीत जातो. सुमी क्षणभर दारात उभी राहून त्याला पाहते आणि मग दार बंद करते. ]

**घनश्याम** : (लगेच कोट काढीत) संपलं, बुवा, एकदाचं ! सुटलो. ( कोट काढून फेकतो. )
**दिगंबर** : डॅम गुड् पार्टी ! फारच छान झाली पार्टी ! वाः ! फारच छान !

[ दोघेही शीण घालवण्यासाठी आराम बसतात. सुमी बांगड्या, दागिने काढत वर जाते. दिगंबरही कोट काढतो. चंपू खुर्चीत बसल्या बसल्या डुलक्या घेत आहे. पण तिच्याकडे कुणाचेच लक्ष नाही. ]

**घनश्याम** : त्याचं काय आहे, मला मिस्टर इराणी आणि मिस्टर रेहमान यांना जरा खूश करायचं होतं. इराणी मॅनेजिंग डायरेक्टर आणि रेहमान बिझनेस मॅनेजर.
**दिगंबर** : एजन्सीचा करार झाला ?
**घनश्याम** : उद्या सह्या होतील. रेहमान म्हणेल, तसं इराणी करणार. मला थोडं ट्रॅव्हलिंग करावं लागणार. इथलं थोडं सुमी बघेल. तिलाही काही तरी ऑक्युपेशन हवाच... तिचं सारखं चाललेलं असतं, . . ' काही तरी करायला हवं .. घरी बसून कंटाळा येतो...'
**दिगंबर** : मला एक सांग, घनश्याम, हा रेहमान जरा ( नाकावर बोट आपटत ) चालू आहे, नाही ?
**घनश्याम** : असावा. ( हसत ) म्हणजे मला गोखले म्हणाले—ते चीफ अकौंटंट—ते म्हणाले...मिसेस् इराणीला हवा, म्हणून रेहमान फार्मासिटिकल्स् इंडियामध्ये आहे.
**दिगंबर** : आणि ती पोमेला ? डॅम सेक्सी ..!
**घनश्याम** : ते रेहमानचं नवं प्रकरण ... नाही म्हटलं, तरी मिसेस् इराणी आता जरा उतरलीय ...
**चंपू** : ( झोपेतच ) अहो, तो रेहमान गेला ? .. ( अडखळत ) त्याचे ते डोळे...

[ दोघेही तिच्याकडे बघत हसतात. ]

**दिगंबर** : पण या रेहमानपासून जरा जपायलाच हवं.
**घनश्याम** : का ? ( हसतो. ) तू...काढ तू त्याचा विमा...
**दिगंबर** : तीन लाखांचा विमा काढतो, म्हणालाय. ते सोड...पण तो माणूस जरा... त्याचे डोळे पाहिलेस ... ? ( वळून चंपूकडे पाहतो. चंपू खुर्चीत गाढ झोपलेली आहे.) तो वाटतोच बायकांना नादी लावणारा !
**घनश्याम** : असतो एखाद्याला शौक. आणि अनमॅरिड आहे ... बट ही इज् अ गुड मॅन अदरवाइज !

दिगंबर : तो त्याचा चमचा एस्पी...सत्यप्रकाश...मला त्याचं केवढं कौतुक सांगत होता.

घनश्याम : काय सांगत होता ?

दिगंबर : ती पोमेला, म्हणे, आख्खा जन्म त्याची रखेली म्हणून राहायला तयार आहे. श्रीमंताची पोरगी आहे. आणि रेहमान, म्हणे, कुणाला लग्नाचं प्रॉमिस देत नाही. कुणाला फसवीत नाही. उलट, लग्न करणार नाही, प्रेम करणार नाही, असं, म्हणे, तो आधीच सांगतो. फक्त शरीर-सुखासाठीच तो जवळ येतो. कुणाच्या प्रेमात पडायची पाळी आली...लग्न करावंसं वाटलं, तर, म्हणे, रेहमान आत्महत्या करील ! आत्महत्या करतोय ! चार दिवस मौज करील चार नायकांशी...आणि मग पाचवीशी लग्न करील. आणि पुन्हा वर एस्पी म्हणतो, 'रेहमानजी थरो जेंटलमन हैं !' (क्षणभराने) असेल ...असेल ! पॉलिसी देतो म्हणालाय, म्हणून ऐकून घ्यायला हवं !

घनश्याम : असू दे, रे ! आपल्याला काय करायचंय ? तू तीन लाखांची पॉलिसी त्याच्या गळ्यात बांध ! (वर पाहात) सुमे, अग, चल आता. (दिगप्पाला) अरे, दिगप्पा, रात्रीचे दोन वाजले आहेत ! तुम्ही इथंच झोपा आता—

दिगंबर : ठीक आहे ! तू झोप जा ! (घनश्याम जातो. वरून सुमी दागिने काढून येते.) चंपू, ए चंपू–(तिला उठवण्याचा प्रयत्न करतो. ती झोपली आहे.)

सुमी : एऽऽ,चंपू–चंपा—

चंपू : (अर्धवट झोपेत...अर्धवट तारेत) अग, तो रेहमान गेला का ?

सुमी : हो गेला...का, ग ? (हसते.)

चंपू : बरं झालं, बाई ! काय मेल्याचे डोळे, ग ? मला तर, बाई, भीतीच वाटत होती—

सुमी : (दिगप्पाकडे पाहून हसत) दिगप्पा, हे, रे, काय आता ? (हसते.)

दिगंबर : सुमे, इकडे ये—

सुमी : काय ?

दिगंबर : (जरा चिडून) काय अवस्था करून टाकली आहेस तिची ? कशाला एवढा आग्रह करायचा ?

सुमी : अरे, पण दोन-तीन पेगमध्ये कशी काय आऊट झाली ?

दिगंबर : तू तरबेज पिणारी आहेस ! तिला सवय नाहीए—

सुमी : ठीक आहे, रे—

दिगंबर : (गंभीरपणे) सुमे, तुझंही पिणं अलीकडे वाढायला लागलंय—

सुमी : चल, रे ! घनश्यामला सुद्धा आवडतं मी प्यालेलं...जरा गंमत !

दिगंबर : गंमत कसली ? चल ..(ती जायला निघते.) सुमे, इकडे ये —

सुमी : (वैतागून) काऽऽय ?

दिगंबर : इट्स् नन् ऑफ माय बिझनेस ! माझं काम नाहीए हे ! पण

सुमी : काय लेक्चर देणारेस तू आता ?

दिगंबर : तू त्या रेहमानपासून दोन हात लांब राहशील, तर बरी—

सुमी : का ?

दिगंबर : का, असं नाही ! तू जरा नेहमी थ्रिल, एक्साइटमेंटच्या मागे असतेस, म्हणून सांगतो... आणि हे बघ... असा नट्टापट्टा करून सारखं घराबाहेर भटकायलाच पाहिजे, असं नाही !

सुमी : (त्याच्या शर्टाचं बटण धरीत) एऽऽ, माझ्यात तुला अजून इतका इंटरेस्ट आहे, दिगप्पा ?

दिगंबर : (एकदम वळून चंपूकडे पाहतो. चंपू डोळे उघडून त्यांच्याकडेच पाहते आहे–) हे बघ– मॅडसारखं बोलू नकोस !.. मोठ्यांचं ऐकावं लहानांनी ! (चंपूकडे जात) चल, ऊठ, ग, चंपू—

[ घनश्याम वरून खाली येतो. ]

घनश्याम : अग, सुमे, यांची झोपायची काय व्यवस्था केलीस ? ही बाजूची रूम देतेस, की वरची ?

सुमी : या बाजूच्या रूममध्ये सगळी व्यवस्था केलीय.

चंपू : (पटकन् उठून उभी राहात) आपण नाही इथं झोपायचं ! (आपण फार मोठ्यानं बोललो, हे लक्षात येऊन ओशाळते, आणि– ) आम्ही नाही इथं झोपणार !

सुमी : का, ग ?

चंपू : नाही, ग, आम्ही जातो—

घनश्याम : आता, वहिनी, पहाटेचे दोन वाजलेत—

चंपू : वाजू देत ! पण आम्हांला जायलाच हवं बरी ! त्या तिघींनी उच्छाद मांडला असेल घरी–दोन्ही म्हाताऱ्या झोपतील—

दिगंबर : असू दे ! झोपू इथंच आपण—

चंपू : अहो, पण—

दिगंबर : तू गप्प बस ! ठीक आहे, रे ! आम्ही झोपतो इथंच—

[ 'गुड नाइट...गुड नाइट' करीत सुमी व घनश्याम वर जातात. पण तेवढ्यात सुमी मागे वळते... घनश्याम आत जातो. ]

सुमी : (चेष्टा करीत) दिगप्पा, इकडे ये ! तुझा वसंता ..तुझ्या लग्नाच्या रात्री व्हायोलंट झाला, म्हणून तुझा हनीमून राहिलाय... तो आज इथं साजरा कर !.. जरा

गंमत, रे! ..आणि हे बघ... शेजारी बाथरूम आहे...टब आहे...शॉवर आहे... आणि शॉवरला पाणीही आहे– ( छद्मीपणे हसते. )... आणि यार्डले पावडरही ठेवलीय... इंपोर्टेड...वास तरी बघ... ( हसते. )

**दिगंबर :** ( लटक्या रागाने– ) तू चल... पळ इथनं...!

[ ती 'गुड नाइट' करीत हसत पळत जाते. ]

**दिगंबर :** ( स्वतःशीच ) साल्लीच्या जिभेला मुळी हाडच नाही! निवडून निवडून फाजील तेवढं बोलणार!

[ ती आत जाताच दिगंबर सगळे दरवाजे बंद करतो. आणि पुढील संवाद होत असतानाच एकेक कपडा उतरू लागतो. कोट... शर्ट... गंजीफ्रॉक... पँट ..शेवटी अंडरवेअर ठेवून राहतो. ]

**दिगंबर :** चल, चंपू . ( थांबून ) काय झालं ?

**चंपू :** ( तारेतच ) काय ती गोखलेबाई! चार ग्लासं लिंबू–सरबत प्याली. फुक्कट, म्हणून! बरं दिसतं? आणि जेवली काय? भट्टीण मेली. दहीभात भुरंभुरं आवाज करीत ( नक्कल करते. ) ! लोणच्यातली लिंबाची फोड सारखी चोखत होती...डोहाळे लागल्यासारखी. ( थांबून ) मला किती कडक डोहाळे लागायचे, नाही ?

**दिगंबर :** पुन्हा हवेत का ते, डोहाळे?

**चंपू :** नको, रे, परमेश्वरा!...(हात जोडते आणि त्याच्या गळ्यात हात घालीत) तुम्हांला अजून मी पूर्वीसारखीच आवडते? पूर्वीसारखीच तुम्हांला माझी ओढ आहे?

**दिगंबर :** ओढ नसायला काय झालंय?

**चंपू :** काय राहिलंय आता माझ्यात?.. फॉर्म गेला!. केस सुद्धा पिकायला लागलेत...

**दिगंबर :** असू दे ..मला तू आवडतेस...

**चंपू :** सुमीपेक्षा?

**दिगंबर :** ( पटकन् तिच्या गालावर चापटी मारीत ) तू म्हणजे अशी आहेस, चंपू... ती सुमी कोण माझी ?

**चंपू :** ती गुबगुबीत आहे तुम्हांला आवडते, तशी. तिनं फॉर्म मेण्टन केलाय... आकर्षक राहते...( दिगंबर रागाने बघत राहतो. ) रागावलात...?

**दिगंबर :** नाही, ग! तुला खरं खरं सांगतो, चंपू, तू मला खूप खूप आवडतेस! ( हात उडवीत ) आज मी तुझं इंग्रजी सिनेमात घेतात, तसं मोठ्यानं चुंबन घेणार! ( नुसता तोंडाने चॅक असा आवाज काढतो. ) आज तर तू फारच छान दिसते

आहेस...दाखवू , तू मला किती आवडतेस, ते ?

चंपू : माझ्या ओठांवरची लिपस्टिक तुम्ही खराब करणार...तुमच्याही तोंडभर करणार ...तुम्ही गालाचाच किस घ्या. ( ती गाल पुढे करते. )

दिगंबर : ( तिच्याजवळ जात ) त्या दिवशी त्या घनश्यामनं... अन्नाडीच साला ! माझ्या समोरच सुमीच्या उघड्या पोटाचं चुंबन घेतलं ! मी घेऊ ?

चंपू : ( वैतागून ) काय ते एकदा लवकर आटपा बघू—

दिगंबर : 'ते लवकर आटपा...लवकर आटपा' पुन्हा म्हणशील, तर थोबाडीत देईन !

चंपू : ( बेडवर बसून रेघोट्या मारीत ) गोखलेबाईंना दोन्ही मुलगे... दोन्ही डॉक्टर ! किती बरं झालं, नाही ? हुंडे द्यायला नकोत.

दिगंबर : असू दे, चंपू ! आता भलतेसलते विचार नकोत.

दिगंबर : चंपू , तुला आठवतं ? लग्नाआधी तू शॉवरखाली आंघोळ करू म्हणायचीस ...आठवतं...इथं शॉवर आहे.. पाणी आहे...टब आहे...( ती एकदम पाऊस कोसळल्यासारखी रडू लागते. तिला आवरणे कठीण होते. दिगंबर गोंधळतो. ) तू का रडते आहेस, चंपू , झालं काय ? ( तिचं रडणं बाहेर ऐकू जाईल, या भीतीने इकडे तिकडे गांगरून पाहतो. तिच्या तोंडावर हात धरायचा प्रयत्न करतो. ) तू का रडते आहेस ?

चंपू : आम्हांला गोखलेबाईंसारखा, सुमीसारखा मुलगा नाही...

[ ती रडत असतानाच— ]

पडदा

# अंक दुसरा

[ दिगंबरचे घर. संध्याकाळची वेळ. चंपू धुतलेल्या कपड्यांच्या घड्या करते. तेवढ्यात लॅच–की लावून दिगंबर आत येतो. तो आज नेहमीच्या मानाने लवकर घरी आला आहे. शिवाय आनंदातही आहे. ]

चंपू : ( चकित होऊन ) आज एवढ्या लवकर ?

दिगंबर : ( खुशीत ) आयुर्विम्याला पर्याय नाही— रेहमानची पॉलिसी ॲक्सेप्ट झाली. तीन लाखांची ! नाहीतर तुझा भाऊ ! पाच हजारांच्या पॉलिसीसाठी दोन वर्षे टोलवतोय...

चंपू : आता इथं माझ्या भावाचं काही काढायची गरज आहे का ? नसेल त्याला काढायचा विमा ..

दिगंबर : पण आयुर्विम्याला पर्याय नाही, एवढं तरी त्याला कळायला हवं...

चंपू : ( काहीशा रागाने ) एवढंच सांगायला आज घरी लवकर आलात, की काय ?

दिगंबर : नाही, ग ! मला सांगायचं होतं रेहमानच्या पॉलिसीबद्दल...

चंपू : त्यात तुम्हांला काय मिळणार ?

दिगंबर : तो हिशेब नंतर करू ! दुसरी गोष्ट– आणखी एक पार्टी...

चंपू : कुणाची ?

दिगंबर : रेहमानची ! आमंत्रण आलंय्...

चंपू : दोघांना—?

दिगंबर : हो– हो ! दोघांना ..( हसते. ) का ?

चंपू : काही नाही.

दिगंबर : मग जायचं ना पार्टीला ?

चंपू : ( आनंदाने ) होऽऽ! जाऊ या ना! जरा गंमत!

दिगंबर : ( चमकतो. ) जरा गंमत का? वाः! ( खोच तिच्या लक्षात येत नाही. ती लगबगीने आत जायला निघते. ) रेहमानची पार्टी म्हणताच खूश झालीस!

चंपू : चला! तुमचं काही तरीच—

दिगंबर : आणि आमची सर्कस कुठंय्?

चंपू : आज तिघांनाही भाऊ घेऊन गेलाय...रात्री घेऊन येईल. ( आत पळते. )

दिगंबर : अग, आईला आणि काकीला पाठवून दे...त्यांनाही आनंदाची बातमी सांगतो. ( स्वतःशीच ) आमच्याकडे आधीच आनंदाच्या बातम्या कमी! ही पार्टीला जायला उत्सुक आहे! या बाबतीत कुणाच्या मनात काय आहे, ते सांगता येणार नाही.

[ भुवया उंचावून विचार करीत बसतो, तेवढ्यात आई आणि गंगूकाकी बाहेर येतात. दोघीही कसला तरी ठराव करून बाहेर आलेल्या आहेत. कारण एकमेकींकडे बघत, खुणावत त्या येतात. ]

दिगंबर : आलात का? आई, काकी, तीन लाखांची पॉलिसी मिळाली!

गंगूकाकी : हो, का? बरं झालं! सिद्धारूढस्वामीच पावले. (आईला) आता उसंत आहे त्याला क्षणाची, तर विचार त्याला—

दिगंबर : काय ते?

आई : अरे, दिगंबरा, गंगूकाकी काय म्हणतेय, बघ...

दिगंबर : काय म्हणतेय गंगूकाकी?

गंगूकाकी : हिचं ऐन वेळेला तोंड धरतं!...ती विचारतेय...

दिगंबर : ( मुद्दाम ) कोण विचारतंय?

गंगूकाकी : तुझी आई, रे, बाबा! ती विचारतेय...म्हातारीला हुबळीला नेणार, ते या जन्मी, की पुढल्या जन्मी?

आई : अरे, दिगंबरा, एकदा दाखव, बाबा, त्या स्वामींचं स्थान तिला— तिचे डोळे मिटण्याआधी—

दिगंबर : ( गंभीरपणे, पण चेष्टेने ) गंगूकाकी, कधी मिटते आहेस डोळे?

गंगूकाकी : ( लटक्या रागाने ) मेला, माझ्या मरणावर टपलाय! वाट बघत बस!...

दिगंबर : ( लाडाने ) जाऊ— जाऊ, ग, काकी, आपण! ( तिचा हात धरतो. )

गंगूकाकी : हे, मेल्या, तू गेली पाच वर्षं सांगतोहेस—

दिगंबर : आजपास्नं आठ दिवसांनी निघायचं. ( आईला) तूही येते आहेस का, आई?

आई : ( कंटाळून, थकून ) मला नको, बाबा, हुबळी आणि बिबळी. माझं गरगरतं डोकं, इथनं मोरीत जायची नाही अंगात ताकद...

गंगूकाकी : ( हर्षभरित होते. ) खरं सांगतो आहेस, की आपली थंडलं मारतो आहेस ? नेहमीसारखा ?

दिगंबर : नाही, ग ! खरंच जाऊ आपण ! मी पैशाची सुद्धा व्यवस्था केलीय.

गंगूकाकी : ( पदराने डोळे पुसते ) माझ्या डोळ्यांत एकदम आनंदाश्रू आले. हे बघ. ( जवळ येत दिगंबरच्या कपाळाचा मुका घेते. ) दिगंबरा, मला पोर ना बाळ... तूच माझं सर्व...तुझ्याशिवाय या जगात मला आणखी कोण आहे ? एवढीच आता शेवटली एक इच्छा आहे, ती एकदा पुरी कर, पुता ..

आई : ( आत जाता जाता ) ने, रे, बाबा दिगू, तिला चार दिवस हुबळीला. रोजच्या रोज तिचं चाललेलं असतं... ' माझा दिगू मला हुबळीला नेणार. मला हुबळीला नेणार...' तिला एकदा नेऊन आण. तिची तब्येत बरी नसते. झोपेत घुसमटते... कधी प्राण गेला, तर तेवढीच इच्छा उरेल मागं.

दिगंबर : नेईन, ग ! गंगूकाकी नक्की नेईन !

गंगूकाकी : ( हसत राहते...हसता हसता ) बघ, मला हसू आवरेनासं झालंय, रे... दिगंबरा, आनंदाने, रे

दिगंबर : हास– हास. तोपर्यंत मी जरा कपडे उतरून आंघोळ करू का ?

गंगूकाकी : थांब जरा. असा माझ्यासमोर बस. (तो समोर बसतो.) अगदी असं वाटतंय, दिगू, तुला मांडीवर घेऊन जो जो करीत झोपवावं...( ती त्याचे केस कुरवाळते. )

दिगंबर : ..हे बघ...जायचं, म्हणजे जायचं...तू मला उगाच, हे लोणी लावू नकोस !

गंगूकाकी : कसं जायचं म्हणतोस तू हुबळीला ?

दिगंबर : इथनं बेळगावपर्यंत विमानानं नेतो तुला. बस विमानात ऐटीत . आमच्या घरात तू पहिली विमानात बसणारी...( पदर तोंडावर घेऊन हसते. ) पुढे स्पेशल मोटारीनं .. तुझ्या मोटारीपुढे दोन मोटर–सायकलवाले .

गंगूकाकी : ते कशाला ? वाट दाखवायला ?

दिगंबर : इंदिरा गांधींच्या गाडीसमोर नसतात का मोटार–सायकलवाले ..?

गंगूकाकी : ( हसत कपाळावर हात घेत ) जळलं लक्षण तुझं. पुढं सांग

दिगंबर : पुढं काय ? पुढं हुबळी...

गंगूकाकी : नुसता एरंडाएवढा वाढलास. एकुणात अक्कल तुला कमीच !

दिगंबर : आता काय झालं ?

गंगूकाकी : त्या विमानाचा खर्च किती ?

दिगंबर : खर्चाचं तू बोलायचं नाहीस.

गंगूकाकी : तरी पण ?

दिगंबर : पाचशे रुपये येईल.

गंगूकाकी : ( हातभर जीभ बाहेर काढीत ) मुळींच नको. आपण असं करू...ते पैसे वाचवू ..आणि आगगाडीनं जाऊ...

दिगंबर : रेल्वेचे पूल चढायला पाहिजेत...उतरायला पाहिजेत...तुझ्याच्यानं ते होणार नाही...

गंगूकाकी : सगळं होतं ! तू माझी काळजी करू नकोस, मी स्वामींच्या चरणांवर डोकं ठेवल्याशिवाय मरत नाही. आपण असं करू ..गाडीनं जाऊ...आणि विमानाचे पैसे उरतील, त्याचं आपण स्थानावर सगळ्यांना एकवार लाडवांचं जेवण घालू..

दिगंबर : लाडवांचं जेवण ... ? गंगूकाकी, तुझं आता वाढायला लागलं एक...एक...

गंगूकाकी : ऐक, रे, पुता माझं. आमच्या सासूबाईंची—तुझ्या म्हाताऱ्या आजीची इच्छा होती, रे...स्वामींच्या पायांशी लोकांना लाडवांचं जेवण घालायचं...त्या काळात पंचवीस रुपयांत झालं असतं. पण तुझा आजा खट. त्यानं ऐकलं नाही... तर ती म्हणायची, ' मी चार गावं वणवण भटकेन...आणि लाडवांसाठी भिक्षा मागून आणीन आणि तिथं जेवण घालीन. ' पण त्या आधी ती मेली...तिची इच्छा अपुरी राहिली... म्हणून तुझा बाप भिक्षा मागत वणवण हिंडतोय.. तू तिथं जेवण घाल. तुझ्या बापाच्या पायांवरची भिंगरी थांबेल बघ– ( दिगंबर हसतो. थोडा वेळ थांबून ...इथे तिथे फिरून ) सुटले, रे, बाबा मी ! तू आहेस, म्हणून माझं निभावतंय.

दिगंबर : ( खवचटपणे ) होऽऽ ! निभावतंय ! एवढाऽऽ शिरा करतेस, तेव्हा बरा चोरून चोरून वसंताला देतेस, तेव्हा दिगूची आठवण नाही येत ?... दिगूसाठी बरा ठेवीत नाहीस वाटीभर ?

गंगूकाकी : ( लटक्या भांडणाच्या सुरात ) होऽऽ ! वसंता माझा सख्खा पुतण्या ! आणि तू कोंडा देऊन विकत घेतलेला ! काय बोलतो आहेस ! ( आत जाता जाता ) काय, ग, चंपू, या तीन भावकाया नाही आल्या मामाकडनं ? बर खायला येतंय नुसतं !

[ आत जाते. त्याच वेळी चंपू बाहेर येते. ]

दिगंबर : वसंता कुठं गेलाय ?

चंपू : लायब्ररीत जातो, म्हणाले. ( विषय बदलून ) ऐकलं का ?

दिगंबर : काय ?

चंपू : मी नाही येत...

दिगंबर : कुठं ?

चंपू : रेहमानच्या पार्टीला...

दिगंबर : का ? आत्ता तर म्हणालीस, जाऊ म्हणून ? चल ना—

**चंपू :** नको !
**दिगंबर :** का ?
**चंपू :** तो माणूस बरा नाही !...त्याचे डोळे बरे नाहीत...
**दिगंबर :** पण त्याच्या डोळ्यांशी आपल्याला काय करायचंय ?
**चंपू :** ( निग्रहाने ) पण नकोच !
**दिगंबर :** ( स्वतःशीच ) ही आपल्या मनाला ब्रेक लावते आहे !
**चंपू :** त्या इराणीच्या बायकोसारखी मी त्याच्या नादी लागले, तर तुमचं काय होईल ?
**दिगंबर :** ( हसत ) माझा इराणी ! दुसरं काय ?
**चंपू :** मला विचाराल, तर तुम्हीसुद्धा जाऊ नका !...नेम नाही ! तुम्हांलाही तो कुणाच्या तरी नादी लावायचा !
**दिगंबर :** कुणाच्या ?
**चंपू :** कुणाच्याही.. त्या सुमीच्यासुद्धा !
**दिगंबर :** झालं ! पुन्हा त्या बिचाऱ्या सुमीवर आलीस...

[ असं म्हणत तो टॉवेल घेतो आणि खांद्यावर टाकत आत जातो. ]

**गंगूकाकी :** ( आतून बाहेर येत ) चंपू, तू येणारेस का ?
**चंपू :** कुठं ?
**गंगूकाकी :** हुबळीला ? सिद्धारूढस्वामींच्या पायांशी ? आम्ही चाललो...
**चंपू :** कोण कोण ?
**गंगूकाकी :** मी आणि दिगू ! तू येणार असशील, तर चल. लाडवांचं जेवण घालायचंय ...तुझंही गाऱ्हाणं घालू– मुलगा होऊ दे, म्हणून—
**चंपू :** ( हसते. ) चाललात कधी ?
**गंगूकाकी :** आजपास्नं आठ दिवसांनी...

[ तेवढ्यात बाहेर वाडीत एकदम मोठा आरडाओरडा ऐकू येतो. तो कसला, हे जाणून घेण्यासाठी चंपू, गंगूकाकी आणि आई गॅलरीत जाऊन वाकून बघतात. त्यांच्या तोंडावर काळजीचे भाव दिसतात. त्या वरून खाली वसंताला हाका मारतात. पण खालच्या गदारोळात त्या नीट ऐकू येत नाहीत. क्षणभरात त्या तिघीही दाराजवळ येतात. त्या दाराजवळ येतात न येतात, तोच दिगंबरही उघड्याने स्वयंपाकघरातून येतो. त्याच्या खांद्यावर टॉवेल आहे. 'काय झालं ? काय झालं ?' अशी चौकशी करीत तो दारापाशी येतो. तेवढ्यात तीरासारखा वसंता दरवाज्यातून आत येतो...

तो भयंकर घाबराघुबरा झालेला आहे... भेदरलेला आहे. 'अरे, वसंता, झालं काय ?... झालं काय ? वसंता, बोल तरी... ', 'सांगा ना, काय झालं, भाऊजी ?' असं त्या तिघी पटापट एकामागून एक विचारतात. पण तो काहीही बोलत नाही. तो भयंकर भेदरलेला आहे. तो आत येतो... आणि तसाच पळत गॅलरीत जातो. पिंजऱ्याची कडी काढतो आणि आत शिरतो. गजांतून हात बाहेर काढून दाराला बाहेरून कडी लावतो. वसंता आत येता येता त्याच्या मागोमाग, त्याचे संरक्षण करीत दारापर्यंत सुराणा येतो. ]

**चंपू :** झालं काय, सुराणा... ?
**दिगंबर :** सुराणा, झालं काय ?
**सुराणा :** आत्ता लेब्रीतनं पुढं गेले, पुस्तक घेऊन चांगलं बोलले ..
**चंपू :** पण त्यांनी केलं काय ?
**सुराणा :** धाकट्या मुलीला चावले...
**चंपू :** ( दचकून ) चावले ?
**दिगंबर :** कुणाच्या मुलीला ?
**सुराणा :** बोरकरांच्या नातीला...
**चंपू :** माणिकच्या मुलीला ?

[ तेवढ्यात दारात सुराणाला बाजूला ढकलत बोरकर येतो. तो संतप्त आहे. ]

**बोरकर :** कुठं आहे ?...कुठं आहे तो ?...दिगंबर कुठं आहे ?
**दिगंबर :** झालं काय ? बोरकर, झालं काय ?
**बोरकर :** बोरकर गेला खड्ड्यात ! तू आत्ताच्या आत्ता-विदिन ट्वेंटीफोर अवर्स त्याला इस्पितळात टाक...वेड्याच्या इस्पितळात ! नाहीतर नाहीतर गंभीर परिणाम होतील ! यू विल हॅव टु फेस डायर कॉन्सेक्वेन्सीस् ! डायर कॉन्सेक्वेन्सीस्...आय् से ! माणिकच्या मुलीला तो मॅड चावला ..चक्क चावला...म्हणजे आहे काय ? वॉट नॉन्सेन्स ? म्हणजे या वेड्यामुळं माणिकनं माहेरी यायचं नाही, की काय ?

[ आई भयभीत होऊन ट्रंकांवर बसते.

हे सर्व चालू असताना कोपऱ्यातला दांडका घेऊन प्रक्षुब्ध गंगूकाकी गॅलरीत फेऱ्या मारते. आणि अधून मधून ' कुणाची हिंमत असेल,

त्यानं गॅलरीत यावं...कपाळ फोडलं नाही, तर नावाची गंगूकाकी नाही!' असे म्हणत ती दांडका आपटून आवाज काढते. बोरकरांनी वसंताला 'वेडा' म्हणताच ती झटक्याने पुढे येते आणि बोरकरांच्या पुढ्यात दांडका आपटत म्हणते...]

**गंगूकाकी :** बोरकरा, चोरा, तू तुझं तोंड सांभाळ! वसंताला वेडा म्हणायचं काही काम नाही आहे!

**बोरकर :** (खूप चिडून) तो वेडा आहे...वेडाच आहे. मॅड...!

**गंगूकाकी :** (संतापून वेड्यासारखी ओरडते) बोरकरा, मेल्या, तू वेडा! तू वेडा!! नंबर एकचा मॅड!!!

**बोरकर :** गंगूकाकी.. गंगू... गंगे... तू तोंड आवर

**गंगूकाकी :** मी मुळीच तोंड आवरणार नाही! एक शब्द बोलशील, तर दांडका तुझ्या टाळक्यात घालीन—तुझी पोरगी काय लायकीची आहे, ते माहीत आहे. नंबर एकची रांड आहे!...

**बोरकर :** खबरदार.. गंगूकाकी! खबरदार..

**गंगूकाकी :** अरे, जा रे, बोरकरा! तुझ्या माणिकनं माझ्या पोराला फसवलं.. माहीत आहे? (डोळ्याला पदर लावीत) सोन्यासारखा माझा पोरगा, पहिल्या वर्गात येणारा.. हुशार...आणि रांड पैशासाठी पाटकराचा हात धरून पळाली... नंबर एकची रांड आहे ती!

**बोरकर :** वसंत माणिकच्या मुलीला चावला-मी पोलिसांत जाईन ..

**गंगूकाकी :** अरे ज्जा...ज्जा! तो चावेल. तुला सुद्धा चावेल, माणिकनं या वाडीत यायचं नाही....नाही यायचं! वाडी बंद!

**बोरकर :** (चिडून) ही वाडी काय तुझ्या बापाची आहे?

**गंगूकाकी :** माझा बाप काढतोस? मेल्या...

[असे म्हणत ती दांडका उगारून त्याच्या अंगावर धावते. एका बाजूने दिगू तिला आवरतो. आणि दुसऱ्या बाजूला सुराणा बोरकरांना ओढत खाली नेतो. दिगंबर दरवाजा बंद करतो आणि—]

**दिगंबर :** (मोठ्याने ओरडत) वसन्ता.. वसन्ता.. (गॅलरीच्या दिशेने जाणार, तोच—)

**आई :** (आधीच ती गर्भगळित झाली आहे. उठते आणि दिगंबराच्या पाया पडते.) मी तुझ्या पाया पडते, दिगंबरा, तू त्याच्या अंगाला हात मात्र लावू नकोस..

**गंगूकाकी :** ( तेवढ्यात तीरासारखी जाते आणि गॅलरीत पिंजऱ्यासमोर उभी राहते. ) खबरदार, कुणी इथं जवळ येईल, तर ! मी आपला परका बघणार नाही. टाळकं फोडणार ..सोडणार नाही ..हिंमत असेल, त्यानं यावं !...

[ दिगंबर हताश होऊन खुर्चीत बसतो. आई भिंतीचा आधार घेत आत जाते. गंगूकाकी कमालीची थकली आहे. ती खाली बसते आणि गॅलरीला डोके टेकून जवळ जवळ झोपी जाते. दांडका मात्र तिच्या खांद्यावर आहे. चंपू रागारागाने आत–बाहेर फिरते.

क्षण, दोन क्षण जातात. भयाण शान्तता आहे. तेवढ्यात गजांचा आवाज होतो. म्हणून दिगंबर बसल्या जागेवरनं वळून बघतो. वसंत गजांतून हात घालून पिंजऱ्याचे दार उघडत आहे. दार उघडून तो बाहेर येतो. आणि समोर येऊन दिगंबरच्या पुढ्यात भिंतीला टेकून उभा राहतो. अगदी एखाद्या शहाण्यासारखा. ]

**वसंत :** मला वाटतं, भाई, ( दिगंबर टक लावून त्याच्याकडे बघतो आहे. ) म्हणजे मी म्हणतो ...मी मेन्टल हॉस्पिटलमध्ये जावं, हे सर्व दृष्टींनी बरं !

**दिगंबर :** सर्व दृष्टींनी ? म्हणजे ?

**वसंत :** सर्व दृष्टींनी म्हणजे.. सगळ्यांच्या दृष्टीनं बरं. कुणाला माझा त्रास नको.

**दिगंबर :** तिथं तुला त्रास होईल, वसंता !

**वसंत :** कसला त्रास ? आणि असू दे ! मला त्रास झाला, तरी चालेल !

[ दिगंबर खाली मान घालून, असहायपणे स्वस्थ बसून राहतो. क्षण दोन क्षण जातात. दिगंबर आपल्या हाताचे तळवे बघत बसून राहतो. मग—]

**दिगंबर :** मला वाटतं.. वसंता, तू इथंच राहावंस—

**वसंत :** नको, भाई ! माझ्या मनाचा आता निर्णय झाला आहे !

**दिगंबर :** ठीक आहे. तू म्हणशील, तसं माणसांनी एकमेकांसाठी थोडं सोसावं, अशा मताचा मी आहे...तेव्हा तुझा थोडा त्रास झाला, तरी तो सोसला पाहिजे आम्ही, असं मला वाटतं...

**वसंत :** आय् ॲम थँकफुल टु यू ..बट्...मला वाटतं, मी इस्पितळात जाऊन बघावं... बरं वाटलं, तर तिथं राहावं...नाही तर परत यावं...!

**दिगंबर :** तू म्हणशील, तसं...

**वसंत :** ( थोड्या वेळाने ) या क्षणी मला खूप... खूप शान्त वाटतंय्...

**दिगंबर :** का ? कशामुळं ?

**वसंत :** कोण जाणे ! ( क्षणभराने ) तुला, भाई, थोडा वेळ आहे का ?

**दिगंबर :** आहे... का ?

**वसंत :** आपण थोडा वेळ बोलत बसू. ( बसतो. ) खूप दिवस भाऊ भाऊ असूनही आपण फारसं कधी बोललो नाही !

**दिगंबर :** मला एक सांग, वसंता, तू तिला चावलास का ?

**वसंत :** कुणाला ?

**दिगंबर :** वासंतीला–माणिकच्या मुलीला...

**वसंत :** दॅट् रिमाइण्ड्स् मी ... माणिकनं मुलीचं नाव वासंती का ठेवलं असेल ?

**दिगंबर :** का ?

**वसंत :** वसंतावरून वासंती ठेवलं असेल का ? तिला अजून माझ्याबद्दल—

**दिगंबर :** वसंता, तू हा विचार आता मुळीच करू नकोस ! पण तू तिला चावलास का ?

**वसंत :** मी तिला चावलो नाही !

**दिगंबर :** नाही ? मग त्याशिवाय का एवढी गडबड झाली ?

**वसंत :** ( आठवत–कुठे तरी बघत ) त्याचं काय झालं, भाई...मला आठवतं ... मी सुराणाकडून पुस्तक घेऊन घरी येत होतो. तर ही वासंती आपल्या जिन्यावर बसली होती. मला काही नाही वाटलं. पण ती माझ्याकडे बघून एकदम हसली–ओळख असावी, तशी ! मग मीही हसलो. तिचा चेहरा हुबेहूब अगदी माणिकसारखा आहे. मला वाटलं–मी तिच्या गालाचा–ओठांचा मुका घेतला–तिनं एकदम तोंड फिरवलं–चावलो नाही–दात लागला असेल–पण चावलो नाही. नंतर काय झालं, ते मला आठवत नाही. म्हणजे...काय माहीत आहे ..एकदम मला कळलं नाही... ही वासंती, की माणिक.. ( थोडा वेळ जातो. मग जाग यावी, तसा–) एनी वे...मग ठरलं, भाई, मी थोडे दिवस तरी इस्पितळात राहावं. इट् माइट डू मी गुड...! बघू तरी !

**दिगंबर :** तू इथं राहिलास, तर आमच्या नजरेखाली आहेस, असं वाटेल...

**वसंत :** इथं काय, तिथं काय, मी तसा तुझ्याच नजरेखाली असणार. ( थांबून ) मला हे जाण्यापूर्वी वहिनींना समजावून सांगितलं पाहिजे. त्यांनी माझं खूप केलंय, आणि खूप सोसलंय्सुद्धा . त्या म्हणून गप्प राहतात. वहिनींना मी खूप.. खूप त्रास दिलाय...

**दिगंबर :** असं बोलू नये. आपल्या माणसाचा त्रास होतो का ?

**वसंत :** लग्नाच्या पहिल्या रात्रीसुद्धा मी तुम्हांला झोपू दिलेलं नाही...मला आठवतं ...आबांनी तुमचा बिछाना सजवला होता...फुलं पसरून...तो बघून मी एकदम... एकदम एक्साइट झालो ... मला वाटतं...एनी वे ... जे झालं, ते वाईट झालं.

माझ्या मनात ते दुःख तसंच आहे. तुमची पहिली रात्र मी बिघडवली... तुमचा हनीमून मी बिघडवला... तुमच्या दोघांच्या आयुष्यातला पहिलावहिला धुंद रोमान्स मी नष्ट केला. तुम्ही दोघांनी सुखानं आयुष्यभर आठवायच्या या गोष्टी... त्यांचाच विचका झाला..

दिगंबर : आम्ही ते सगळं विसरलोय, वसंता ! तू भलतासलता विचार करू नकोस ! डोकं शांत ठेव ! लवकर बरा हो. तुला नोकरीला लावायचंय. तुझं लग्न करायचंय...

[ काळोख ]

[ प्रकाश ]

[ दिगंबरचं घर. दिगंबर विषण्ण मनःस्थितीत बसला आहे. पाठीमागून खिन्न सूर ऐकू येत आहेत.
क्षण-दोन क्षण असे जातात. मग दिगंबर स्वतःशीच बोलल्यासारखा बोलू लागतो. ]

दिगंबर : ( स्वतःशीच ) माझ्या मागच्या कटकटी काही संपत नाहीत. वसंताला मेंटल हॉस्पिटलमध्ये ठेवून आलो... आणि सुटकेचा सुस्कारा सोडतो, न सोडतो, तोच—(क्षणभराने) गंगूकाकी पळून गेली... वसंता इस्पितळात गेल्यापास्नं गंगूकाकीचं सगळं बिघडलंच होतं. तिनं जेवण जवळपास सोडलंच होतं... दोन घास पोटात जावेत, म्हणून जबरदस्ती करावी लागत होती...रोज उठायची आणि शेजारी देवळात जाऊन बसायची ! सारा दिवस ! रात्री जाऊन आणावी लागत होती. काल रात्री चंपू तिला आणायला गेली.. तर देवळात गंगूकाकी नाही...पोलिसांत कळवलंय...पण ती सापडायला हवी ना ! ( क्षणभर कुठे तरी बघत राहतो. मग गहिवरतो. त्याचे डोळे लाल होतात. तो डोळे पुसून घेतो. ) हिच्या पायांत ताकद नाही...ही कुठं गेली असेल ? हुबळीला गेली असेल ? सिद्धारूढस्वामींच्या स्थानावर ? तिथं जाऊन यायला हवं...

[ तेवढ्यात चंपू येते. तिच्या अंगात आणि चेहऱ्यावर उत्साह दिसतो आहे. ती तरतर चालीने येते आणि गॅलरी झाडू लागते. दिगंबर तिला बघत राहतो. झाडून झाल्यावर—]

चंपू : ( दिगंबरकडे बघत ) आता आई स्वयंपाकघरात झोपतील ! (दिगंबर तिच्या तोंडाकडे बघत राहतो. ) नाही ?

**दिगंबर :** हो ! !

**चंपू :** तुम्ही असं करा ! या रविवारी सुताराला बोलावून घ्या !...आणि हा पिंजरा या गॅलरीतनं काढायला लावा ..( दिगंबर मान हालवतो. ) मग इथं जागा होईल. इथं दोन खुर्च्या ठेवू...म्हणजे रात्री जेवणं झाली, की इथं जरा निवान्तपणे गप्पा करीत बसता येईल...( तो बघतो. ) नाही ?

**दिगंबर :** ( शांतपणे ) हो !

**चंपू :** ( उत्साहाने ) मी झाडते साफ...धुऊन काढायला पाहिजे ही गॅलरी...थांबा हं ! मी बादलीभर पाणी आणते...तुम्ही थोडी मदत करा—

[ ती घाईने आत जाते. ]

**दिगंबर :** ( स्वत:शीच ) आता इथं बसायला वसंता नाही ..काकीही नाही... म्हणून चंपूला आता एवढा उत्साह आला असेल का ? त्या दोघांचं काही करायला नको. थोडी जागा मोकळी झाली...! वसंता आणि काकी गेली, म्हणून चंपूला मनातल्या मनात आनंद झाला असेल का ? तसा तिला आनंद झाला, तर त्यात तिचा दोष नाही !.. गेली सहा वर्षं तिला श्वास टाकायलाही फुरसत मिळालेली नाही ! पण मग आपलं एकमेकांचं घर...त्यातली सगळी बरी-वाईट माणसं . त्यांना सांधणारी नाती . त्यातला ओलावा...या गोष्टींना प्रत्यक्षात अर्थ काय ? यातलं खरं किती... खोटं किती ? काही कळणार नाही ! एकेकाच्या मनाचा तळ कधी दिसणार नाही !

[ काळोख ]

[ प्रकाश ]

[ घनश्यामचे घर. सुमी आरामात कोचावर बसली आहे. कसले तरी सिनेमाचे नियतकालिक चाळते आहे. सुखासीन दिसते आहे. पाय हालवीत शरीराला हिंदकळवते आहे. तेवढ्यात फोन वाजतो. ती उठते आणि फोन घेते. अर्थातच फोन रेहमानचा आहे. फोनवर ती आनंदाने खदखदा हसते. त्या हसण्यात आनंद आहे. चावटपणाही आहे. ती टेलिफोनवरून जे काही बोलते, ते नीट ऐकू येत नाही. पण ती ज्या अवखळपणाने बोलते आहे, त्यावरून फोन रेहमानचा आहे, याची कल्पना येते. तेवढ्यात दिगंबर येतो. दिगंबरकडे लक्ष जाताच ती " हां . हां...ठीक है । " असे म्हणून फोन खाली ठेवते. ]

**सुमी** : दिगप्पा, अरे, गंगूकाकीचं काही कळलं ?

**दिगंबर** : ( मानेने नाही म्हणतो. ) नाही ! अजून काही तिचा पत्ता नाही ! आत्ताच सकाळी पोलीस–ठाण्यावरून जाऊन आलो.

[ क्षण-दोन क्षण चिंताग्रस्त होऊन गप्प बसतो. ]

**सुमी** : मी सांगते तुला, दिगप्पा, गंगूकाकी हुबळीलाच गेलीय. . तिचं कित्ती दिवस चाललं होतं...हुबळीला जायचंय... हुबळीला जायचंय...! तू तिला आधीच न्यायला हवी होतीस—

**दिगंबर** : अग, हो ! पण मध्येच वसंताचं प्रकरण निघालं ! त्याला तिथं इस्पितळात न्यावं लागलं...त्यामुळं हुबळीचं मागं पडलं.. !

**सुमी** : पण म्हातारी एकटी कशी गेली, बघ—

**दिगंबर** : वसंता मेंटल हॉस्पिटलमध्ये गेल्यापास्नं तिचं सगळं बिघडलंच होतं...

**सुमी** : तूच हुबळीला का जाऊन येत नाहीस ?

**दिगंबर** जाणार आहे ! कदाचित उद्याच जाईन ! कालच जाणार होतो पण रेहमानच्या पार्टीसाठी थांबलो...!

[ एकदम क्षणभर शांतता पसरते. दुसरा विषय काढीत—]

**सुमी** : घनश्याम नागपूरला गेलाय... एजन्सीच्या कामाला... आज, नाहीतर उद्या येईल—!

**दिगंबर** माहीत आहे ! तूच काल सांगितलंस मला...काल रात्री !.. रेहमानच्या पार्टीला...विसरलीस ?

**सुमी** : पण, दिगप्पा, तू पार्टीला येणार नाही म्हणाला होतास ना ?

**दिगंबर** : अचानक ठरवलं ! म्हटलं, जावं ! चार लोक भेटतील... थोडा बिझनेस मिळेल ! पण तू कशी काय आलीस ? मी विचारलं, तेव्हा 'जाणार नाही,' म्हणालीस ! घनश्याम नसताना एकटी कुठं जात नाहीस, म्हणालीस...

**सुमी** : रेहमानचे दोन फोन आले. म्हटलं, नाही गेले, तर बरं दिसणार नाही. नाही म्हटलं, तरी त्याच्यामुळे आम्हांला एवढी मोठी एजन्सी मिळालीय. नाही ? ( दिगंबर उत्तर न देता नुसता बघत राहतो. ) काल पार्टीत मी फार प्याले होते का, रे ? हल्ली मला पिताना भानच राहात नाही. रेहमान काय म्हणेल मला ? ( लाजून हसते. दिगंबर गंभीर होतो. अस्वस्थही होतो. पण सुमीला त्याची कल्पना नाही. ती घरात जाते. ) बैस, रे, दिगप्पा...तू चहा घेणारेस, का कॉफी...?

**दिगंबर :** ( थंडपणे ) मला काहीही नको आहे, सुमी !

**सुमी :** माहीत आहे, रे. वाडीचा सबनीस तू ! आलासच असशील चहासाठी.

**दिगंबर :** बंड्या कुठाय ?

**सुमी :** तो ममीकडे गेलाय.. गेलाय नरहरी त्याला आणायला...

**दिगंबर :** ममीकडे का ?

**सुमी :** काल रात्री पार्टीला जायचं होतं ना ? हा एकटा घरी राहीना...म्हटलं, ममी-कडे जा.

[ आत जाते. ]

**दिगंबर :** ( स्वतःशीच ) पक्की आहे एक नंबरची. काही पत्ता लागू द्यायची नाही. खरं म्हणजे मी आत्ता आलोय–घनश्याम घरी नसणार, म्हणून ! तिला झाडण्यासाठी...फायर करण्यासाठी...( थांबून, फेरी मारत ) कालच्या रेहमानच्या घरच्या पार्टीहून आल्यापासून माझ्या डोक्यात हा एकच गुंता आहे...घनश्याम बरोबर नसताना सुमी एकटी पार्टीला का आली ? अर्थात, चंपूनं हे खोदून विचारलं, तरी मी तिला सांगितलेलं नाही. सांगणार नाही...आली ती आली, आणि उशिरापर्यंत राहिली. मी बारा साडेबाराला निघालो, तेव्हा मी म्हटलं, 'सुमी, तू चल. मी पोचवतो घरी.' प्याली होती जाम...' नाही ' म्हणाली... ' तू जा ' म्हणाली... ' तू जा. ' आय् डिडंट लाइक इट्...

**सुमी :** ( आतून येत, मोकळे हास्य करीत ) दिगप्पा, तू येतोस, तेव्हा नेहमी एकटा येतोस. चंपूला का नाही आणत ?... आणि मुलांना...?

**दिगंबर :** ( एकदम तोडत ) सुमी, आज मला तुझ्याशी थोडं बोलायचंय...

**सुमी :** बोल ना—

**दिगंबर :** ( आतल्या आत विचार करीत ) कदाचित माझं चुकत असेल, कदाचित सुमी, मला तसा अधिकारही नसेल... ( ती बघत राहते. ) सुमी, तू काल पार्टीला रेहमानच्या घरी आलीस, हे योग्य नाही केलंस—

**सुमी :** का ?

**दिगंबर :** तू एकटी होतीस-रेहमान कसाही असो–दिलदार आहे. स्वभावानं चांगला आहे . हुशार आहे.. पण चालीरीतीनं तो कसा आहे... चारित्र्यानं कसा आहे, हे तुला माहीत आहे. .ताडाच्या झाडाखाली बसून ताक प्यालीस, तरी लोक काय म्हणतील ?

**सुमी :** ( खंबीरपणे ) तुला माझा संशय येतो ?

**दिगंबर :** ( एकदम उठून ) सुमी, तुला कान फाडून ऐकायचं आहे ?

**सुमी :** हो!

**दिगंबर :** मग ऐक...होय! मला तुझा संशय येतोय!

**सुमी :** ( थंडपणे ) कशावरून ?

**दिगंबर :** ( एकदम तडकतो. ) शटप्! मला तुझे वकिली प्रश्न नको आहेत. तू वाकड्या मार्गानं जाते आहेस, एवढं मला कळलंय–विचार न करता आपण मोहात गुरफटत गेलो, तर आपल्या विचारशक्तीचा उपयोग काय ? तू विचार करायला पाहिजेस–तू एका चांगल्या–सभ्य पुरुषाशी लग्न झालेली बाई आहेस–कुलीन घरात आहेस... शरीराच्या लिलावासाठी खिडकीत बसलेली नाहीस! ( ती टाळ्या मारते आणि हसते. ) हे काय ?

**सुमी :** तू तर, दिगप्पा, टाळीची वाक्यं फेकतो आहेस—

**दिगंबर :** ( स्वतःशीच ) कशी आतल्या गाठीची आहे!

**सुमी :** हे सगळं बोलताना, दिगप्पा, तू माझ्यावर अन्याय करतो आहेस–

**दिगंबर :** ( चिडून ) सुमी–मुमी.. मी तुला बजावून सांगतो...मी तुझं थोबाड फोडीन!

**सुमी :** ( निग्रहाने ) तू माझं थोबाड फोड–फोड! पण मी तुला हे असं बोलू देणार नाही--

**दिगंबर :** सुमी, मला कुणी खोटं बोललेलं आवडत नाही.

**सुमी :** कोण बोलतंय खोटं ? सांग– ( त्याचा हात हिसकावून ) कोण बोललं खोटं ?

**दिगंबर :** तू– तू खोटं बोलते आहेस, ते मला माहीत आहे. काल तू त्या मिसेस् इराणीशी आणि पोसेलाशी स्पर्धा करीत होतीस . पिऊन तू रेहमानच्या अंगावर पडत होतीस– खिदळत होतीस– त्याच्याबरोबर आतल्या खोलीत जात होतीस–

**सुमी :** सोशल लाईफमध्ये तेवढं क्षम्य असतं, दिगप्पा! मी एका बिझनेसमनची बायको आहे! धंद्यासाठी–

**दिगंबर :** चूप! मी बारा-साडेबाराला निघालो. मी तुला म्हटलं, 'चल माझ्याबरोबर.' मी तुला पोचवणार होतो घरी; पण तू उशिरापर्यंत राहिलीस–

**सुमी :** कुठं उशिरापर्यंत ? तू निघालास आणि अर्ध्या तासानंच मी निघाले–

**दिगंबर :** ( तिचे थंड खोटे बोलणे असह्य होऊन ) खोटं–खोटं! ( असे ओरडत तो तिच्या थोबाडीत मारण्यासाठी हात उगारतो. ती चुकवते. ) हरे राम! मी, सुमी, तुझ्यावर हात उगारला माझा तोल गेला! ( खाली बसतो. ) पण तुला सांगतो, ते कान देऊन ऐक—तू रेहमानच्या घरून आज सकाळी सात वाजता घरी आलीस...

**सुमी :** कशावरून ?

**दिगंबर :** मी रेहमानच्या घरी सकाळी फोन केला होता. ( तो सुमीकडे वळून पाहतो. सुमी गप्प राहते. दिगंबरच्या नजरेला नजर देते ..आणि खाली बघते. ) खरं, की खोटं ? ( ती गप्प राहते. ) सुमी, मला माफ कर. मी तुझ्यावर हात उगारला

मला अधिकार नसताना—

**सुमी :** तुझा तो अधिकार आहे, दिगप्पा! (थोडा वेळ दिगप्पाच्या नजरेकडे बघत राहते. आणि—) तू हे घनश्यामला सांगणार आहेस?

**दिगंबर :** होय..

[ काही वेळ शांतता पसरते. ]

**सुमी :** दिगप्पा, तू मला एक संधी देऊन क्षमा करायला पाहिजेस. (दिगप्पा गप्प राहतो. तो दुःखी आहे. थोडा वेळ थांबून) तू खरोखरच सकाळी रेहमानला फोन केला होतास?

**दिगंबर :** इतका मी मूर्ख नाही. पण मी सकाळी इथं फोन केला होता—नरहरीला.

**सुमी :** दिगप्पा, हे तू खरोखरच सांगणार आहेस घनश्यामला?

[ दिगप्पा काय सांगावे, याचा विचार करीत सुमीच्या तोंडाकडे बघत राहतो. तेवढ्यात लॅच-की उघडून हातात बॅग घेऊन घनश्याम आत येतो. ]

**घनश्याम :** (एकदम मोठ्याने हसत) अरे, दिगप्पा, हाः हाः! मी नाहीसा बघून माझ्या बायकोला पळवून नेतो आहेस, की काय? (मोठ्याने हसतो.) तरी बरा वेळेवर आलो मी... (हसतो.)

**दिगंबर :** नाही, रे, बाबा. (कृत्रिम हसत) घरी एक आहे, तीच सांभाळणं कठीण झालंय...

[ तवढ्यात सुमी घाईघाईने पुढे जाते आणि घनश्यामला बिलगते. घनश्याम तिला जवळ घेतो. आणि तिच्या केसांवर गाल घासतो. तिच्या गालाच्या चुंबनासाठी तोंड पुढे करतो, तोच— ]

**दिगंबर :** अरे, थांब ..मी आहे इथं. काहीतरी सभ्यपणा पाळा.

**घनश्याम :** (हसत) बंड्या कुठं गेला? (हाका मारीत) बंड्या ए बंड्या . तुला मी काय आणलंय, बघ..

**सुमी :** (पटकन) तो ममीकडे गेलाय

**घनश्याम :** का? एकदम?

**सुमी :** काल ममीकडे मी गेले होते. वेळ जाईना, म्हणून. तर मला म्हणाला, राहतो. ममीही म्हणाली गेलाय नरहरी आणायला .. (दोघेही एकमेकांना बिलगून आत

जाता जाता ) बस, रे, दिगप्पा ...

**घनश्याम :** बैस, रे, दिगप्पा... वॉश घेऊन येतो. लेट्स ड्रिंक टुगेदर... ( दोघेही जातात. )

**दिगंबर :** ( दोन्ही हात वर उचलून वर बघतो.) परमेश्वरा, तुझी लीला अगाध आहे. माणसाचं मन म्हणजे महासागर आहे. कशाचा थांगपत्ता लागणं शक्य नाही. ( थोडा वेळ विचार करीत बसतो. मागून संगीत. मग ) मी यातलं घनश्यामला काहीही सांगणार नाही. शक्यच नाही. पण त्याआधी मला तिच्याकडनं वचन घ्यावं लागेल.

[ तेवढ्यात सुमी येते व त्याच्या शेजारी बसते. ]

**सुमी :** ( खाजगी आवाजात ) मी तुझ्या पाया पडते, दिगप्पा ..

**दिगंबर :** मी सांगणार नाही. पण मला तुझ्याकडनं वचन पाहिजे. तू हा मार्ग सोड. या मार्गानं तू परत जाता कामा नये. अग, एकमेकांशी फेथफुल राहण्यात...एकनिष्ठ राहण्यात सुद्धा सुख असतं, आनंद असतो. अग, आमची गंगूकाकी पाहा... तिला नवऱ्याचं...आमच्या काकांचं सुख मिळालं नाही...पण ती मनानं किती आमच्या घराला एकनिष्ठ राहिलीय...माझी चंपू सुद्धा ..अग, मनाला कधी ब्रेक लावावा, हे वेळीच कळायला हवं...

**सुमी :** मला तुझं हे ब्रेकचं प्रकरण, दिगप्पा, कधी कळलंच नाही.

[ थोडा वेळ शांततेत जातो. ]

**घनश्याम :** ( टॉवेलने तोंड पुसत येत ) कसं काय, दिगप्पा ? ( आठवून ) अरे, हो ! गंगूकाकीचा काही पत्ता ?

**दिगंबर :** छे ! अजून काही पत्ता नाही !

**घनश्याम :** वसन्ता काय म्हणतो ? त्याचं पत्र वगैरे ?

**दिगंबर :** आलं होतं परवा पत्र !...खुशाल आहे.

**घनश्याम** मला या तुझ्या गंगूकाकीची कमाल वाटते !...एकटी उठून गेली, म्हणजे... ती हुबळीलाच गेलीय–

**दिगंबर :** मी जातोय उद्या हुबळीला...

[ तेवढ्यात फोन वाजतो. सुमी फोनकडे धावणार, तोच.. घनश्याम जवळ असल्यामुळे तो फोन उचलतो. सुमी भेदरलेली असते. घनश्याम 'हॅलो– ' म्हणतो . पुनः पुन्हा ' हॅलो हॅलो ' म्हणतो. पण पलिकडून

उत्तर नाही, म्हणून फोन खाली ठेवतो. दिगंबरही अवघडून बघतो. ]

सुमी : कुणाचा फोन ?

घनश्याम : कोण जाणे! डिस्कनेक्ट झाला! (आवाज बदलून) एनी वे... सुमे, (सुमीकडे बघत राहतो) तू म्हणजे—

सुमी : (घाबरून) काय झालं ?

दिगंबर : (तोही त्याच क्षणी घाबरून) का? काय झालं ?

घनश्याम : अग, आमची प्यायची काही सोय कर... चल लौकर.. (ती आत पळते.) तुझ्या आबांना कळवलं आहेस?...गंगूकाकी पळालीय, ते—

दिगंबर : आबांचा पत्ता कुठं असतो आमच्याकडे? कसं कळवणार? आमची गंगूकाकी म्हणते, त्याप्रमाणे त्यांना शापच आहे वणवण भटकायचा—

घनश्याम : तुझ्या आईचं आणि आबांचं का पटत नाही, रे?

दिगंबर : सांगितलं ना, काही म्हणजे काही कळायचं नाही! रोज त्यांच्या मारामाऱ्या! गुराला बडवावं, तसं ते आईला बडवीत. एकदा तर वसन्तानं चिडून आबांच्या हातातली छडी ओढून घेतली होती.. वसन्ता बारा वर्षांचा होता-मग एकदा ते घर सोडून गेले, ते गेलेच ..कधी तरी एकदम उगवतात. दोन दिवस राहतात रात्री कुठं तरी बाहेर झोपतात आणि निघून जातात—

घनश्याम : पण हे कधी तरी एकदा मिटायला पाहिजे.

दिगंबर : कठीण आहे!

घनश्याम हे गंगूकाकीनं मिटवायला हवं...ती थोरली सगळ्यांत—

दिगंबर : एक मात्र ..इथनं जाताना प्रत्येक वेळी आबा गंगूकाकीच्या पायांवर डोकं ठेवून पाया पडतात...गंगूकाकी गॅलरीत बसते.. बसल्याबसल्याच ती पाय पुढं करते ..आबा तिच्या पायांवर डोकं ठेवतात ..आणि 'जपून राहा–' एवढेच दोन शब्द पुटपुटतात. मग गंगूकाकी एकदम त्यांच्या अंगावर ओरडते, 'ही वणवण आता संपायची कधी? हे डोकं ठिकाणावर यायचं, की नाही?' (गहिवरतो...)

घनश्याम : मग काय म्हणतात आबा?

दिगंबर : (डोळ्यांवरून बोटे ओढीत) डोळे पुसतात. दहाची नोट काकीच्या हातात सारतात, आणि उठून चालायला लागतात...

घनश्याम : हे ऐकताना, दिगप्या, मला तर कशाचा थांगपत्ता सुद्धा लागत नाही.

दिगंबर : तुला एक सांगतो. घनश्याम, हे माणसाचं मन आहे ना...तो एक मोठा महासागर आहे, महासागर! कशाचा काही थांग लागायचा नाही! (पुन्हा डोळ्यांवर रुमाल ओढतो. घसा खाकरतो, आणि–) पुरे हा विषय! हा विषय मला नकोसा वाटतो!

**घनश्याम** : ( विषय बदलत ) मग तू उद्या हुबळीला जातो आहेस ?

[ तेवढ्यात सुमी मद्याचा ट्रे घेऊन येते. ट्रे पुढ्यात ठेवून बसते. ]

**दिगंबर** : गेलंच पाहिजे ! काय करणार ?
**घनश्याम** : असं करू या का ? आपण मोटर काढू ... आणि जाऊ हुबळीला ... तू, चंपू ... मी, सुमी ...
**सुमी** : छे, रे, बाबा ! मला वेळ नाही ! माझी विमेन्स क्लबची ट्रिप आहे खंडाळ्याला ...
**दिगंबर** : हल्ली ही विमेन्स क्लबमध्ये खूप रमलीय, नाही ?
**घनश्याम** : क्लबच्या फंड–रेझिंग कमिटीवर आहे !... रेहमानकडून पाच हजार रुपये मिळवलेत फंडासाठी ... ( ती एकदम अस्वस्थ होऊन उठते. दिगंबरही तिच्याकडे तशाच अस्वस्थतेने बघतो. ) काय झालं ?
**दिगंबर** : कुठं काय ?
**घनश्याम** : मग असा काय बघतो आहेस ? ( सुमीला ) तू का उठलीस ? बैस ना—

[ ती अवघडून बसते. ]

**दिगंबर** : फंड कशासाठी हा ?
**घनश्याम** : बिल्डिंग बांधताहेत क्लबसाठी . नाही, ग ?

[ ती मानेने ' हो ' म्हणते. ]

**दिगंबर** : फायरचं इन्शुरन्स कुणाकडे ?
**घनश्याम** : ( मोठ्याने हसत ) शुभ बोल, रे, नाऱ्या ! बिल्डिंग बांधायच्या आधी फायरचं काय ? ( हसतो...सुमीही थोडी अवघडून हसते.) आधी बिल्डिंग तर होऊ दे !
**दिगंबर** : तसं नाही, मी तेही इन्शुरन्स करतो, हे हिच्या कानांवर घातलं !
**घनश्याम** : शी विल डू इट् ! करशील ना, ग ?
**सुमी** : ( थकून ) म्हणजे काय ?
**घनश्याम** : ती करील ! क्लब तिच्या हातात आहे ... तिलाही काही तरी सोशल–वर्क करायचं होतं...आय् सेड् ..ओके ..गो अहेड्...तेवढंच वेगळं वातावरण ... बरं असतं ते !
**दिगंबर** : वा: ! आणि घरचं–मुलांचं कुणी बघायचं ?
**घनश्याम** : होतंय घरचं ! इराणी म्हणतो, ' आपण पुरुष बाहेर हिंडतो मोकळेपणानं–

म्हणून आपणांस कल्पना येत नाही, पण बायका कोंडल्यासारख्या घरी असतात. वर्षानुवर्ष त्यांचं तेच तेच जीवन... त्याच त्याच गोष्टी... त्यांनाही वाटत असतं, आपण बाहेर पडावं...आपल्याला इतरांनी बघावं– आपल्याशी बोलावं...मैत्री ठेवावी. ..( सुमी जरा अस्वस्थ होते. ) मेन शुड् ॲप्रिशिएट देम– देअर ड्रेसिस्-देअर लुक्स्...आय थिंक, धिस इज व्हेरी व्हॅलिड ! वॉट इज राँग ?

**दिगंबर :** हे नवीन विचार म्हणजे जरा .. (हसतो. )

**घनश्याम :** का ? इराणी म्हणतो, ते तुला नाही पटत ? (दिगंबर नुसताच अवघडून हसतो ) मला पटतं, बुवा. विशेषतः, ज्या स्त्रिया सेन्सेटिव्ह असतात ना, त्यांच्यावर आपण फार अन्याय करतो; असं वाटतं मला. म्हणून मी सुमीला म्हटलं, गो अहेड् ! ..घरी बसायची गरज नाही. ( सुमी उठते. ) बैस ना–

**सुमी :** ( गंभीरपणे .. अस्वस्थपणे... ) नरहरी आला का पाहते... ( आत जाते. )

**घनश्याम :** वॉट् इज राँग विथ हर ?

**दिगंबर :** काही ठाऊक नाही !

**घनश्याम :** या सुमीचाही प्रॉब्लेम आहे... शी रिफ्युझेस् टु ग्रो ओल्ड. तिचा सगळा उत्साह सोळा वर्षांच्या मुलीसारखाच आहे अजून...मला नेहमी वाटतं, कामाचा रगाडा आणि टेन्शन्स् संपवून घरी आलो, की शान्त बसावं ! पण सुमीला नाही आवडत ते तिला प्रत्येक क्षणाला थ्रिल हवं.. शी इज इन् लव्ह विथ लाइफ्... आय काण्ट कोप अप् विथ हर !...तिच्या उत्साहाच्या आड मी कशाला येऊ ? म्हणून मी तिला संपूर्ण मोकळीक दिली असं स्वातंत्र्य देणं भाग आहे, रे...हा काही पूर्वीचा जमाना नाही !

**दिगंबर :** इन् अ वे, येस् ! बट् इट् डिपेण्ड्स् ! आता त्या गोखलेबाई घे...किंवा आमची चंपू घे ! त्यांना कुठं तसं वाटतं ? मला वाटतं, त्यांना घरकामातच आनंद अधिक वाटतो...

**घनश्याम :** छे ! तसं मानणं चूक आहे ! आपण बायकांना बाहेरचं काही दाखवायलाच त्यांना थोडं स्वातंत्र्य द्यायलाच तयार नसतो...

**दिगंबर :** तू हे म्हणतोस, घनश्याम, ते सगळ्यांच्याच बाबतीत खरं असतं, असं नाही. ती गोखलेबाई पार्टीला आली होती .ती कुणात मिक्स झाली नाही.

**घनश्याम :** मिक्स होणं नवऱ्याला आवडलं नसतं. तुला एक सांगतो, दिगप्पा, माणसाच्या मनातलं नेमकं सांगणारी यंत्रं कुणी काढली ना, तर माणसं पटापट आत्महत्या करतील.

**दिगंबर :** का ? का म्हणून ?

**घनश्याम :** कारण, आपण आपल्या मनातल्या मनात काही तरी लपवण्यात–आतल्या–आत दडपण्यात.. मन मारण्यात दिवस काढीत असतो. आणि अनेकदा असे आपण

काही करतोय ..याचीही आपल्याला जाणीव नसते.

**दिगंबर :** फॉर एक्झाम्पल...

**घनश्याम :** ( विचार करीत ) फॉर एक्झाम्पल....पार्टीच्या रात्री तुझी चंपा रडली...

**दिगंबर :** ( हातरुमाल काढून घाम पुसत ) तू जागा होतास ?

**घनश्याम :** चांगलाच ! तर तिचं रडणं...

**दिगंबर :** उगाच रडत होती, रे, ती...प्याली होती ना !

**घनश्याम :** पण का रडली, ते कधी कळायचं नाही . कदाचित तिलाही कळायचं नाही...असं असतं एकेक मन—

**दिगंबर :** ते जाऊ दे, रे !

[ फोन वाजतो. घनश्याम फोन घेतो. सुमी आतनं धावत येते. तिन पोटाशी ॲप्रन बांधलेला आहे. ]

**घनश्याम :** हॅलो, रेहमानजी...हाऊ आर् यू ? आय् केम् जस्ट नाऊ ! थँक्यू व्हेरी मच ! इट् इज् इंडीड व्हेरी काइंड ऑफ यू. शी इज् फाइन्.. शुअर आय् विल् ! थँक्स् . रेहमानचा फोन...

**सुमी :** काय म्हणाले ?

**घनश्याम :** काही नाही ! सहज चौकशी...टूर कशी झाली ? एनी वे–रेहमानच्या पार्टीला गेला होतास, की नाही ?

**दिगंबर :** हो !

**घनश्याम :** कोण कोण होतं ?

**दिगंबर :** तुझ्याकडे पार्टीला आलेल्यापैकी बरेचजण होते– मिस्टर ॲण्ड मिसेस् इराणी, मिस्टर ॲण्ड मिसेस् गोखले, तो त्याचा चमचा– एस्पी, ती पॉमेला..

**घनश्याम :** रेहमानच्या पॉलिसीचं काय झालं ?

[ सुमी आत जाते. ]

**दिगंबर :** त्यानं कबूल केल्याप्रमाणं बिझनेस दिला. आता मेडिकल होईल . या रेहमानचं एक मला कोडं आहे बघ–

**घनश्याम :** काय झालं ?

**दिगंबर :** त्यानं आपली पॉलिसी राजस्थानमधल्या एका शाळेला असाइन केलीय्... मी म्हटलं, ' लग्न करा...बायकोच्या नावानं पॉलिसी करा '... म्हणाला, ' नाही ! लग्नासाठी जी लॉयल्टी, टेंपरामेंट लागतं, ते आपल्यांत नाही ! ज्या दिवशी गात्रं

शिथिल होतील, ज्या दिवशी प्रेम करावंसं वाटेल... कुणात तरी गुंतावं, असं वाटेल ...त्या दिवशी आय् विल् एण्ड माय् लाइफ...आत्महत्या करीन !—विचित्र आहे, नाही ?

**घनश्याम** : त्यानं पॉलिसी घेतली ना ?...झालं ! केवढ्याची घेतली ?

**दिगंबर** : तीन लाखांची. तीन लाख ! म्हातारपणची प्रोव्हिजन केली.

**घनश्याम** : पैसा ही एक प्रोव्हिजन, पण एकमेव नव्हे, दिगप्पा ! माझ्याकडे आज पैसा आहे. पण सुमी नसती..बंड्या नसता, तर पैशाला काय अर्थ ? म्हणून बायको हवी. मुलं हवीत...मुलगा असो, मुलगी असो. त्याशिवाय आयुष्याला अर्थ नाही ! रेहमान . म्हातारपणी त्याच्या लक्षात येईल, की अविवाहित राहून आपण मोठी चूक केली.

**दिगंबर** : बाय द वे...त्याचं आणि मिसेस् इराणीचं लफडं मिस्टर इराणीला कसं काय चालतं ?

**घनश्याम** : एकेकाळी त्यांचा प्रेमविवाह झाला होता, दिगप्पा. इराणी आणि मिसेस् इराणी. एक मुलगी आहे त्यांना मोठी...आता ती इराणीला म्हणते ..'यू डोण्ट सॅटिसफाय मी एनीमोअर.'

**दिगंबर** : ( घाम पुसत ) अरे, बाप रे ! ..असं म्हणते ? म्हणजे, म्हणाली ?...

**घनश्याम** : दॅटस् वॉट...इराणी सेज. तो प्यायला लागला, की खूप फ्रँक बोलतो. तो म्हणतो...' धिस् इज् पर्फेक्टली लेजिटिमेट. मिळेल तिथनं तिनं सुख घ्यावं...ती म्हणते, ' तुला माझ्याकडनं सुख मिळत नसेल, तर तूही मिळेल तिथनं सुख घे. पण आपण भांडणं करायची नाहीत. गोडीगुलाबीनं राहायचं...' वयानुसार शारीरिक सुखाची ओढ संपेल...मग पुन्हा एकमेकांबद्दल ओढ वाटेल...कदाचित म्हातारपणी इराणीबद्दल अधिक ओढ वाटेल...कारण त्यानं तरुणपणी अगदी जगावेगळा समंजसपणा दाखवला, म्हणून. ( दिगंबर शूः शूः करीत कपाळावरचा घाम पुसतो. ) तुला घाम का एवढा फुटतोय ? इराणीचं तत्त्वज्ञान नुसतं ऐकून ? तो म्हणतो, ' व्यक्ती, व्यक्तीची प्रकृती वेगळी. त्यांची गरज वेगळी. आणि लग्न ही एक सामुदायिक तडजोड. त्यात व्यक्ती व्यक्तीचा वेगळा विचार होत नाही.'

**दिगंबर** : ( नमस्कार करीत ) ग्रेट...ग्रेट ..सोल ! युवर ब्लडी इराणी इज ए ग्रेट सोल ..! एवढा समंजसपणा दाखवायला . आपली, बुवा, ताकद नाही... ! इतका रोखठोक विचार करण्याची आणि पुन्हा तसं वागण्याची ..समज, उद्या तुझ्यावर अशी पाळी आली, तर ?

[ तेवढ्यात फोन वाजतो. फोन वाजताच सुमी आतून धावत बाहेर येते. घनश्याम फोन उचलतो. ती ऐकत उभी राहाते. ]

**घनश्याम :** हॅलो, कोण ? हो ... हो ... आहे ... आहे ... बोलणार ... ? बोला ... ( सुमीला वाटते, फोन तिलाच आहे. ती नर्व्हस होत पुढे येते. तेवढ्यात ) दिगप्पा, तुला आहे फोन ! ( फोन देतो. )

**दिगंबर :** मला ? ( फोन घेतो. )

**घनश्याम :** वहिनींचा आहे–

**दिगंबर :** हॅलो ... हॅलो ... हं ... हं ! काय, ग ? ( एकदम हर्षित होतो. ) सापडली ? कुठं होती ? हुबळीला ? ... कुठं ? ( कपाळावर हात मारीत ) अरे, बाप रे ! वसंताच्या मेंटल हॉस्पिटलात ? ... असं ? ... वसंताचं पत्र आलंय ? हां ... हां ! वसंता बरा आहे ना ? ... बरं ... बरं ... ठेवतो ... नाही, ग ... उशीर नाही लावीत ... आत्ताच एका मिनिटापूर्वी आलो मी इथं ... येतो ... येतो ... ताबडतोब निघतो ... ( फोन ठेवतो. काय म्हातारीची हिंमत, बघ ! कुठनं कुठं पोचली, बघ–

**घनश्याम :** एनी वे ... सापडली ! तिचं खरं खरं प्रेम आहे, रे, त्या वसंतावर ! दिगप्पा, चीअर्स ... चीअर्स ! ( ग्लासे उचलतात. )

[ काळोख ]

[ प्रकाश ]

[ घनश्यामचे घर. घनश्याम पीत बसला आहे. नरहरी अस्वस्थ आहे. तेवढ्यात घाईघाईने दिगंबर येतो. ]

**दिगंबर :** काय म्हणतोस ? एवढ्या घाईघाईनं का बोलावलंस ?

**घनश्याम :** ( उठून उभा राहात ) दिगप्पा, कान देऊन नीट ऐक—

**दिगंबर :** काय ?

**घनश्याम :** मी सुमीला आयसोलेट करतोय ... सगळ्यापासनं तोडून टाकतोय ... कुणीही भेटायचं नाही तिला—

**दिगंबर :** ( घाबरतो. ) पण का ?

**घनश्याम :** ती त्या ब्लडी रेहमानमध्ये गुंतलीय ...

**दिगंबर :** ( खोटे आश्चर्य करीत ) काय, म्हणतोस काय, तू घनश्याम ?

**घनश्याम :** तुला त्याचा अंदाज आहे ... खोटं बोलू नकोस–

**दिगंबर :** कशावरनं म्हणतोस तू हे ?

**घनश्याम :** त्याची मला चर्चा नकोय! लेट्स् नॉट डिस्कस इट्! खंडाळ्याला बिझिनेस क्लबच्या ट्रिप्स्... बोगस! खंडाळ्याला ती रेहमानबरोबर जात होती... (ओरडून) अ‍ॅन्ड शी हॅड गट्स् टु टेल मी... म्हणे, रेहमानला पार्टनर करून घ्या, म्हणजे माझा इराणी!

[ तो विचित्र हसतो. सगळं जग त्याला हसल्यानंतर हसावं, तसा हसतो. ]

**दिगंबर :** पण, घनश्याम, काही पुरावा?

**घनश्याम :** ते तू मला काही विचारू नकोस. आय् अ‍ॅम थरली कन्व्हिन्सड्... इव्हन् हर पपा अ‍ॅन्ड ममी... त्या दोघांचीही खात्री पटलीय... तीही दोघं आता माझ्या घरी येणार नाहीत... त्यांनीही सुमीला बंदी केलीय त्यांच्या घरी यायची... पपांनी तर काल तिच्या मुस्कटात मारली!

[ घाम पुसण्याचे निमित्त करून डोळ्यांवरून बाही ओढतो. ]

**दिगंबर :** बंट्या कुठं आहे?

**घनश्याम :** पपांकडे! पण पुढल्या आठवड्यात मी त्याला पाचगणीला नेऊन ठेवणार आहे. तोसुद्धा तिच्या दृष्टीस पडता कामा नये... तिला एका खोलीत मी बंदिस्त केलंय्. नरहरी फक्त जेवणाचं ताट आत सरकवील... सारखे फोन येताहेत. मी 'हॅलो' म्हटलं, की फोन डिस्कनेक्ट होतोय... ब्लडी बीस्ट!

**दिगंबर :** (गभंगळित आवाजात) आय् होप... आय् होप... (त्याला काय बोलावे, ते कळत नाही.) आय् थिंक, घनश्याम... सुमी सुधारेल... तिची चूक तिच्या लक्षात येईल. बायकांना काय... पुरुषांना काय, मोहाचे क्षण असतात... मनाच्या कमकुवतपणामुळे पाय घसरतो... कळत नाही कधी कधी... तोल सांभाळण्यात सुद्धा सुख आहे, ते कळत नाही... एखाद्या वेळेस शारीरिक सुख कमी असेल, पण दुसऱ्याच्या सुखासाठी आपण तोल सांभाळतोय, या कल्पनेत सुख असतं.

**घनश्याम :** (दिगंबरच्या या सगळ्या बोलण्याकडे त्याचे लक्षच नसते.) तिनं त्या रेहमानमध्ये काय पाहिलं, तेच मला कळत नाही! (खाली बसून हात आपटत) आय् जस्ट वॉण्ट टु नो... त्याच्यात काय विशेष आहे? आय् मस्ट नो! अरे, आपली बायको दुसऱ्याला लागू आहे, यातलं दुःख तुला कळायचं नाही, दिगप्पा! गेले काही दिवस मला झोप नाही! झोप नाही! (एकदम शांतता. दोघेही क्षणभर एकमेकांकडे बघत राहतात. मग एकदम ..) तू, दिगप्पा, येतोस?

**दिगंबर :** कुठं?

घनश्याम : कुठंही !... बारमध्ये जाऊ. आज मला खूप प्यावं, असं वाटतंय. तोल... तोल जाईपर्यंत !

[ तो मुळूमुळू रडू लागतो. बाहीने डोळे पुसतो. ]

दिगंबर : ( खंबीरपणे ) डोण्ट बी सिली, घनश्याम ... ! मी तुझ्याबरोबर बारमध्ये येणार नाहीच...आणि तूही बारमध्ये गेलेलं मला चालणार नाही. तू बारमध्ये जायचं नाहीस, मी तुला बजावून ठेवतोय...याद राख, तू बारमध्ये गेल्याचं मला कळलं, तर...

[ घनश्याम उठतो आणि दिगंबरच्या खांद्यावर डोके टेकवून काही क्षण रडतो. दिगंबर दुःखभराने त्याला थोपटतो. ]

घनश्याम : एक मात्र कर...
दिगंबर : काय ?
घनश्याम : यातलं काही...माझी शपथ आहे तुला... यातलं काही आईपाशी किंवा चंपूवहिनीपाशी बोलू नकोस... चुकूनही !
दिगंबर : मी कसा बोलेन, घनश्याम ?
घनश्याम : म्हणजे काय, गावभर आपल्या अब्रूचं शेण व्हायला नको. ( तेवढ्यात सुमी बाहेर येते. ती कशीतरीच दिसते. घनश्याम ओरडतो. प्याल्यामुळे बोलणे जड आहे ) हॅट्ट ! ही साली रांड डोळ्यांसमोर कशी ? तू खोलीबाहेर का आलीस ?
दिगंबर : ओरडू नकोस, घनश्याम !
घनश्याम : चूप ! ( सुमीला ) गेट आऊट्, आऊट् ऑफ माय साइट... साली ! जाते, की नाही ? ..

[ ती घाबरून आत पळते. ]

दिगंबर : ( घनश्यामला छातीशी धरतो. घनश्याम त्याच्या खांद्यावर डोके टेकून मुलासारखा रडतो. ) घनश्याम ! खुळा, की काय ?...शान्त हो. हे असं करून भागणार नाही. आपल्याला यातनं मार्ग काढला पाहिजे. बैस. जरा विश्रांती घे...

[ घनश्याम आणि दिगंबर बसतात. थोडा वेळ शांततेत जातो. ]

**घनश्याम** : तू येत्या दोन–चार दिवसांत काय करणारेस ?

**दिगंबर** : वसंताकडे जाऊन गंगूकाकीला भेटून येतो..

**घनश्याम** : मी काय म्हणत होतो... पुढल्या आठवड्यात कुठं जाऊ नकोस–

**दिगंबर** : का...?

**घनश्याम** : मी बंड्याला घेऊन पाचगणीला जातोय... त्याला तिथं ठेवतो ! तो रडला, तर चार दिवस तिथं राहीन... तुझं जरा इथं लक्ष असू दे !

**दिगंबर** : राहीन मी. बट्, व्हॉटेव्हर यू से .. घनश्याम, तू तिला एकदा चान्स दिला पाहिजेस. ती चुकली... तिला तू पुन्हा मार्गावर येण्याची संधी दिली पाहिजेस...

**घनश्याम** : ते आता शक्य नाही ! तिला संधी मिळणार नाही ! माझ्या बाजूनं ती मला मेली आहे. मी तिला घराबाहेर काढली असती...पण मग सगळं गावभर होणार. गाव हसणार मला...

**दिगंबर** : मी रेहमानला भेटतो. हे प्रकरण मिटवून टाकतो.

**घनश्याम** : हे प्रकरण मिटलं, तरी मला यापुढं तिच्यावर पूर्वीसारखं कधीच प्रेम करता येणार नाही. अशक्य...! अशक्य आहे ते...! मलाही एक आश्चर्य वाटतं... द वे वुई ल्व्हड् इचअदर . खरोखर आम्ही सुखात होतो, दिगप्पा ! आपलं शरीर सुद्धा काय आहे... म्हटलं, तर सुखाचा आगर. पण त्यातनं दुसऱ्यानं सुख घेतलंय म्हणताच संपलं. ते शरीर आता मला नको झालंय ! नको झालंय...! सगळ्या सुखाचाच आता मला वीट आलाय. दिगप्पा... बंड्या गळ्यात नसता, तर कदाचित मी कुठं तरी निघून गेलो असतो तुझ्या आबांसारखा... देशोदेशी भटकत... कदाचित बैरागी होऊन... किंवा कदाचित आत्महत्याही केली असती...

**दिगंबर** : काय वेड्यासारखा बरळतो आहेस तू, घनश्याम ? मूर्ख आहेस...!

**घनश्याम** : हा शॉक मला भयानक वाटतो, रे... विचार करता करता डोकं फिरलं नाही, म्हणजे झालं...! बंड्याचं अजून शिक्षण व्हायचंय... तो मोठा होणार... हा सगळा बिझनेस हातात घेणार... खूप वर्षं आहेत अजून...!

**दिगंबर** : तू असं कर. जरा शान्त पडून राहा. मग आपण विचार करू. काही तरी तोड काढू. तोड ही निघालीच पाहिजे. मी निघतो... ( उठतो. )

**घनश्याम** : ( त्याला बसवीत ) बैस जरा. मी एकटा असलो, की मला भ्याल्यासारखं होतं... बैस, बैस. थोडा वेळ. अरे, नरहरी... ( हाका मारतो, नरहरी येतो. ) प्यायची सोय कर. व्हिस्की आण... सोडा आण... ( मुद्दाम हे मोठ्याने बोलतो. )

**दिगंबर** : घनश्याम, तू आधीच खूप प्याला आहेस.

**घनश्याम** : असू दे. मला तुझ्याशी थोडं बोलायचंय... ( थांबून ) मला आता कशात इंटरेस्ट वाटेनासा झालाय... व्यायामात नाही... धंद्यात नाही... बंड्या मोठा असता, तर त्याच्या ताब्यात धंदा देऊन मी गेलो असतो कुठं तरी तोंड घेऊन...

सारखं वाटतं, लोक मला हसताहेत...

[ नरहरी ट्रे आणून ठेवतो. ]

दिगंबर : कुणी हसत नाही. ही तुझ्या मनाची भुतं आहेत. तू यावेळीच खंबीर राहायला पाहिजेस. घनश्याम, सुमीला पश्चात्ताप होईल. तिच्याशी तू जुळवून घ्यायला पाहिजेस.

घनश्याम : नेव्हर...नेव्हर... दिगप्पा ! मी सुमीच्या अंगाला कधी स्पर्श सुद्धा करणार नाही...

[ पितो, गटागटा पितो. ]

दिगंबर : हे तू काय चालवलं आहेस ? घनश्याम ? हे काय तुझं पिणं ? नरहरी... ( हाक मारतो. ) उचलून आत ठेव... चल, उचलून आत ने...

घनश्याम : थांब, रे. ( ओरडत ) असू दे. मला प्यायचंय्, नरहरी...

दिगंबर : त्याला हात लावशील, तर मुस्काट फोडीन तुझं, घनश्याम...!

[ ट्रे उचलतो आणि नरहरीकडे देतो. ]

घनश्याम : नरहरी... नरहरी... ( ट्रे घेण्यासाठी उठतो. पण उठता उठता कोसळतो. दिगंबर नरहरीला ढकलतो आणि ट्रे आत टेवायला सांगतो. ) मला आणखी एक बाटली आण. ( असे मोठ्याने ओरडतो ). मी हे मोठ्याने का ओरडतो, माहीत आहे ?

दिगंबर : का ?

घनश्याम : मग ती रांड आत ढसढसा रडते... मी पितो, म्हणून... ती रडावी, म्हणून मी पितो... तिला रडवून रडवून मी ठार मारणार आहे... तिनं माझ्या आयुष्याचं शेण केलंय, शेण . . ! (मुद्दाम मोठ्याने) नरहरी ... एक बाटली आण ... !

सुमी : ( आतून ) नरहरी .. त्याला बाटली देऊ नकोस...! ( ती मोठ्याने रडल्याचा आवाज येतो. पाठोपाठ ती बाहेर येते. ) पिऊ नकोस...पिऊ नकोस, घनश्याम... !

घनश्याम : ( उठून उभा राहात) चूप ! तुला चाबकानं फोडीन. एक शब्द उच्चारशील, तर ...! ( ती रडतेच आहे. ) आणखी एक .. मी पाचगणीहून येईपर्यंत तू इथनं कुठं जायचं नाहीस मी आल्यावर वसंताकडे जा, गंगूकाकीला बघायला. तोपर्यंत तू हलायचं नाहीस. आणखी एक ... मला माझी आता शाश्वती नाही. मला ट्रस्ट

करायचाय...सगळ्या पैशाचा...बंड्यासाठी. यू विल वी दि मॅनेजिंग ट्रस्टी...

**दिगंबर :** काय वेड्यासारखं बोलतो आहेस, घनश्याम, तू ? मी आशावादी आहे. या सर्व उत्पाततनं सगळं बरं होणार आहे.

**घनश्याम :** ( त्याच्या खांद्यावर हात टाकत ) दिगप्पा, मला एक सांग...खरं...खरं सांगायचं...

**दिगंबर :** काय ?

**घनश्याम :** बंड्या तरी माझाच आहे ना ? ( ते ऐकून सुमी एकदम मोठ्याने रडते. या क्षणी दिगंबराचा तोल जातो आणि तो घनश्यामच्या मुस्कटात मारतो. त्यामुळे तोल जाऊन घनश्याम खाली कोसळतो. ) मार...! मार... ! ( रडवेल्या आवाजात ) मला ठार...ठार मारून टाक...!

[ असे म्हणत तो उठतो आणि धडपडत वर जातो. घनश्यामला आपण मारले, या जाणिवेने दिगंबर खिन्न होतो. दुःखी होतो. डोके चोळत खाली बसतो. विषण्ण वृत्ती वाढवणारे संगीत चालू होते. ]

**दिगंबर :** सुमी, तू घनश्यामचे पाय धर आणि त्याची क्षमा माग. यातनं मला दुसरी तोड दिसत नाही...सुमी, तू चुकलीस...मोहाच्या क्षणी माणसानं अधिक विचार करायला हवा...थांबून थांबून, पुन्हा विचार करायला हवा...मला क्षणिक सुख मिळेल, पण माझ्या सुखामुळं दुसऱ्या कुणाला दुःख होणार आहे का, याचा आपण विचार करायचा असतो. ॲट सर्टन पॉइंट...तुम्ही थांबवलं पाहिजे.. जे मनात येतं, ते करण्यात अर्थ नाही...यू मस्ट डिनाय्... काही गोष्टी विचारपूर्वक नाकारल्या पाहिजेत...मोहाच्या गोष्टी नाकारण्यात मन मोठं होतं, सुमी...

[ ते ऐकून सुमी हमसून हमसून रडू लागते. ]

**दिगंबर :** रडू नकोस, सुमी, रडू नकोस— ! उगी राहा. ( गहिवरतो. स्वतःचे डोळे पुसतो. )

**सुमी :** ( रडत ) हे सगळं काय होतंय, ते मला कळेनासं झालंय, रे, दिगप्पा ! मी चुकले...कशी चुकले, कळत नाही...कधी विचार केला नाही...विचार...खोलवर विचार करण्याची कधी गरजही भासली नाही मला ! प्रत्येक क्षण लुटल्यासारखं काही तरी मी केलं...पण माझ्या संसारात तरी मला काय कमी होतं ? का ? का मी अशी चुकले ?

**दिगंबर :** तू त्या रेहमानला आता कायमची विसरणार आहेस ना ? ( ती मानेने हो

म्हणते.) घनश्याम, बंड्या तुला हवेत ना? (ती मानेने हो म्हणते.)

**सुमी :** पण घनश्याम हे सगळं विसरणार नाही. तो मानी आहे.

**दिगंबर :** तो एकदम खचलाय्...त्याला सावरायला थोडा अवधी दे. पण एक वचन हवंय तुझ्याकडून-(ती बघत राहते.) परत कधी त्याला–रेहमानला भेटायचं नाही–त्याच्याशी फोनवरसुद्धा बोलायचं नाही. कबूल? (ती मानेने हो म्हणते.) मला वचन दे. (ती हात पुढे करते. तो तिचा हात हातात घेतो.) पूर्वी दिलेलं वचन पाळलं असतंस, त्याच वेळी सावरली असतीस, तर आज हा प्रसंग ओढवला नसता. (ती एकदम हुंदके देत रडते आणि दिगंबरच्या खांद्यावर डोके टेकते. दिगंबर तिच्या केसांवरून हात फिरवितो.) रडू नकोस, सुमी, सगळं व्यवस्थित होईल! अग, तुला संसारात सुखी पाहणं हे माझं केवढं मोठं सुख होतं...आज तुझ्यापेक्षासुद्धा मी अधिक दुःखी आहे...जा...आत जा आणि विश्रांती घे. सारं ठीक होईल.. (ती जाते. दिगंबर विचार केल्यासारखा स्वतःशीच बोलू लागतो.) हे सगळं झालं तरी कसं? नक्की कधी? प्रथम...पहिल्या वेळी सुमीवर जबरदस्ती झाली असेल का? की सुमीच आपणहून? पण रेहमान घनश्यामपेक्षा अधिक सुख देईल, असं तिला वाटलं तरी कसं? आणि का? त्याच्या खाणाखुणा तरी कोणत्या? आणि अधिक सुख, म्हणजे तरी काय? सुखाच्या, अधिक सुखाच्या ... त्याहून अधिक सुखाच्या जाती असणार...आणि त्या सुख घेणाऱ्यालाच कळत असणार... अशाच अधिक सुखासाठी आबा प्रथम घराबाहेर पडले असतील का? पण मग गंगूकाकी? तिला तर कसलंच सुख माहीत नाही...मग ती एवढे कष्ट उपसून कशासाठी, कुणा-साठी जगते आहे? छे! ...अशा विचारा–विचारानं मनातला गुंता तेवढा वाढत जातो...अनेक प्रश्न...एकाचंही उत्तर नाही. सगळं अथांग...अथांग...तळाचा पत्ता नाही...पत्ता लागण्याचा संभवही नाही!

[ तेवढ्यात नरहरी धावत येतो. मागोमाग रेहमान येतो. तो अस्ताव्यस्त आहे. मनःस्थितीने थोडा बिघडलेला असावा. ]

**नरहरी :** साहेब– साहेब– (दिगंबराला हाका मारतो.)

**दिगंबर :** (एकदम दचकतो. धावत पुढे होतो. दबलेल्या आवाजात) रेहमान, आप यहाँ क्यों आये?

**रेहमान :** आपको मिलना था...आपके घर गया, तो मिसेस् सबनीसने कहा, आप यहाँ हैं...

**दिगंबर :** लेकिन आप क्यों आये हैं?

**रेहमान :** घनश्यामजी कहाँ हैं?

**दिगंबर :** ऊपर है, लेकिन आप यहाँसे तुरन्त जाइये...घनश्याम ऊपरसे यहाँ आ जाय तो नतीजा खतरनाक होगा ! जाइये...फॉर हेवन्स सेक... प्लीज गो–

**रेहमान :** इतनी कोई डरनेकी बात नही है, सबनीससाब !

**दिगंबर :** अगर आप सुमी से मिलना चाहते हैं, तो–

**रेहमान :** नहीं ! मैं नहीं मिलना चाहता। मुझे सिर्फ आपसे बात करनी है। ताकि आप सुमी और घनश्याम को समझा सकें। वी आर अॅडल्टस्, मिस्टर सबनीस...जो कुछ हुआ, सो हुआ ! आय् अॅम् डॅम् सॉरी फॉर इट्...बट वी मस्ट लुक अॅट थिंग्ज् इन प्रॉपर परस्पेक्टिव्ह...

**दिगंबर :** नरहरी, घनश्याम काय करतोय..?

**नरहरी :** वर झोपलेत...

**दिगंबर :** तू वर जा. तो उठला, तर धावत खाली ये सांगायला...जा... (तो जातो.) रेहमानजी, बी ब्रीफ...

**रेहमान :** आप के फ्रेंड कैसे हैं? घनश्यामजी ?

**दिगंबर :** त्याचं घर सध्या मोडकळीला आलंय...

**रेहमान :** आय नो.

**दिगंबर :** एक बात कहूँ ? तुम्ही जे काही केलं, ते योग्य केलं नाही...आफ्टर ऑल... घनश्याम तुमचा मित्र बनला होता...

**रेहमान :** (मान खाली घालतो.) आय् अॅम ऑफुली सॉरी...मी तिला पूर्वीच सांगितलं होतं, 'सुमी, तू माझ्या जवळ येऊ नकोस...आय् डोण्ट लाइक हॅपिली मॅरिड विमेन कमिंग इन् माय कॉन्टॅक्ट. मला कुणाचे सुखाचे संसार मोडणं आवडत नाही.' मी तिला सुरुवातीलाच सांगितलं होतं, 'सुमी, तू माझ्या नादाला लागू नकोस. एक दिवस तुझा संसार मोडेल...' बट, शी जस्ट इन्सिस्टेड. मी न बोलवता ती आपणहून खंडाळ्याला आली...खंडाळ्याला माझं कॉटेज आहे.

**दिगंबर :** म्हणजे सगळा दोष सुमीचाच ?

**रेहमान :** या बाबतीत दोषाचं असं वाटप करता येत नाही, सबनीससाहब ! काही गोष्टी घडून जातात. थिंग्ज् जस्ट हॅपन. का, ते सांगता येत नाही.

**दिगंबर :** एक बात पुछूँ ?

**रेहमान :** हां...हां...

**दिगंबर :** आपण खरं म्हणजे लग्न करायला हवं. त्या पोमेलाशी किंवा...

**रेहमान :** लग्न ! (विषण्णपणे हसतो.) शादी ! शादी के लिये एक जात का टॅपॅरमेंट चाहिये, सबनीससाहब ! वो मेरे पास नहीं है ! शादी करणं म्हणजे एकमेकांशी फेथफुल राहणं. आय् काण्ट ! म्हणून मी कुणावर प्रेम करत नाही. खरं किंवा खोटं मे बी...मला प्रेम करता येत नाही. आय् काण्ट लव्ह. ऑर रादर आय् अॅम इन्कॉ-

पिटंट टु लव्ह, प्रेम म्हटलं, की काही काळ जावा लागतो. त्या काळात एकमेकांबद्दल निष्ठा निर्माण व्हाव्या लागतात.... लव्ह रिक्वायर्स लॉयल्टी ... अंडरस्टॅंडींग .. टेंपरामेंटली आय् ॲम इंपेशण्ट. मला दीर्घकाळ एके ठिकाणी थांबता येत नाही. आय् वॉण्ट थ्रिल... थ्रिल एव्हरी मोमेण्ट ! कुणाच्या प्रेमात पडेपर्यंत मी थांबतच नाही... कुणी ना कुणी नवीन मागे असतातच. कुणी मला थांबूही देत नाहीत.

दिगंबर : पण हे किती दिवस चालू राहणार ? एक दिवस म्हातारपण येईल. मग आपल्याला कुणी तरी पाहावं... सांभाळावं... म्हणून बायको असावी... मुलं असावीत, असं वाटू लागेल...

रेहमान : तोपर्यंत आपण राहणार नाही, सबनीससाहब ! लेट् मी टेल् यू , ज्या दिवशी मला वाटेल, मला आधार हवा...ज्या दिवशी मला वाटेल, माझी सुख देण्याची शक्ती कमी झालीय ... त्या दिवशी आय विल् एण्ड माय लाइफ्... कमिट् स्युसाइड ! ...आत्महत्या करीन. आय हॅव नथींग टु लुक बॅक...त्यातल्या त्यात माझा पराभव केला, तो तुमच्या सुमीनं...

दिगंबर : कसा ?

रेहमान : आजवर मला गुंतल्यासारखं असं कुठं वाटलंच नाही. फक्त सुमीत मी गुंतलो. तिच्यात एवढं वेगळं काय होतं, असा विचार मनात येतो... माझ्या आसपास भरपूर आकर्षक स्त्रिया होत्या...बट...इन् सुमी आय् फाऊंड ए टोटल वुमन... ए गुड मदर.. ए गुड वाइफ... ए गुड फ्रेंड...प्रत्येक क्षण एक्सायटिंगली जगण्याची तिची स्टाइल...म्हणून तिच्यावर प्रेम करावंसं वाटलं... तिच्याशी लग्न करावं, असा विचार मनात आला.

दिगंबर : मग तुम्ही का नाही तिच्याशी लग्न करीत ?

रेहमान : नो...नो ! सुमी भी मेरे साथ शादी नहीं करेगी ! शी वर्शिप्स हर हस्बंड ! ...उसने मेरे साथ शादी की भी, तो वो पहले जैसे सुमी नहीं रहेगी ... मैं चाहता हूँ, घनश्याम और सुमी पहले जैसे खुश रहे !

दिगंबर : और आप ?

रेहमान : सबनीससाब, मी तिच्यापासून दूर होतोय. मी आता संबंध तोडलेत. आय् डोण्ट वॉण्ट टू सी हर...तिला माझा निरोप सांगा. टेल् हर, फर्गेट मी कंप्लीटली ! म्हणावं, मला साफ विसरून जा. ॲंड बी फेथफुल टु युवर ग्रेट हस्बंड ! मी आज असेन, उद्या नसेन...

[ उठतो. दोघेही हस्तांदोलन करीत उभे राहतात. ]

रेहमान : थॅंक्यू व्हेरी मच ... मी माझी पॉलिसी माझ्या शाळेला असाइन केलीय ... यू नो

इट ! बट् इफ् ॲट ऑल...घनश्यामने सुमीला टाकली, तर ती पॉलिसी सुमीच्या नावानं...

**दिगंबर :** नो...नो...मिस्टर रेहमान...नॉट ॲट ऑल. त्या पैशाला सुमी हात सुद्धा लावणार नाही. आम्ही जिवंत आहोत. सुमीची काय व्यवस्था करायची, ती आम्ही करू.

[ पुन्हा एकदा हस्तांदोलन करून रेहमान जायला वळतो, तोच काळोख होतो. ]

[ काळोख ]

[ प्रकाश ]

[ घनश्यामचे घर. दिगंबर विमनस्क मनःस्थितीत अंग आवळून बसला आहे. आपल्याच विचारात मग्न आहे. करंगळीत सिगरेट धरून मुठीतून झुरके मारतो आहे. तेवढ्यात आतून चंपू येते. हात पुसत येते. ती घरात काही काम करून आली आहे. ]

**दिगंबर :** सुमी झोपलीय ?

**चंपू :** हो...( त्याच्याकडे क्षणभर बघते, आणि ) काय चालवलंय तुम्ही हे ?

**दिगंबर :** ( भकासपणे तिच्याकडे बघत ) काय ?

**चंपू :** किती त्या सिगारेटी ओढताय ?...एकामागून एक !

[ दिगंबर एक मोठा झुरका मारतो. आणि समोरच्या ट्रेमध्ये सिगरेट घासून विझवतो. ]

**दिगंबर :** नाही, ग. फक्त हे चार दिवस. मन अगदी सैरभैर झालंय.

**चंपू :** मी जरा जाऊन येऊ का घरी ? आईंना...आणि मुलींना बघून येते.

**दिगंबर :** आलीय ना तुझी वहिनी ?

**चंपू :** आलीय, हो...पण इथं असं राहणं...

**दिगंबर :** ती बघेल...दोन दिवस आई करील. घनश्याम पाचगणीहून येईपर्यंत आपल्याला इथं राहायला पाहिजे...या अडचणीच्या प्रसंगी आपण मदतीला धावलो नाही, तर आपला उपयोग काय ?

[ पाकिटातून सिगारेट काढून पेटवतो. ]

**चंपू :** ( काळजीच्या सुरात ) तुम्ही पुन्हा ओढताय सिगारेट...
**दिगंबर :** खरं सांगतो... चैन नाही माझ्या जिवाला... या दोघांचा संसार पूर्ववत सुरळीत होईपर्यंत... ( झुरके मारतो. )
**चंपू :** मला ते कठीण दिसतंय... ! खूप उशीर झालाय ! मोहाचे क्षण कुणाच्या आयुष्यात येत नाहीत ? पण मनाला आवर घालता आला पाहिजे !

[ बाहेरून मोटरचा आवाज येतो. पाठोपाठ बॅग घेऊन नरहरी येतो. आणि माडीवर जाऊ लागतो. ]

**नरहरी :** ( जाता जाता ) साहेब आले– पाचगणीहून—
**दिगंबर :** ( चकित होत ) घनश्याम आला ?... लवकर ? उद्या येणार होता ना ?

[ घनश्याम येतो. तो गोंधळलेला आहे. थंड आहे. येता येता झोपलेल्या सुमीवर एक कटाक्ष टाकतो. ]

**दिगंबर :** घनश्याम, तू उद्या येणार होतास ना ?
**घनश्याम :** आलो आजच ! ( तिच्याकडे परत कटाक्ष टाकतो. ) ही इथं का ?
**दिगंबर :** आत्ताच... थोड्या वेळापूर्वी इथं येऊन झोपलीय...
**चंपू :** आत्ता उठेल ती ! झोपेच्या गोळ्या घेते ना.. मी वर जाऊन तिचा बिछाना लावते... मग वर नेऊ तिला...

[ ती घाईघाईने वर जाते. ]

**दिगंबर :** मला वाटतं, घनश्याम, तू हे फार ताणतोहेस... पाचगणीला जाताना तू तिला बंट्याला भेटू द्यायला हवं होतंस... बंट्याचा पापा घेण्यासाठी ती तळमळत होती... ( घनश्याम वळून तिच्याकडे बघतो. ) तू परत येताना बंट्या रडला का, रे ?
**घनश्याम :** मी त्याला... बंट्याला... परत आणलाय...
**दिगंबर :** ( आनंदित होतो. ) बंट्या आलाय... गुड् ! आहे कुठं तो ?

[ त्याला शोधण्यासाठी हर्षभराने इकडे तिकडे बघतो. ]

**घनश्याम :** त्याला पपांकडे ठेवलाय... आत्ताच हे सगळं त्याच्या दृष्टीला पडायला नको.. (थोडा विचार करून) दिगप्पा, मी ताबडतोब का आलो, माहीत आहे ? (दिगंबर कान टवकारून अपेक्षेने ऐकतो.) काल रात्री मी पाचगणीहून गोखल्यांना फोन केला होता...

**दिगंबर :** कशासाठी ?

**घनश्याम :** ऑफिसचं काम होतं थोडं... त्यावेळी त्यांनी.. गोखल्यांनी एक वेगळीच बातमी दिली...

**दिगंबर :** (घाबरून) कसली बातमी, घनश्याम ?

**घनश्याम :** दिगप्पा, काल संध्याकाळी... रेहमानने आत्महत्या केली... ! आत्महत्या ! ही...ही कमिटेड स्युसाइड ! दॅट बास्टर्ड कमिटेड स्युसाइड ! !

**दिगंबर :** (क्षणभर सुन्न होतो... स्वतःशीच बोलल्यासारखा-) परवा भेटला तेव्हा... मी इथनं कायमचा...कायमचा निघून जातोय, एवढंच म्हणाला होता...पण तो असा निघून जाईल, असं वाटलं नव्हतं...

**घनश्याम :** त्यानं...रेहमाननं का केली असेल, रे, आत्महत्या ? सुमी हातात येत नाही, म्हणून ?

**दिगंबर :** सुमी त्याच्या हातात जाणं... त्याच्या आहारी जाणं शक्यच नव्हतं...तोच म्हणाला होता.. सुमी वर्शिप्स् हर हस्बंड...!'

**घनश्याम :** (थोडी सुटका होते.) असं तो म्हणाला होता ?

**दिगंबर :** मी तुला त्याच दिवशी नाही का सांगितलं ?

**घनश्याम :** (थोडा विचारात बुडून) पण तेवढ्यासाठी आत्महत्या ? ...त्याला मिसेस् इराणी होती.. ती पोमेला होती...त्यानं आत्महत्या का केली असेल ?

**दिगंबर :** असल्या माणसांचा शेवट हा शेवटी असाच असतो, घनश्याम ! नुसत्या शरीरसुखावर खूप काळ जगता येत नाही ! प्रेमाचे...मायेचे पाश हवेत...त्यांशिवाय व्यर्थ आहे...अरे, आमची गंगूकाकी बघ ! काय आहे तिच्या आयुष्यात ? पण कशाच्या जोरावर जगतेय ती ?

**घनश्याम :** हे रेहमानचं सुमीला कळेल, तेव्हा... ?

**दिगंबर :** मी तुला सांगतो, घनश्याम, ती आनंदित होईल...पण तू तिला पुन्हा प्रेमानं ...(घनश्याम होकारी मान हालवतो. दिगंबर एकदम हर्षभरित होतो..) मग तू हाक मारून.. हालवून जागी कर तिला...मला आता इथं थांबायला वेळ नाही... मला गंगूकाकीला आणायला गेलं पाहिजे... (तेवढ्यात तो वळून पाहतो. माडीवरून नरहरी उतरताना दिसतो...) अरे, नरहरी, तू इथं काय करतो आहेस ? गाडी घेऊन पपांकडे जा. ताबडतोब बंड्याला घेऊन ये.. चल.. पळ.. घनश्याम, तू... उठव तिला...जागी कर...

[ दोन्ही हात हवेत उडवीत तो ' चंपू... चंपू... चंपू...' अशा आनंद-भराने, उत्साहाने हाका मारीत माडीवर जातो. ]

**घनश्याम :** ( सुमीशेजारी बसतो... जरा कचरतो... आणि मग... ) सुमी... सुमे... मी आलोय... मी बंड्यालाही आणलाय... आपण विसरू हे सगळं... ( तिला हालवीत ) सुमे, जागी हो... सुमे... सुमे...

[ माडीवर गडबड ऐकू येते. घनश्याम वर बघतो. चंपू आणि दिगंबर घाबरेघुबरे होऊन माडीवरून खाली येतात. ]

**घनश्याम :** ( घाबरून ) काय झालं ?
**दिगंबर :** अरे, गदगदा हालवून जागी कर तिला...
**चंपू :** ( बाटली दाखवीत ) ही गोळ्यांची बाटली रिकामी आहे...मी फोन करते डॉक्टरला...

[ ती धावत फोन उचलते...घनश्याम सुमीला गदगदा हालवतो...हलवताना ' सुमे... सुमे ' अशा हाका मारतो–सुमी जीव सोडून गेली आहे. ]

**घनश्याम :** ( दिगप्पाकडे बघत ) हिनंही आत्महत्या केली असेल ?... ठरवून ?
**दिगंबर :** ( कोसळल्यासारखा गुडघे टेकतो. ) नाही, रे ! ही हिची घाई... घाई... घाई ! कुठंही... कधीही स्थिर राहिली नाही !

[ चंपूच्या हातात फोन तसाच आहे. घनश्याम सुमीच्या पोटावर मान टाकतो...आणि दिगंबर हमसून रडत दोन्ही हातांनी आपले तोंड झाकतो. ]

पडदा

## जयवंत दळवी

## यांची

## आणखी पुस्तके

**कादंबऱ्या**

चक्र

स्वगत

सारे प्रवासी घडीचे

महानंदा

अथांग

वेडगळ

सावल्या । प्रवाह

धर्मानंद

**कथासंग्रह**

गहिवर

एदीन

जळातील मासा

फक्त पुरुष

आश्रम

रुक्मिणी

स्पर्श

**विनोद**

फजीतवाडा

मिशी उतरून देईन

कशासाठी पोटासाठी !

उपहास-कथा

विक्षिप्त-कथा

**एकांकिका**

कावळे

**नाटके**

संध्याछाया

सभ्य गृहस्थ हो !

बॅरिस्टर

सूर्यास्त

**प्रवास-वर्णन**

लोक आणि लौकिक

# जयवंत दळवी
# यांची
# आगामी पुस्तके

**कादंबऱ्या**

अंधाराच्या पारंब्या
मंगलमूर्ती आणि कंपनी
सूर्यास्त

**विनोद**

कशासाठी-पोटासाठी !
[ दुसरी आवृत्ती ]

IRBK-0118325

2003